
# गृहव्यवस्थापन

## इयत्ता : अकरावी



शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. २०.०६.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# गृहव्यवस्थापन

## इयत्ता : अकरावी

२०१९

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४.

M7K1D9

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तकाद्वारे त्या-त्या पाठाला संबंधित असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

**प्रथमावृत्ती :**

**© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे – ४११ ००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**गृहव्यवस्थापन विषय समिती**

| | |
|---|---|
| श्रीमती रेखा दिनकर पंडित | अध्यक्ष |
| श्रीमती माधुरी संजीव रत्नपारखी | सदस्य |
| श्रीमती ममता जयंत दलाल | सदस्य |
| श्रीमती शीतल रवीन्द्र ठाकरे | सदस्य |
| डॉ. स्वाती अशोक महाजन | सदस्य |
| डॉ. सदानंद एम. बिळ्ळूर | सदस्य-सचिव |

**गृहव्यवस्थापन अभ्यासगट सदस्य**

श्रीमती स्वाती प्रदीप निंबाळकर

श्रीमती ललिता धनंजय पाठक

**मुख्य समन्वयक**

श्रीमती प्राची रवींद्र साठे

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री. यशवंत देशमुख

**अक्षरजुळणी**

रुना ग्राफिक्स, पुणे.

**समन्वयक**

**डॉ. सदानंद एम. बिळ्ळूर**

विशेषाधिकारी, कन्नड

**श्री. आर. एम. गणाचारी**

सहायक विशेषाधिकारी, कन्नड

**सच्चितानंद आफळे**

मुख्य निर्मिती अधिकारी

**प्रभाकर परब**

निर्मिती अधिकारी

**शशांक कणिकदळे**

सहायक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

**विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक**

पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,

प्रभादेवी, मुंबई – २५

**कागद**

७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

N/PB/2019-20/Qty.- 3,000

**मुद्रक :**

S Graphix (India) Pvt. Ltd., Thane

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

गृहव्यवस्थापनाचे नवीन स्वरूपातील पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आनंद होत आहे. काही नवीन आणि कुतूहल निर्माण करणाऱ्या प्रकरणांचा तसेच मूलभूत संकल्पनांचा चित्रासहित व नवनवीन माहितीसह समावेश करून अभ्यासक्रम सुधारित करण्यात आला आहे.

गृहव्यवस्थापन या विषयाचे पाठ्यपुस्तक व्यवस्थापनाची तत्त्वे आणि प्रक्रिया व त्याचे घराकरिता उपयोजन यांच्याशी संबंधित आहे. सदर पाठ्यपुस्तक गृहव्यवस्थापनाचा अर्थ व महत्त्व, व्यवस्थापनाचे प्रेरक घटक, व्यवस्थापन प्रक्रिया, निर्णय घेणे, कौटुंबिक संसाधने, गृह स्वच्छता या गोष्टींचे मूलभूत ज्ञान प्रदान करते. या पाठ्यपुस्तकात कुटुंबाचे निवासस्थान आणि घरातील फर्निचर अशा नवीन जिज्ञासा निर्माण करणाऱ्या प्रकरणांची माहिती देते. तसेच पुष्परचना, लँडस्केपिंग यासारख्या प्रकरणांमधून कौशल्य विकासावर भर देता येईल. यामुळे विद्यार्थी अनुभव संपन्न होतात. त्यांच्यात 'शिका आणि कमवा' ही भावना विकसित होण्यास मदत होते. या पुस्तकातील घटकांमुळे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यात आदान प्रदान वाढून त्यांच्यात सहसंबंध निर्माण होतात.

मित्रांनो, नवीन पुस्तकात विद्यार्थ्यांवर दृश्य परिणाम साधण्यासाठी विविध प्रकारची रंगीत चित्रे दिलेली आहेत. मूलभूत संकल्पना सोप्या पद्धतीने समजण्यासाठी भाषा अतिशय सोपी ठेवण्यात आली आहे. दैनंदिन जीवनातील अनेक उदाहरणांमधून मूलभूत संकल्पनांचा अर्थ स्पष्ट होतो. विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करण्यासाठी प्रथम पृष्ठावर क्यू. आर. कोड दिलेले आहेत. क्यू. आर. कोड द्वारे मिळवलेली माहिती देखील तुम्हाला खूप आवडेल. पुस्तकामध्ये संदर्भ सूची, कठीण शब्दकोश आणि वेबसाईट दिलेल्या आहेत. पुस्तकाच्या अंतिम आराखड्याचे तज्ज्ञ मंडळींद्वारे पुनरावलोकन करण्यात आले होते. त्यांच्या सूचनांचे पालन करण्यात आले आहे.

गृहव्यवस्थापन समिती आणि अभ्यासगट, विषयतज्ज्ञ, गुणवत्ता परीक्षक व चित्रकार यांच्या विशेष परिश्रमातून हे पाठ्यपुस्तक तयार झाले आहे. मंडळ या सर्वांचे मन:पूर्वक आभारी आहे.

समितीला आशा आहे की पुस्तकातील ज्ञान मिळविण्यासोबतच विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना हे पुस्तक हाताळायला आवडेल.

(डॉ. सुनिल मगर)
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे.**
**दिनांक** : २० जून २०१९
भारतीय सौर दिनांक : ३० ज्येष्ठ १९४१

## क्षमता विधाने

**क्षमता**

- व्यवस्थापनाचे, संकल्पनांचे ज्ञान आत्मसात करणे.
- गृहव्यवस्थापनाचा अर्थ आत्मसात करून ज्ञान प्राप्त करणे.
- गृहव्यवस्थापनाची गरज समजून घेणे.
- दैनंदिन जीवनात गृहव्यवस्थापनाच्या महत्त्वाचा परिचय करून देणे.
- गृहव्यवस्थापन या विषयात आवड निर्माण करणे.
- मूल्ये, ध्येये आणि स्तर यांच्या संकल्पनांचे ज्ञान आत्मसात करणे.
- मूल्याचे स्रोत आणि वैशिष्ट्ये यांचे अध्ययन करणे.
- ध्येयाचे प्रकार समजून घेणे.
- स्तराच्या वर्गीकरणाचा परिचय करून देणे.
- मूल्ये, ध्येये व स्तर यांचा परस्पर संबंध ओळखता येणे.
- व्यवस्थापन प्रक्रियेची मूलभूत संकल्पना समजून घेणे.
- दैनंदिन जीवनात व्यवस्थापन प्रक्रियेतील पायऱ्या समजून घेणे व त्यांचे उपयोग करणे.
- नियोजन, नियंत्रण व मूल्यांकन यातील संबंध स्पष्ट करण्यासाठी क्षमता विकसित करणे.
- निर्णय प्रक्रियेच्या संकल्पनेचे अध्ययन करणे.
- निर्णय प्रक्रियेचे ज्ञान आत्मसात करणे.
- निर्णय प्रक्रियांचे विविध प्रकार समजून घेणे.
- निर्णय प्रक्रियेच्या महत्त्वाचा परिचय करून देणे.
- कौटुंबिक संसाधनाचा अर्थ आणि वर्गीकरण समजून घेणे.
- संसाधनाच्या वैशिष्ट्यांचा परिचय करून घेणे.
- मानवीय संसाधने व अमानवीय संसाधने यातील फरक समजावून घेणे.
- दैनंदिन जीवनात मानवीय संसाधने व अमानवीय संसाधने वापरण्याची क्षमता विकसित करणे.
- कौटुंबिक संसाधनावर परिणाम करणाऱ्या घटकांचा वापर करण्याची क्षमता विकसित करणे.
- कुटुंब निवासाची गरज आणि महत्त्व समजून घेणे.
- घरांच्या विविध प्रकारांमधील फरक समजून घेण्याची क्षमता विकसित करणे.
- घर बांधण्यासाठी योग्य जागा निवडण्याची क्षमता विकसित करणे.
- घरातील फर्निचर निवड करण्याची क्षमता विकसित करणे.
- फर्निचरला लागणारे साहित्य समजून घेणे तसेच त्या फर्निचरची काळजी व निगा राखण्याच्या क्षमतेचा परिचय करणे.
- फर्निचरच्या मांडणीमधील तत्त्वे समजून घेऊन त्याचा दैनंदिन जीवनात उपयोग करण्याची क्षमता विकसित करणे.
- पुष्परचनेची मूलभूत माहिती करून घेणे.
- पुष्परचनेच्या साहित्याचा उपयोग करण्याची क्षमता विकसित करणे.
- पुष्परचनेचे प्रकार ओळखता येणे.
- पुष्परचनेची तत्त्वे समजून घेऊन ती उपयोगात आणणे.
- पुष्परचना व पुष्प सजावटीतील कौशल्ये विकसित करणे.
- लँडस्केपींगची संकल्पना आणि महत्त्व समजून घेणे.
- लँडस्केपींगमध्ये वापरता येणाऱ्या झाडांचे ज्ञान मिळविणे.
- परसबागेचे कौशल्य विकसित करणे.
- घराच्या स्वच्छतेची मूलभूत संकल्पना समजून घेणे.
- घराच्या स्वच्छतेकरिता लागणाऱ्या उपकरणांची व स्वच्छतेच्या घटकांची कौशल्ये विकसित करणे.

## शिक्षकांसाठी

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनासाठी घर हा अत्यंत महत्त्वाचा आणि अविभाज्य घटक आहे. येथेच व्यक्तीची वाढ आणि विकास घडून येतो. कुटुंबातील सदस्यांचे उत्तम स्वास्थ्य, आनंद आणि समाधान साध्य करण्यासाठी व्यवस्थापन हा कौटुंबिक जीवनाचा अभिन्न भाग बनते. गृहव्यवस्थापन हा असा नावीन्यपूर्ण विषय आहे की जो कौटुंबिक उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी व्यवस्थापनाची तत्त्वे आणि पद्‌धती यांच्या उपयोजनांकडे वाटचाल करतो.

सदर विषय इयत्ता अकरावीसाठी नव्याने प्रस्तावित करण्यात आला असल्याने गृहव्यवस्थापनाची शास्त्रोक्त माहिती विद्यार्थ्यांना देण्याचे उद्‌दिष्ट आहे. हे पाठ्यपुस्तक संसाधने, व्यवस्थापनाची प्रक्रिया व निर्णय प्रक्रिया यांची संकल्पना व उपयोजिता आणि त्यांचा कौटुंबिक ध्येयपूर्तीकरिता होणारा उपयोग यावर केंद्रित केले आहे. व्यक्ती चांगली आणि जबाबदार नागरिक होण्यासाठी मदत करणाऱ्या तसेच दैनंदिन जीवनामध्ये महत्त्वाच्या ठरणाऱ्या मूल्ये, ध्येये आणि स्तर या संकल्पनांशी देखील हे पाठ्यपुस्तक निगडित आहे.

व्यवस्थापनाच्या या मूलभूत संकल्पनांव्यतिरिक्त या पाठ्यपुस्तकामध्ये कुटुंब निवास, लँडस्केपींग व गार्डनिंग आणि गृहस्वच्छता या नवीन घटकांचा समावेश आहे. योग्य घराची निवड, विनासायास कार्य करणे आणि घराच्या सौंदर्य मूल्यांमध्ये वृद्‌धी करणे इत्यादींबाबतची अभिवृत्ती वाढविण्यासाठी या घटकांची मदत होऊ शकते. फर्निचर मांडणी, पुष्परचना आणि परसबाग यांसारख्या घटकांचा उद्योजकता कौशल्य संपन्न करण्यासाठी उपयोग होईल.

वरील उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी या पुस्तकामध्ये रुचीपूर्ण माहिती व सुयोग्य आकृत्या आणि उदाहरणे यांचा समावेश केलेला आहे. पुस्तकातील आकृत्या, चित्रे आणि फोटो यांची विद्यार्थ्यांना विषय स्पष्टपणे समजण्यासाठी मदत होईल. आधुनिक तंत्रज्ञानाचा विचार करता, विद्यार्थ्यांना अधिक आणि अद्ययावत माहिती देण्यासाठी पुस्तकामध्ये Q. R. Code नव्याने देण्यात आले आहेत. पाठ्यपुस्तकाचा हा नवीन आकृतिबंध कृती, संबंधित क्रिया आणि प्रात्यक्षिकांचा अनुभव यांवर आधारित आणि भर देणारा आहे. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव आणि तंत्रज्ञानाच्या उपयोगाचे कौशल्य विकसित करण्याकरिता शिक्षकांनी त्यांना प्रगल्भ अनुभव देणे अपेक्षित आहे.

सद्यपरिस्थितीतील संसाधनांच्या उपलब्धतेवरील वाढता ताण आणि त्यांची वाढती मागणी विचारात घेता या विषयाचे ज्ञान अधिकाधिक गरजेचे होत आहे.

या पाठ्यपुस्तकाची रचना विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाच्या नवनवीन क्षेत्रांची द्‌वारे खुली करेल. आमचा असा विश्वास आहे की शिक्षक आणि पालक या पुस्तकाचे पूर्ण समर्थन करतील.

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | व्यवस्थापनाची ओळख | १ |
| २. | व्यवस्थापनाचे प्रेरक घटक | ५ |
| ३. | व्यवस्थापन प्रक्रिया | १२ |
| ४. | निर्णय घेणे | २० |
| ५. | कौटुंबिक संसाधने | २७ |
| ६. | कुटुंबाचे निवासस्थान | ३८ |
| ७. | घरातील फर्निचर | ४८ |
| ८. | पुष्परचना आणि सजावट | ५७ |
| ९. | लँडस्केपींगची ओळख | ६४ |
| १०. | गृहस्वच्छता | ७१ |

# १. व्यवस्थापनाची ओळख

१.१ व्यवस्थापनाचा अर्थ आणि व्याख्या
१.२ गृहव्यवस्थापनाचा अर्थ आणि व्याख्या
१.३ गृहव्यवस्थापनाची गरज आणि महत्त्व

**चर्चा करू या :**

१. व्यवस्थापन म्हणजे काय ?
२. गृहव्यवस्थापन म्हणजे काय ?

इच्छित ध्येय साध्य करण्यासाठी नियोजनपूर्व कार्य किंवा काम करणे म्हणजे व्यवस्थापन. दैनंदिन जीवनात व्यवस्थापन महत्त्वाची भूमिका निभवत असते. कोणतेही काम परिणामकारकरित्या आणि कार्यक्षमतेने करण्याची व्यवस्थापन ही एक कला आहे. दैनंदिन जीवनात आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी आपण अनेक प्रकारचे कार्य करत असतो. ही सर्व कार्ये व्यवस्थापन प्रक्रियेच्या तीन पायऱ्या आहेत. जसे - नियोजन, नियंत्रण आणि मूल्यांकन याच्या उपयोगाने सर्व कामे पद्धतशीररित्या पार पाडली जातात.

**तुम्हाला माहीत आहे का?**

'गृहव्यवस्थापन' ही संज्ञा सर्वप्रथम मारिया पार्लोवा यांनी १९८० साली वापरली. ही संकल्पना घरातील कोणतेही कार्य यशस्वीपणे पूर्ण करण्याच्या संदर्भात वापरण्यात आली.

गृहव्यवस्थापन ही कौटुंबिक जीवनाची प्रशासकीय बाजू आहे. निकेल आणि डॉर्सी यांच्या मते ''गृहव्यवस्थापन म्हणजे नियोजन, संघटन, नियंत्रण आणि मूल्यांकनाद्वारे कुटुंबाजवळ असलेल्या संसाधनांचा वापर करून कुटुंबाची ध्येय साध्य करणे होय''. गृहव्यवस्थापनाला कौटुंबिक संसाधनांचे व्यवस्थापन असेही म्हणतात.

येथील चर्चेत गृहव्यवस्थापन किंवा कौटुंबिक संसाधनांच्या व्यवस्थापनाच्या अर्थावर व परिभाषेवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

## १.१ व्यवस्थापनाची व्याख्या आणि अर्थ :

व्यवस्थापन हा कौटुंबिक जीवनाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. कौटुंबिक वातावरणात मानवा-मानवातील नात्यांमधून निर्माण होणारा तो एक नैसर्गिक परिणाम आहे. काम करण्यासाठी नियोजित व पद्धतशीर क्रिया म्हणजे व्यवस्थापन. व्यक्तीला आपल्या विविध गरजा व मागण्या पूर्ण करण्याकरिता पद्धतशीररित्या नियोजन, नियंत्रण आणि मूल्यांकनाचा उपयोग करून विविध कार्ये करावी लागतात. व्यवस्थापन ही एक मानसिक प्रक्रिया आहे. यात निर्णय घेण्याचा समावेश होतो ज्यामुळे क्रिया घडते. यशस्वीरित्या काम पूर्ण करण्याचे ते माध्यम आहे. समाजात होणाऱ्या बदलांच्या दृष्टिकोनातून त्याचप्रमाणे घरगुती बदल हाताळण्यासाठी व्यवस्थापन हे एक बौद्धिक माध्यम आहे. तरीही हे लक्षात ठेवण्यासारखे आहे की व्यवस्थापन प्रक्रिया मात्र कधीच बदलत नाही. **साध्या शब्दात सांगायचे तर, व्यवस्थापन ही अशी प्रक्रिया आहे ज्यात वैयक्तिक किंवा कौटुंबिक ध्येय साध्य करण्यासाठी संसाधने वापरली जातात.**

'व्यवस्थापन म्हणजे ठरविलेली ध्येये साध्य करण्याकरिता नियोजन, अंमलबजावणी आणि मूल्यांकन या तीन पायऱ्यांचा समावेश असलेली प्रक्रिया.'

व्यवस्थापनाच्या अनेक व्याख्या आहेत. त्यातील काही साध्या आहेत तर काही थोड्या विस्तृत आहेत.


**संगणक माझा मित्र :**

व्यवस्थापनाच्या अजून व्याख्या शोधून त्या सर्व व्याख्यांमध्ये काय साम्य आहे त्याचा सारांश काढा.

**व्यवस्थापनाची सर्वांत सोपी व्याख्या म्हणजे ''तुमच्याजवळ जे आहे ते वापरून तुम्हाला जे हवे आहे ते साध्य करणे.'' इथे तुम्हाला जे हवे आहे ते**

**म्हणजे कौटुंबिक ध्येय आणि तुमच्याजवळ जे आहे ते म्हणजे कौटुंबिक संसाधने.**


**आकृती पूर्ण करा :**




**आकृती १.१ (अ) : व्यवस्थापनाची सोपी व्याख्या**

वरील व्याख्येत तुमच्याजवळ असलेले म्हणजे उपलब्ध संसाधने आणि तुम्हाला हवे असलेले म्हणजे वैयक्तिक किंवा कौटुंबिक ध्येय. एक गोष्ट स्पष्ट करणे गरजेचे आहे की व्यवस्थापनाचा हेतू केवळ तुमच्याजवळ काय आहे आणि तुम्हाला काय हवे आहे याचा समतोल साधणे नाही. खरे तर व्यवस्थापनाची गरज या दोन्हींच्या असमतोलातूनच निर्माण होते. म्हणूनच वरील व्याख्या पुढीलप्रमाणे सुधारित करता येते – **''तुमच्या जवळ असलेल्या संसाधनांचा कमीत कमी वापर करून तुम्हाला हवे असलेल्या ध्येयापैकी जास्तीत जास्त ध्येय साध्य करणे.''**

**आकृती पूर्ण करा :**




**आकृती १.१ (ब) : व्यवस्थापनाची सुधारित व्याख्या**

वरील व्याख्येतून स्पष्ट होते की, व्यवस्थापनात सर्वोत्तम ध्येय साध्य करण्यासाठी कमीत कमी संसाधनांचा वापर, वेळेपूर्वी/आगाऊ नियोजन, आराखड्याप्रमाणे कार्य करणे, ध्येय साध्यता आणि कुटुंबातील सदस्यांच्या समाधानाचे मूल्यमापन या सर्वांची आवश्यकता असते.

## १.२ गृहव्यवस्थापनाचा अर्थ आणि व्याख्या :

व्यक्तीला आणि कुटुंबाला अनेक ध्येय साध्य करायची असतात. या ध्येय प्राप्तीकरिता उपलब्ध संसाधने ओळखणे आणि त्यांचा योग्य वापर करणे गरजेचे ठरते. निर्णय प्रक्रिया या ठिकाणी महत्त्वाची भूमिका वठवते. अनेक ध्येय साध्य करायची असतात आणि त्यासाठी उपलब्ध संसाधने मर्यादित असतात. या सत्य परिस्थितीचा विचार करून ध्येयांचा प्राधान्यक्रम ठरविणे अत्यावश्यक ठरते. योग्य पर्यायाच्या उत्तम परिणामाची पडताळणी करण्यासाठी संसाधनांचे मूल्यमापन व विश्लेषण करणे आवश्यक असते. प्रत्येक व्यक्तीने व कुटुंबाने व्यवस्थापनाची तत्त्वे व प्रक्रिया योग्य पद्धतीने उपयोगात आणल्यास जीवनाचा अपेक्षित दर्जा जास्तीत जास्त प्रमाणात मिळविण्याची परिणामकारकता ठरविते.

ज्या कुटुंबात कौटुंबिक ध्येयाची पूर्तता करताना समाधानाची योग्य पातळी गाठली जाते ते घर उत्तम व्यवस्थापन असलेले घर समजावे. या दृष्टीने व्यवस्थापन गतिशील व महत्त्वाची भूमिका निभावते.

म्हणूनच गृहव्यवस्थापनाची खालीलप्रमाणे व्याख्या केली आहे.

**'गृहव्यवस्थापन म्हणजे नियोजन, संघटन, नियंत्रण आणि मूल्यांकन करून कुटुंबाजवळ उपलब्ध असलेल्या संसाधनांच्या उपयोगाने कुटुंबाची ध्येये साध्य करणे होय.'**

ग्रॉस आणि क्रॅन्डॉल यांनी गृहव्यवस्थापनाची विस्तृत व्याख्या खालीलप्रमाणे केली आहे. जेणे करून गृहव्यवस्थापनाचे स्पष्ट चित्र समजू शकते.

**'गृहव्यवस्थापनात निर्णय श्रृंखलेचा समावेश होतो, कौटुंबिक ध्येय साध्य करण्याकरिता कौटुंबिक संसाधनांच्या उपयोगाची प्रक्रिया तयार केली जाते. या प्रक्रियेत एकामागे एक येणाऱ्या तीन पायऱ्यांचा समावेश होतो– नियोजन करणे, प्रत्यक्ष आराखडा अमलात आणताना विविध घटकांवर नियंत्रण ठेवणे, ज्याने आराखडा तयार केला ती व्यक्ती किंवा इतर व्यक्तीही राबवते आणि भविष्यातील नियोजनाची पूर्वतयारी म्हणून मूल्यांकन करणे.'**

ही व्याख्या स्पष्ट करते की, व्यवस्थापन ही एक मानसिक प्रक्रिया आहे. ज्यात निर्णय प्रक्रियेचा आणि क्रमशः येणाऱ्या निश्चित पायऱ्यांचा समावेश असतो.

## १.३ गृहव्यवस्थापनाची गरज व महत्त्व :

**चर्चा करू या.**

आजची कुटुंबे पूर्वीच्या कुटुंबांपेक्षा वेगळी कशी आहेत?

दैनंदिन जीवनात व्यवस्थापन प्रक्रिया महत्त्वाची भूमिका बजावते. गेल्या अनेक वर्षात समाजात त्याचप्रमाणे कुटुंबात अनेक बदल झाले आहेत. जुन्या काळातील कुटुंबांपेक्षा आताची कुटुंबे अनेक प्रकारे वेगळी आहेत. आजकाल, विभक्त कुटुंबाचे प्रमाण वाढले आहे. विभक्त कुटुंबात गृहिणीच्या दुहेरी भूमिकेमुळे वेळेची व ऊर्जेची गरज वाढते आहे जसे कुटुंबासाठी व नोकरीच्या/कामाच्या ठिकाणी लागणारा वेळ व ऊर्जा. म्हणूनच ठरवून दिलेले काम किंवा विविध कार्य पूर्ण करण्यासाठी उपलब्ध संसाधनांच्या उपयोगाचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे कौटुंबिक जीवन बदलत आहे, ज्यामुळे व्यवस्थापनाच्या तत्त्वांचे आणि व्यवस्थापन प्रक्रियेची उपयोजिता गरजेची आहे. गृहिणी वेळ व श्रम बचतीच्या साधनांचा उपयोग करायला लागल्यास तिला पैशासारख्या अमानवीय संसाधनाचे कौशल्यपूर्ण व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

वाढता राहणीमानाचा दर्जा आणि भौतिक वस्तू आणि सेवांची उपलब्धता खरेदी करतेवेळी निवडीच्या कक्षा रुंदावते याकरिता चांगल्या निर्णय प्रक्रियेची गरज असते.

उदाहरणार्थ, नोकरी करणारी स्त्री वेळेची व श्रमाची बचत होण्याकरिता सूज्ञपणे खाण्यायोग्य तयार पदार्थांची (Ready to eat) निवड करेल.

**सांगा पाहू :**

गृहव्यवस्थापनातील अशा उदाहरणांची यादी करा ज्यात संसाधनांच्या परिणामकारक उपयोगात व्यवस्थापन सहाय्यक ठरेल.

वैद्यकीय शास्त्रातील प्रगती, वैद्यकीय क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान, मानवाची वाढती आयुर्मर्यादा, विज्ञान, तंत्रज्ञान, संगणक तंत्रज्ञान, संप्रेषण तंत्रज्ञानातील प्रगती, लोकसंख्येचा विस्फोट, बेरोजगारी इत्यादींचा कौटुंबिक जीवनावर व त्याचवेळी संसाधनांच्या व्यवस्थापनावर परिणाम होतो. जास्तीत जास्त समाधान मिळण्याकरिता व कौटुंबिक ध्येय साध्य करण्याकरिता मानवीय आणि अमानवीय संसाधनांचा परिणामकारक उपयोग करणे महत्त्वाचे ठरते. व्यवस्थापन आपल्याला अशा संसाधनांचा परिणामकारक उपयोग कसा करू शकतो ते शिकवते.

जीवनाच्या इच्छित दर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध संसाधने आणि ध्येयाची पूर्तता करणे, राहणीमानाचा दर्जा, आरोग्य, कौटुंबिक सदस्यांचा आनंद व समाधान यात योग्य समतोल साधण्याकरिता व मिळविण्याकरिता व्यवस्थापन प्रक्रिया महत्त्वाची भूमिका बजावते. याचे महत्त्व खालीलप्रमाणे :

- गृहव्यवस्थापन सुसंघटितपणे कार्य करण्यास मदत करते.
- गृहव्यवस्थापन अनेक पर्यायांतून एका उत्तम पर्यायाची निवड करण्यासाठी व निर्णय घेण्याकरिता मदत करते.
- कुटुंबात निर्णय घेताना सल्लागाराचे काम करते.
- गृहव्यवस्थापन संसाधने ओळखण्यास व त्याचा योग्य विनिमय करण्यास आणि उपलब्ध संसाधनांच्या योग्य वापराचा आराखडा तयार करण्यास मदत करते.
- यामुळे आयुष्य जगण्याला आणि मानवीय सहवासाच्या दर्जाला दिशा मिळते.
- संसाधनांचा परिणामकारक उपयोग करून कौटुंबिक ध्येय साध्य करण्याचे गृहव्यवस्थापन एक माध्यम आहे.
- व्यक्तीचे व कुटुंबाचे मूल्यसंवर्धन करण्यास मदत करते.
- कुटुंबातील सदस्यांचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी कुटुंबाला सहाय्य करते.
- कुटुंबातील सदस्यांना आरोग्य व सर्वसाधारण स्वास्थ्य चांगले राखून आनंदी व समाधानी ठेवण्यास मदत करते.
- बदलत्या परिस्थितीत व कठीण परिस्थितीत योग्य मार्ग हाताळण्याकरिता प्रेरणा देते.

**तुम्हाला आठवतंय काय?**

- इच्छित ध्येय साध्य करण्याच्या दिशेने केलेली नियोजनात्मक क्रिया म्हणजे व्यवस्थापन.
- व्यवस्थापन ही एक काम करण्याची नियोजनबद्ध व पद्धतशीर क्रिया आहे.

- तुमच्याजवळ जे आहे. ते वापरून तुम्हाला जे हवे आहे ते साध्य करणे ही व्यवस्थापनाची सोपी व्याख्या आहे. येथे तुम्हाला जे हवे आहे ते म्हणजे कौटुंबिक ध्येय व तुमच्याजवळ जे आहे ते म्हणजे कौटुंबिक संसाधने.
- गृहव्यवस्थापन म्हणजे नियोजन, संघटन, नियंत्रण आणि मूल्यांकन करून कुटुंबाजवळ उपलब्ध असलेल्या संसाधनांच्या उपयोगाने कुटुंबाची ध्येये साध्य करणे.
- दैनंदिन जीवनात गृहव्यवस्थापन महत्त्वाची भूमिका निभावते.

## स्वाध्याय

- **वस्तुनिष्ठ प्रश्न :**

**१) बहुपर्यायी प्रश्न.**

१. व्यवस्थापन ही काम करण्याची नियोजनपूर्ण व – क्रिया आहे.
   अ) पद्धतशीर
   ब) अमूर्त
   क) असंघटित

२. गृहव्यवस्थापन म्हणजे नियोजन, संघटन, नियंत्रण आणि मूल्यांकन करून कुटुंबाजवळ उपलब्ध असलेल्या – च्या उपयोगात कौटुंबिक ध्येय साध्य करणे होय.
   अ) मूल्ये
   ब) संसाधने
   क) ताकद

३. नोकरी करणारी स्त्री – ची व उर्जेची बचत करण्याकरिता शहाणपणाने तयार खाण्यायोग्य (Ready to eat) पदार्थाची निवड करेल..
   अ) कौशल्य
   ब) पैसा
   क) वेळ

४. आपण कोणतीही गोष्ट संघटितपणे करण्यासाठी – ची मदत होते.
   अ) गृहव्यवस्थापन
   ब) निर्णय प्रक्रिया
   क) नियंत्रण

५. गृहव्यवस्थापन, संसाधने – व योग्य विनिमय करण्याकरिता मदत करते.
   अ) मूल्ये
   ब) वगळणे
   क) ओळखणे

- **लघुत्तरी प्रश्न :**

**१) खालील विधाने चूक की बरोबर ते ओळखा.**

अ. गृहव्यवस्थापन, कुटुंबाची भावनिक बाजू आहे.
ब. व्यवस्थापन ही एक मानसिक प्रक्रिया आहे.
क. नोकरी करणारी स्त्री पैशाची व कौशल्याची बचत करण्याकरिता तयार खाद्यपदार्थांची शहाणपणाने निवड करेल.

**२) परिभाषा लिहा.**

अ. व्यवस्थापन
ब. गृहव्यवस्थापन

**३) टीपा लिहा.**

अ. व्यवस्थापनाचा अर्थ
ब. गृहव्यवस्थापनाचा अर्थ
क. गृहव्यवस्थापनाची गरज/निकड
ड. गृहव्यवस्थापनाचे महत्त्व.

❑❑❑

# २. व्यवस्थापनाचे प्रेरक घटक


२.१ मूल्ये

२.२ ध्येये


२.३ स्तर

२.४ मूल्ये, ध्येये व स्तर यांमधील संबंध


**माहीत आहे काय ? :** मूल्ये, ध्येये व स्तर यांचा अर्थ.

मूल्ये, ध्येये व स्तर हे व्यवस्थापनाचे निर्णायक घटक आहेत. प्रत्येक कुटुंब हे नेहमीच समस्येचे निराकरण करताना किंवा विविध प्रकारचे कार्य करताना विविध पर्याय शोधतात आणि विविध पर्यायांमधून कोणत्याही एका पर्यायाची निवड करतात.

प्रत्येक कुटुंब कार्य करताना किंवा समस्येला सोडविण्याकरिता विविध प्रकारचे मार्ग (पर्याय) शोधतात. जे पर्याय समस्या सोडविण्यासाठी निवडतात ते काही विशिष्ट घटकांवर अवलंबून असतात. हे घटक आपल्याला कार्य करतांना कोणत्या पर्यायांना निवडायचे अथवा अस्वीकृत करायचे याचे मार्गदर्शन करतात. या घटकांचा निर्णय प्रक्रियेवर काय परिणाम होतो याची जाणीव आपल्याला नसते त्याचा निर्णय प्रक्रियेवर प्रभाव असतो हे घटक म्हणजे मूल्ये, ध्येये व स्तर होय.




## २.१ मूल्ये :

**काय फरक दिसून येतो ?**

१. शिक्षणाचे मूल्य

२. वस्तू अणि सामग्रीचे मूल्य

मूल्य म्हणजे महत्व किंवा किंमत जी कुठल्याही वस्तू, परिस्थिती, सिद्‌धांत किंवा कल्पनेला दिली जाते. आपल्या जीवनात आपण काही विशिष्ट गोष्टींना अतिशय महत्व देतो आणि काही गोष्टी आपल्यासाठी मौल्यवान असतात. उदाहरणार्थ : प्रेम, मैत्री एकनिष्ठा इत्यादी. 'मूल्य' हा शब्द अनेक प्रकारे उपयोगात आणला जातो, जसे – नैतिक मूल्य, सौंदर्यमूल्य आणि साधनीभूत मूल्य.

मूल्ये मानवी जीवनाला प्रेरणा देतात. ते निर्णय घेणे, फरक करणे आणि विश्लेषण करण्यामध्ये मदत करतात. मूल्यांमुळे आपण हुशारीने विविध पर्यायांमधून योग्य पर्यायाची निवड करू शकतो. मूल्ये आपल्या जीवनाला अर्थ देतात. दोन किंवा अधिक पर्यायामधून निवड करताना मूल्यांमुळे अचूक उत्तरे मिळतात. मूल्ये हे आपल्या जीवनाचे मूलभूत तत्वज्ञान असून प्रेरणा देणारे घटक आहेत. विविध प्रकारच्या मूल्यांद्‌वारे कार्याच्या व्यवस्थापनाची दिशा ठरविली जाते व आपण आपल्यासाठी कोणते ध्येये निर्धारित केले पाहिजे ते ठरविले जाते. व्यापक दृष्ट्या दोन किंवा अनेक पर्यायांमधून आपल्याला निवड का करावी लागते याचे उत्तर मूल्यांमुळे मिळते. त्यांच्या द्वारे काय, परिस्थिती आणि कोणती गोष्ट कोणत्याप्रकारे करावी याला दिशा मिळते.

काही सामान्य मूल्ये जी नेहमी महत्त्वपूर्ण असतात, जसे : प्रामाणिकपणा, प्रेम, कला, आरामदायकता (सुख), आरोग्य, ज्ञान इत्यादी.

**व्याख्या :**

**निकेल व डॉर्सी, 'आपल्या इच्छा व मानवी परस्पर प्रक्रिया यातून मूल्ये निर्माण होतात. व्यक्ती व परिस्थिती यांच्यात जे कार्य घडून येते त्या कार्यातून मूल्यांची निर्मिती होते.'**

**'मूल्य म्हणजे जीवनातील आवश्यक गोष्टी ज्यांना आपण योग्य, इच्छित व इष्ट समजतो.'**

मानवाच्या वर्तनास प्रेरणा देणारी काही मूलभूत मूल्ये खाली दिल्याप्रमाणे आहेत.

**शोध घ्या :**

**अ) विविध प्रकारची मूल्ये व त्यांचे महत्त्व :**

**१) प्रेम :** मानवी संबंधातील एक मूलभूत घटक.

**२) आरोग्य :** शारिरीक व मानसिक सुस्थिती.

**३) महत्त्वाकांक्षा :** ध्येयातील यश संपादन.

**४) आराम :** जीवन जगण्यायोग्य समाधानकारक स्थिती व सोयी बनवणे.

**५) ज्ञान व चातुर्य :** सत्याचा शोध.

**६) तांत्रिक समाधान :** कुशल कारागिर.

**७) खेळ :** सर्जनात्मक व काल्पनिक क्रिया खेळाडू वृत्ती व संघटित कार्य.

**८) कला :** विविध प्रकारच्या सौंदर्य व कलात्मक अभिव्यक्ती मध्ये रुची.

**९) धर्म :** मानवीय जीवनाचा अध्यात्मिक आधार.

**१०) आदरातिथ्य :** आलेल्या पाहुण्यांचे आदरातिथ्य.

**माहीत करून घ्या :**

**ब) मूल्यांची वैशिष्ट्ये :**

- मूल्ये आपल्या जीवनाशी निगडित आहेत.
- मूल्ये आपल्या वर्तन, अभिवृत्ती, विचार व व्यक्तिमत्त्वावर परिणाम करतात.
- व्यक्तीची मूल्ये ही त्या व्यक्तीसाठी महत्त्वपूर्ण असतात.
- मूल्यांची निर्मिती विविध स्रोतांपासून होते व त्यांच्यावर विविध घटकांचा प्रभाव असतो.
- मूल्ये ही स्वनिर्मित व स्वविकसित असतात.
- मूल्ये ही नेहमी परिवर्तनशील असतात. वेळेनुसार व परिस्थितीनुसार मूल्ये सुधारू शकतात.
- मूल्ये सहजतेने बदलत नसतात. ते हळूहळू व क्रमानुसार काही वर्षांनी मूल्यांमध्ये बदल होण्याची शक्यता असते.
- मूल्यांची तीव्रता ही व्यक्तीनुरूप बदलते.

**माझ्या मनातील प्रश्न :**

**मूल्यांचे विविध स्रोत कोणते?**

**क) मूल्यांचे स्रोत :**

**यादी करा व चर्चा करा :**

- **कुटुंब :** कुटुंबांनी स्वीकारलेल्या मूल्यांचा बालकांवर परिणाम होतो. मूले ही मूल्ये हळूहळू आत्मसात करतात. मुलांनी मूल्ये आत्मसात करण्यासाठी योग्य वातावरण निर्माण करणे ही कुटुंबाची जबाबदारी असते. मुले प्रौढांचे अनुकरण करतात व काही विशिष्ट मूल्ये स्वीकारतात. जसे : स्नेहभाव, प्रेम, आराम, स्वास्थ्य, प्रामाणिकपणा व मोठ्यांचा आदर.
- **शाळा :** शाळेतील वातावरणामुळे मुलांच्या मूल्यांवर परिणाम होतो. विद्यार्थी भिन्न वातावरण, भिन्न स्वभावाचे, भिन्न आर्थिक आणि सामाजिक स्तरांचे असतात त्यामुळे त्यांची मूल्ये वेगळी असू शकतात.

  त्यांच्यामध्ये योग्य सहानुभूती, सहकार्य, त्याग, प्रामाणिकपणा इत्यादी मूल्यांचा विकास करणे ही शाळेची भूमिका असणे आवश्यक आहे.
- **धर्म :** धर्म व्यक्तीच्या मूल्यांवर परिणाम करतात, काही विशिष्ट मूल्ये सगळ्या धर्मांद्वारे आत्मसात केली जातात. जसे : प्रेम, प्रामाणिकपणा, सहानुभूती इत्यादी. भिन्न धर्मांद्वारे विविध मूल्यांचा प्रचार केला जातो.

**तुम्ही शोधू शकाल काय? :**
**भारतात कोणत्या विविध संस्कृतीचे अनुकरण केले जाते?**

- **संस्कृती :** विविध संस्कृतींमध्ये विभिन्न मूल्ये असतात. मुले त्या मूल्यांचा स्वीकार करतात ज्या संस्कृतीमध्ये ती वाढतात. उदाहरणार्थ : भारतीय संस्कृतीत वडिलधाऱ्यांचा मान राखावा, त्यांची आज्ञा पाळावी हे शिकविते.

  अशाप्रकारे मूल्ये ही समाज, अनुभव आणि मित्र अशा विविध स्रोतांद्वारे आत्मसात केली जातात.

**चर्चा करा :**

कोणती सामान्य मूल्ये समवयस्क गटामध्ये दिसतात?

## मूल्यांचे प्रकार :

**मूल्यांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करतात.**

**मूल्ये**

- **आंतरिक मूल्ये**
- **बाह्य मूल्ये**

- **आंतरिक मूल्ये :** ही मूल्ये महत्त्वपूर्ण व इच्छित असतात. त्यांना स्वत:चे असे महत्त्व असते. आंतरिक मूल्यांचे स्वतंत्र असे वेगळे अस्तित्व असते. ही मूल्ये प्रबळ असतात, प्रबळ भावना दर्शवितात व महत्वपूर्ण असतात. ही मूल्ये वैयक्तिक किंवा कौटुंबिक जीवनाच्या तत्त्वज्ञानापासून निर्माण होतात. उदाहरणार्थ : समुद्र किनाऱ्यावरून सूर्यास्ताचा आनंद घेणे.
- **बाह्य मूल्ये :** बाह्य मूल्ये ही इतर मूल्यांच्या प्राप्तीसाठी किंवा ध्येय प्राप्तीसाठी एक माध्यम आहे. या मूल्यांनाच 'साधनीभूत मूल्ये' असेही म्हणतात. ही मूल्ये देखील प्रबळ व महत्त्वपूर्ण असतात; परंतु ही मूल्ये आंतरिक मूल्यांना मदत करतात. उदा. : 'बुद्धी' आणि 'शिक्षण' ही एका व्यक्तीची मूल्ये आहेत. उच्च शिक्षण घेणे हे त्याचे ध्येय असेल. 'बुद्धी' हे ध्येय प्राप्तीसाठी आंतरिक मूल्य होईल. ध्येय प्राप्तीसाठी इतर मूल्ये जसे, आज्ञाधारकपणा, वक्तशीरपणा, मेहनत, नियमितपणे वर्गात हजर राहणे व मन लावून अभ्यास करणे इत्यादी ही मूल्ये बाह्य किंवा साधनीभूत मूल्ये आहेत.

## मूल्यांचा शोध घ्या :

| | आंतरिक मूल्य | बाह्य मूल्य |
|---|---|---|
| वैयक्तिक | | |
| कुटुंब | | |
| समवयस्क | | |
| शेजारी | | |

## २.२ ध्येय किंवा उद्दिष्टे :

**नेहमी लक्षात ठेवा :**

ध्येय म्हणजे व्यक्ती किंवा कुटुंबाच्या अशा इच्छा किंवा उद्दिष्टे ज्यासाठी व्यक्ती किंवा कुटुंब कार्य करायला तयार असतात. व्यक्ती ज्या एखाद्या कार्याकरिता प्रोत्साहित होते ते कार्य म्हणजे त्या व्यक्तीचे ध्येय असण्याचा संभव असतो. सभोवतालच्या सामाजिक वातावरणाचा ध्येयांवर परिणाम होतो. आपल्या भोवतालचे लोक ध्येयाची निवड करण्यास किंवा ती साध्य करण्यास व्यक्तीला प्रवृत्त करतात किंवा परावृत्त करतात.

ध्येये ही आपल्या इच्छा, मूल्ये, अनुभव, वातावरण व अभिवृत्तीपासून निर्माण होतात. ती आपल्या जीवनात अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. ध्येय प्राप्तीकरिता संपूर्ण कुटुंब प्रयत्न करतात. ध्येयाला साध्य करण्याकरिता प्रभावशाली व्यवस्थापन आवश्यक आहे.

**हे माहीत करून घ्या :**

**व्याख्या :**

**मेलन आणि मेलन च्या मते :**

'ज्या उद्दिष्टांच्या परिपूर्तीसाठी आपण झटून मेहनत करतो आणि सतत कार्यरत असतो त्यांना ध्येय म्हणतात.'

**निकेल आणि डॉर्सीच्या मते :**

'सामान्य अर्थाने ध्येय हा असा शेवटचा बिंदू असतो, की त्यास प्राप्त करण्यासाठी व्यक्ती किंवा कुटुंब कार्य करते.'

**ध्येयाचे प्रकार**

- **व्यक्तींच्या समाविष्ट संख्येनुसार**
  - वैयक्तिक ध्येये
  - सामूहिक ध्येये
- **साध्य करण्यासाठी लागणाऱ्या वेळेनुसार/कालावधीनुसार**
  - मध्य-अंत ध्येये
  - माध्यमिक ध्येये
  - अल्पकालीन ध्येये
  - दीर्घकालीन ध्येये

**भावंडे, समवयस्क गट आणि स्वत:ची ध्येये ओळखा :**

- पत्र लिहणे.
- इयत्ता एच.एस.एस.सी. पूर्ण करणे.
- सिनेमाला जाणे.
- घर विकत घेणे.
- सहलीचे आयोजन करणे.

**ध्येयांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले आहे :**

**अ) व्यक्तींच्या समाविष्ट संख्येनुसार :**

- **वैयक्तिक ध्येये :** ही ध्येये व्यक्तीद्वारे ठरविली जातात. प्रत्येक व्यक्तीची ध्येये वेगवेगळी असू शकतात. त्याची/तिची ध्येये प्राप्त करण्याकरिता व्यक्ती प्रयत्नशील असतात. वैयक्तिक ध्येये लवकर घेतली जातात. उदाहरणार्थ : परीक्षेत उत्तम गुण प्राप्त करणे, मित्रांकरिता भेट वस्तू घेणे.
- **सामूहिक ध्येये :** अनेक व्यक्ती या प्रकारच्या ध्येयांमध्ये समाविष्ट असतात. समूहातील प्रत्येक व्यक्ती या ध्येय प्राप्तीसाठी मेहनत करतात. समूहातील प्रत्येक सदस्याला प्रेरणा देण्याची महत्त्वपूर्ण भूमिका समूह प्रमुखाची असते. सामूहिक ध्येयांना वेळ अधिक लागतो. उदाहरणार्थ : सहलीचे नियोजन, कॉलेज डे साजरा करणे इत्यादी.

**ब) कालावधीनुसार/साध्य करण्यासाठी लागणाऱ्या वेळेनुसार :**

- **मध्य-अंत ध्येये :** या प्रकारची ध्येये कमी असतात. माध्यमिक ध्येयांच्या प्राप्तीसाठी घेण्यात येणारे निर्णय किंवा पायऱ्या म्हणजे मध्य-अंत ध्येये होत. अशी अनेक ध्येये असतात, ज्यात अंत सामावलेला असतो. लहान लहान गोष्टींनंतर ते पूर्णत्वास जाते. उदाहरणार्थ : एखादी गृहिणी घर सुंदर ठेवण्याचे माध्यमिक ध्येय बाळगेल तर त्या ध्येयाची लगेच पूर्ती करण्यासाठी ती गृहिणी घर झाडेल, धूळ झटकेल, फरशी पुसेल, फर्निचर व्यवस्थित लावेल इत्यादी. या सर्व गोष्टींचे एकत्रित पालन करून घर सुंदर ठेवण्याचे माध्यमिक ध्येय ती पूर्ण करेल.
- **माध्यमिक ध्येये :** माध्यमिक ध्येय म्हणजे अल्पकालीन व दीर्घकालीन ध्येयांना जोडणारी कडी आहे. या ध्येयांना निश्चित वैशिष्ट्ये असतात व जीवनातील अंतिम ध्येय प्राप्तीसाठी ती कारणीभूत असतात. माध्यमिक ध्येय प्राप्तीकरिता लागणारा वेळ अल्पकालीन ध्येयापेक्षा अधिक असतो. माध्यमिक ध्येय प्राप्तीसाठी काही महिने किंवा वर्ष लागतात. उदाहरणार्थ : पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना काही वर्षांचा कालावधी लागतो. या संपूर्ण कालावधीत प्रत्येक वर्षाच्या वर्गाचे नियोजन करणे अवघड असते. ही ध्येये अल्पकालीन ध्येयाइतकी स्पष्ट नसतात. अल्पकालीन ध्येयाप्रमाणे माध्यमिक ध्येये देखील दीर्घकालीन ध्येय प्राप्तीसाठी मदत करतात.
- **अल्पकालीन ध्येये :** अल्पकालीन ध्येये ही कमी किंवा अल्प वेळात साध्य केली जातात. ही काही वेळाचे, दिवसाचे किंवा आठवड्याची असतात. ही ध्येये स्पष्ट स्वरूपाची व स्पष्टपणे निर्धारित केलेली असवी. ही ध्येये नेहमी असंख्य असतात. ही स्पष्ट स्वरूपाची असल्यामुळे त्यांना साध्य करणे सोपे असते. उदाहरणार्थ : गृहपाठ पूर्ण करणे, खरेदी करायला जाणे इत्यादी.
- **दीर्घकालीन ध्येये :** दीर्घकालीन ध्येये प्राप्त करण्यासाठी मोठ्या कालावधीची गरज असते. ही ध्येये कुटुंबाच्या जीवनाला खरा अर्थ देतात. दीर्घकालीन ध्येये नजीकच्या भविष्यकाळात साध्य होण्याची शक्यता नसते त्यामुळे त्यांच्यात स्पष्टता असण्याची शक्यता कमी असते. ती अत्यंत जटील असतात आणि ते प्राप्त करण्यासाठी विविध प्रकारच्या क्रियांची आणि साधनांची आवश्यकता असते. दीर्घकालीन ध्येये एक किंवा एकापेक्षा जास्त असू शकतात. उदाहरणार्थ, घर बांधणे, लग्न करणे इत्यादी.

**आपली बुद्धी वापरा :**

**तुमच्या आणि कुटुंबाच्या ध्येयांची सूची करा :**

| | |
|---|---|
| मध्य-अंत ध्येये | |
| अल्पकालीन ध्येये | |
| माध्यमिक ध्येये | |
| दीर्घकालीन ध्येये | |

## २.३ स्तर :

**नेहमी लक्षात ठेवा :**

स्तर म्हणजे वस्तू किंवा कार्यपद्धतीच्या मोजमापनाचे साधन आहे. व्यक्तीला आणि कुटुंबाला मान्य असे कार्य विशिष्ट पद्धतीने करण्याची सवय असते. ध्येय प्राप्तीकरिता मनाने स्वीकृत केलेल्या कार्यांचे स्तर होय. स्तर हे मूल्ये व ध्येयांपेक्षा निश्चित व स्पष्ट स्वरूपाची असतात.

स्तराचा उपयोग तुलनात्मक मापनासाठी केला जाऊ शकतो. उदाहरणार्थ : मध्यम स्तर आणि उच्च स्तरातील कुटुंबाचे राहणीमान. आपल्या मनाने स्वीकृत केलेली मनाला साजेशी कामाची एक प्रतिकृती म्हणजे स्तर होय.

**निकेल व डॉर्सीच्या मतानुसार :**

'स्तर म्हणजे मूल्यमापनांचा संच जो आपल्या मूल्यप्रणालीतून उगम पावतो. त्यामुळे एखाद्या गोष्टीबद्दल रुची किंवा आवड वाढीस लागते व त्यापासून आपल्याला समाधान प्राप्त होते.'

**फ्लॉरेन्स आणि वॉकरच्या मते :**

'स्तराला मूल्यांकनाचा पाया समजला जातो.'

### स्तरांचे वर्गीकरण :

**चर्चा करा :**

ग्रॉस व क्रँडल यांच्यानुसार स्तरांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

अ) पारंपरिक स्तर

ब) लवचिक स्तर

क) वैयक्तिक स्तर

**अ) पारंपरिक स्तर :** पूर्वापार चालत आलेल्या रूढीबद्ध पद्धतीने बहुतांशी सामाजिक समूहाने स्वीकारलेला स्तर म्हणजे परंपरागत स्तर होय. जो पिढ्यानपिढ्या व्यक्तीने स्वीकृत केला आहे. हे निर्धारित असतात व त्यात परिवर्तन होऊ शकत नाही. आवश्यकता असल्यास व्यक्ती स्तराला अनुकूल असे बदल स्वत:मध्ये करून घेईल, परंतु स्तरामध्ये व्यक्तीकरिता परिवर्तन होणार नाही. उदाहरणार्थ : दिवाळीकरिता गोड पदार्थ बनविणे.

**ब) लवचिक स्तर :** या प्रकारच्या स्तरामध्ये व्यक्ती ही केंद्र बिंदू असते. लवचिक स्तरामुळे परिस्थितीनुसार बदल करून आपल्या आवश्यकता पूर्ण करता येतात. या स्तरामध्ये मनुष्याच्या आवश्यकतेनुसार परिवर्तन केले जाऊ शकते. लवचीक स्तर अधिक स्वातंत्र्य देतात ज्यामुळे आपले जीवन अत्यंत आरामदायक होते.

उदाहरणार्थ : नवविवाहित स्त्री इस्त्री केलेले वस्त्र घालते, परंतु अपत्य झाल्यावर हा स्तर कायम ठेवणे अशक्य असते.


**क) वैयक्तिक स्तर :** प्रत्येकाचा वैयक्तिक स्तर निश्चित असतो. हे स्तर पारंपारिक किंवा लवचिक असू शकतात, कारण हे व्यक्तीने आपल्या सुविधेप्रमाणे त्याच्या/तिच्या गरजेप्रमाणे, युक्तीप्रमाणे आणि सोयीप्रमाणे निवड करून ठरविलेले असतात. वैयक्तिक स्तर हे परिस्थिती किंवा उपलब्ध संसाधनामुळे बदलू शकतात. उदाहरणार्थ, दररोज योगाभ्यास करणे किंवा ध्यानसाधना करणे.

**यादी करा :**


| | |
|---|---|
| पारंपरिक स्तर | |
| लवचिक स्तर | |
| वैयक्तिक स्तर | |

## २.४ मूल्ये, ध्येये आणि स्तर यामधील परस्पर संबंध :

मूल्ये, ध्येये आणि स्तरांचे व्यवस्थापनाचे नियोजन किंवा प्रेरक घटक असून त्यांचा परस्पर संबंध असतो.




आकृती २.४ (अ) उदाहरण मूल्ये, ध्येये व स्तरातील सहसंबंध दर्शविते.





**आकृती २.४ (ब) उदाहरण मूल्ये, ध्येये स्तरातील सहसंबंध दर्शविते.**

मूल्ये, ध्येये आणि स्तर संकल्पनेचा जवळचा संबंध आहे. व्यवस्थापनेत मूल्ये हा मुख्य प्रेरक घटक आहे. मूल्ये ही कुटुंब, शेजार, मित्र, समाज, व वातावरण इत्यादी द्वारे विकसित होतात व ध्येये निर्मितीकरिता मदत करतात. मूल्यांमुळे ध्येय व स्तर निश्चित होतात. व्यक्तींची मूल्ये ध्येये व स्तर यांमुळे बदलतात. मूल्ये व ध्येये हे स्तर निश्चित करण्यासाठी एकत्रित कार्य करतात. त्यांच्यामुळे आपले, कोणते स्तर निश्चित आहे व कोणते परिवर्तनशील आहे हे माहीत होते.

मूल्ये, ध्येये आणि स्तर हे केवळ आपल्या जीवनावर परिणाम करत नाहीत तर ते आपल्या व्यवस्थापन प्रक्रियेवर आणि निर्णय प्रक्रियेवर परिणाम करतात. ध्येये ही कार्याच्या अगोदर निश्चित केली जातात. ध्येयांमुळे व्यक्ती प्रेरित होते म्हणून व्यक्ती योग्य निर्णय घेऊ शकते. अर्थात स्तर कार्याचे मूल्यमापन करतात. निर्णय प्रक्रियेमध्ये हे तीन घटक योग्य मार्ग दाखवितात. उदाहरणार्थ : एखाद्या विद्यार्थ्याचे ध्येय पुष्परचना शिकणे हे असेल तर पुष्परचना वारंवार करून बघेल आणि केलेल्या रचनेतून पुष्परचनेचा स्तर लक्षात येईल आणि कलात्मक मूल्य दर्शविले जाईल.

अशाप्रकारे मूल्ये, ध्येये व स्तर या संकल्पना भिन्न असल्या तरी त्यांच्यात घनिष्ठ संबंध असतो. या तीनही घटकांच्या कार्यात योग्य संबंध असेल तर यश मिळेल म्हणून हे तीनही घटक व्यवस्थापनेचे प्रेरक किंवा निर्णायक घटक असून सहसंबंधित आहेत.

मूल्ये, ध्येये व स्तर सहसंबंध दर्शवणारे उदाहरण द्या.




## तुम्हाला आठवतंय काय ?

- मूल्ये, ध्येये व स्तर हे घटक व्यवस्थापन प्रक्रिया आणि निर्णय प्रक्रियेवर नेहमीच प्रभाव टाकतात.
- मूल्ये ही आपल्या जीवनात मुख्य तत्त्वज्ञान व प्रेरणा देणारे घटक आहेत.
- मूल्यांना, आंतरिक व बाह्य प्रकारे वर्गीकृत केले आहे.
- ज्या उद्दिष्टांच्या परिपूर्तीसाठी आपण झटून मेहनत करतो आणि सतत कार्यरत असतो त्यांना ध्येय म्हणतात.
- ध्येयांचे अल्पकालीन ध्येये, दीर्घकालीन ध्येये, व्यक्तिगत ध्येये, सामूहिक ध्येये, मध्य-अंत ध्येये असे प्रकार आहेत.
- आपल्या मनाने स्वीकृत केलेली, मनाला साजेशी कामाची एक प्रतिकृती म्हणजे स्तर होय.
- स्तराचे वर्गीकरण, परंपरागत स्तर, लवचीक स्तर, वैयक्तिक स्तर असे तीन प्रकारे केले जाते.
- परंपरागत स्तर निर्धारित असतात व त्यांच्यात परिवर्तन होऊ शकत नाही.
- लवचीक स्तर आपल्या परिस्थितीनुसार, आवश्यकता पूर्ण करतात. वैयक्तिक स्तर हे स्वत: निश्चित केले जातात.
- मूल्ये, ध्येये आणि स्तर यामध्ये परस्पर संबंध आहे. ध्येय व स्तर ही मूल्यांची शाखा आहे.

## स्वाध्याय

- **वस्तुनिष्ठ प्रश्न :**

**१) बहुपर्यायी प्रश्न :**

१. खालीलपैकी व्यवस्थापनेचे हे प्रेरक घटक आहेत.

अ) नियोजन, नियंत्रण, मूल्यांकन

ब) मूल्य, ध्येय, स्तर

क) मूल्य, नियोजन, मूल्यांकन

२. मूल्ये जी महत्त्वपूर्ण व इच्छित असतात त्या मूल्यांना – – म्हणतात.

अ) आंतरिक मूल्ये

ब) बाह्य मूल्ये

क) साधनीभूत मूल्ये

३. विद्यार्थ्यांचे परीक्षेत प्रथम क्रमांक प्राप्त करणे हे कोणत्य प्रकारचे ध्येय आहे?

अ) व्यक्तिगत ध्येय

ब) सामूहिक ध्येय

क) सर्वसाधारण ध्येय

४. पारंपरिक स्तर हे मुख्यत: – स्वरूपाचे असतात.

अ) परिवर्तनशील

ब) तटस्थ

क) कायम

**२) खालील वाक्य चूक किंवा बरोबर ते कारणासह सांगा.**

अ) मूल्ये आपली ध्येये निश्चित करतात परंतु स्तर नाही.

ब) मूल्ये व ध्येयांपेक्षा स्तर लवकर दिसतो.

क) पारंपरिक स्तर लवकर बदलू शकतात.

ड) प्रत्येक व्यक्तीची ध्येये सारखी असतात.

इ) परिवर्तनशील स्तर बदलू शकत नाही.

फ) ध्येये व स्तर स्थापित करण्यासाठी मूल्ये मदत करीत नाहीत.

- **लघुत्तरी प्रश्न :**

**१) अंतर स्पष्ट करा :**

अ) अल्पकालीन लक्ष्य व दीर्घकालीन लक्ष्य

ब) आंतरिक व बाह्य मूल्ये

क) पारंपरिक व परिवर्तनशील स्तर

ड) व्यक्तिगत व सामूहिक ध्येये

**२) टिपा लिहा.**

अ) आंतरिक मूल्य

ब) बाह्य मूल्य

क) अल्पकालीन ध्येय

ड) माध्यमिक ध्येय

इ) स्तराचे प्रकार

- **दिर्घोत्तरी प्रश्न :**

अ) विविध प्रकारचे मूल्यांचे स्रोत लिहा.

ब) मूल्यांचे प्रकार व वैशिष्ट्ये लिहा.

क) ध्येयाची व्याख्या व प्रकार लिहा.

ड) स्तराची व्याख्या व वर्गीकरण स्पष्ट करा.

- **प्रकल्प :**

अ) विद्यार्थी स्वरूपात मूल्यांची सूची तयार करा.

ब) विद्यार्थ्यांनी तयार/निर्मित केलेल्या ध्येयांची सूची तयार करा.

क) तुमच्या प्राधान्याप्रमाणे मूल्यांची सूची तयार करा.

ड) तुमच्या कुटुंबाकरिता परिवर्तनशील व पारंपरिक स्तर शोधा.

❑❑❑

# ३. व्यवस्थापन प्रक्रिया

३.१ व्यवस्थापन प्रक्रियेची ओळख

३.२ व्यवस्थापन प्रक्रियेमधील पायऱ्या

- नियोजन
- नियंत्रण
- मूल्यांकन

३.३ नियोजन, नियंत्रण आणि मूल्यांकन यामधील सहसंबंध

## ३.१ व्यवस्थापन प्रक्रियेची ओळख :

**तुम्हाला माहीत आहे का? :**

कुटुंब हा समाजाचा मूलभूत घटक आहे. हा दोन किंवा अधिक सदस्यांचा असा गट आहे की ज्यामध्ये ते एक घर वापरतात आणि रक्त, लग्न किंवा दत्तक घेणे याद्वारे परस्परांशी संबंधित असतात. घरामध्ये, गट म्हणून ते विविध साधने जसे – पैसे, भौतिक वस्तू, विविध उपकरणे, वाहने, सेवा-वीज, वातानुकुलन यंत्रणा इत्यादी सामयिकपणे वापरतात. अशी सर्व साधने मर्यादित असतात. याठिकाणी व्यवस्थापनाची आवश्यकता समजते, कुटुंबामधील सदस्य त्यांच्या एकत्रित उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी कार्य करतात, उदाहरणार्थ : घर बांधणे, गाडी विकत घेणे इत्यादी. यासाठी क्रियांच्या नियोजनाचा आराखडा तयार करणे, जबाबदाऱ्या सोपविणे, उपलब्ध मानवीय आणि अमानवीय साधनांचे संघटन आणि नियंत्रण करणे आवश्यक ठरते, याठिकाणी, कार्यक्षम आणि प्रभावी व्यवस्थापनाची भूमिका निर्णायक ठरते. व्यवस्थापन हे उपलब्ध साधनसंपत्ती कौटुंबिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी वापरण्याचे एक साधन ठरते. ज्याची परिणीती कुटुंबाला समाधान आणि आनंद मिळण्यात होते. साधनांच्या परिणामकारक उपयोगाची मदत कुटुंबातील सदस्यांचा सर्वसाधारण विकास आणि आयुष्याचा दर्जा सुधारणे यासाठी होते.

**हे लक्षात ठेवा :**

कुटुंबातील सदस्यांना अत्यंत समाधान देण्यासाठी घराचे चोवीस तास व्यवस्थापन करावे लागते. प्रत्येक स्त्री ही काही प्रमाणात गृह-व्यवस्थापक असते. कुटुंबातील सदस्यांना जास्तीत जास्त समाधान मिळवून देण्यासाठी ती अनेक साधने हाताळते आणि त्यांचे व्यवस्थापन करते जसे – पैसा, ऊर्जा, वेळ, (समय) कौशल्ये, क्षमता, बुद्धी, उपकरणे इत्यादी साधने. अनेक क्रिया करताना व्यवस्थापन प्रक्रिया जाणतेपणी किंवा अजाणतेपणी दररोज वापरली जाते. काही वेळा क्रिया अतिशय साधी/सोपी असेल, जसे – महिन्याभरासाठी किराणा आणणे अशा वेळी व्यवस्थापन प्रक्रिया अजाणतेपणी वापरली जाते. परंतु वाढदिवसाच्या पार्टीचे घरामध्ये आयोजन करणे यासारख्या क्रियेचे आयोजन करण्यासाठी व्यवस्थापन प्रक्रियेचा शास्त्रोक्त पद्धतीने उपयोग करणे आवश्यक ठरते. ज्यामध्ये उद्दिष्ट प्राप्तीसाठी जाणीवपूर्वक निर्णय घ्यावे लागतात. यापूर्वीच्या धड्यामध्ये आपण व्यवस्थापनाची संकल्पना आणि अर्थ पाहिला आहे. या धड्यामध्ये व्यवस्थापन प्रक्रियेवर भर दिला आहे.

## ३.२ व्यवस्थापन प्रक्रियेच्या पायऱ्या :

**हे नेहमी लक्षात ठेवा :**

व्यवस्थापन प्रक्रियेमध्ये तीन मूलभूत पायऱ्या समाविष्ट आहेत त्या म्हणजे : नियोजन, नियंत्रण आणि परिणामाचे मूल्यांकन करणे.

उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी व्यवस्थापन प्रक्रियेतील पायऱ्यांचा उपयोग करणे आवश्यक असते. नियोजन क्रिया सुरू करण्यापूर्वी केले जाते, नियंत्रण क्रिया चालू असताना केले जाते आणि मूल्यांकन क्रिया पूर्ण झाल्यानंतर केले जाते.

यामुळे, असे म्हणता येईल की या तीन पायऱ्या काळाच्या क्रमानुसार येतात.

- नियोजन भविष्यकाळासाठी केले जाते. क्रिया करण्यापूर्वी केले जाते.

- नियंत्रण वर्तमान काळामध्ये केले जाते. क्रिया चालू असतांना केले जाते.
- मूल्यांकन क्रिया झाल्यानंतर केले जाते – क्रिया पूर्ण झाल्यानंतर केले जाते.

उदाहरणार्थ, विद्यार्थांच्या गटाला येणाऱ्या रविवारी सिनेमा पाहण्यास जायचे असेल तर ते त्याचे नियोजन आधीच्या रविवारी करतील. सिनेमाला जाताना आणि सिनेमा पाहत असताना या नियोजनाचे नियंत्रण करतील. सिनेमा पाहून आल्यानंतर मागे वळून पाहतील आणि सिनेमाचा सर्वांना आनंद मिळाला का? काही समस्या आली का? हे शोधून काढतील.

### अ) नियोजन :

**आपण चर्चा करू :**
नियोजन म्हणजे काय?

**नियोजनाची व्याख्या अशी सांगता येईल – 'उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी योजना आखणे'**

व्यवस्थापन प्रक्रियेमधील ही पहिली आणि महत्त्वाची पायरी आहे. ही पायरी व्यवस्थापन प्रक्रियेची परिणात्मकता ठरविते. उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी किंवा एखादी समस्या सोडविण्यासाठी योग्य उपाय किंवा पद्धत निवडण्याची ही मानसिक प्रक्रिया आहे. यामध्ये भविष्यकाळातील क्रियेसाठी निर्णयांची शृंखला तयार करणे समाविष्ट असते. निर्णय घेणे हा नियोजनाचा महत्त्वाचा भाग आहे ज्यायोगे उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी सर्वोत्तम पद्धत स्पष्टपणे आणि सविस्तरपणे तयार केली जाते.

नियोजन हे क्रिया सुरू करण्यापूर्वी केले जाते. या वास्तविकतेमध्येच त्याचे महत्त्व समाविष्ट केलेले आहे.

**आपण चर्चा करू :**
नियोजनामध्ये उपयुक्त असलेल्या क्षमता :

- **विचारशक्ती आणि स्मरणशक्ती :** भूतकाळामधील अनुभव आठवणे आणि त्याचा विचार करणे या क्षमतेचा उपयोग आणि फायदा करून घेऊन गृहिणी अधिक चांगले नियोजन करू शकते.
- **निरीक्षण क्षमता :** भूतकाळामध्ये शिकलेल्या गोष्टींचे निरीक्षण तसेच आपल्या सभोवती असलेल्या व्यक्ती त्यांच्या उद्दिष्ट पूर्ततेसाठी कार्य करीत असताना त्यांचे निरीक्षण यांचा उपयोग गृहिणी स्वत:च्या नियोजनासाठी करू शकते.
- **तर्कशक्ती आणि विश्लेषणात्मक क्षमता :** गृहिणीची तर्कशक्ती आणि तिची विश्लेषणात्मक क्षमता यांची मदत तिला उपलब्ध पर्यायांचे गुणधर्म पाहून त्यांचा प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी होते.

**नेहमी लक्षात ठेवा :**
वरील सर्व क्षमता, एखाद्या परिस्थितीला परिपूर्णपणे न्याय देण्यासाठी चांगले आणि कार्य करण्यायोग्य नियोजन तयार करण्यासाठी मदत करतात.

**तुम्हाला माहीत आहे का?**
**नियोजनाच्या पायऱ्या :**

**खालील तीन प्रमुख पायऱ्या आहेत :**

१. **समस्या ओळखणे किंवा साध्य करण्याचे उद्दिष्ट ओळखणे :** कुटुंबातील सदस्यांनी समस्या किंवा उद्दिष्ट नीट ओळखणे किंवा समजून घेणे आवश्यक असते ज्यामुळे समस्या निवारण किंवा उद्दिष्ट पूर्तीसाठी एकत्रित प्रयत्न करणे शक्य होईल. उदाहरणार्थ : कुटुंबाने गाडी विकत घेण्याचे उद्दिष्ट ठरविले असल्यास ते सर्वांनी मान्य केले पाहिजे ज्यायोगे त्याच्या पूर्ततेसाठी सर्व प्रयत्न केले जातील.

२. **विविध पर्याय शोधणे :** एकदा समस्या किंवा उद्दिष्ट समजले की कुटुंबातील सदस्यांनी पर्याय शोधण्यास सुरुवात केली पाहिजे. वर दिलेल्या उदाहरणासाठी कुटुंब विविध पर्याय शोधते, जसे – पुनर्विक्रीसाठी उपलब्ध असलेली गाडी विकत घेणे, पेट्रोलवर चालणारी नवी गाडी विकत घेणे, डिझेलवर चालणारी नवी गाडी घेणे, गॅसवर चालणारी किंवा वीजेवर चालणारी गाडी विकत घेणे इत्यादी.

३. **पर्यायांपैकी एक पर्याय निवडणे :** शोधलेल्या प्रत्येक पर्यायाचा विचार करणे, प्रत्येकाचे फायदे आणि तोटे शोधणे आवश्यक असते. याचाच अर्थ मानसिक दृष्ट्या प्रत्येक पर्यायाचा सखोल विचार करणे. या पायरीनंतर निवड स्पष्टपणे दर्शविली जाते.

**या पायऱ्यांव्यतिरिक्त नियोजनामध्ये आणखी तीन पायऱ्यांचा समावेश असतो :**

अ) नियोजनाच्या विविध भागांमध्ये प्राधान्यक्रम ठरविणे, ज्यायोगे आवश्यकता भासल्यास नियोजनाचा काही भाग वगळणे शक्य होते.

ब) नियोजनाच्या विविध भागांमध्ये समन्वय राखणे.

क) नियोजनाप्रमाणे कार्य करण्यासाठी वेळेचा क्रम ठरविणे.

**एखादे उदाहरण शोधून काढा आणि त्यामध्ये नियोजनाच्या पायऱ्या ओळखा.**

**नियोजनाची वैशिष्ट्ये :**

**खालील वैशिष्ट्ये लक्षात ठेवा :**

- **लवचिकता :** नियोजनामध्ये आवश्यक असलेले बदल करता यावेत यासाठी नियोजन, तसेच नियोजन करणारी व्यक्ती लवचिक असावी. परिस्थिती, उद्दिष्टे आणि संसाधनांची उपलब्धता यामध्ये बदल झाल्यास नियोजनामध्ये बदल करणे आवश्यक असते. असे बदल करणे, जर नियोजन आणि नियोजन करणारी व्यक्ती लवचिक असेल तरच शक्य असते. उदाहरणार्थ : घरकाम करणारी बाई येऊ शकणार नाही असा निरोप मिळाल्यानंतर गृहिणी खरेदीसाठी बाहेर जाण्याचे नियोजन पुढील आठवड्यापर्यंत पुढे ढकलते जेणे करून ती घरची सर्व कामे पूर्ण करू शकेल.
- **वास्तविकता :** उपलब्ध संसाधने वापरण्याच्या दृष्टिकोनातून नियोजन वास्तविक असावे. उदाहरणार्थ : ऑफिसमधील नेहमीचा वेळ संपल्यानंतर थांबून जास्तीचे काम करण्याचे नियोजन मान्य करण्यापूर्वी गृहिणीने स्वत:चा वेळ आणि ऊर्जा या मानवीय साधनांवरील मर्यादा समजून घेतल्या पाहिजेत.
- **अनुरूपता :** ज्या व्यक्तीसाठी नियोजन तयार केले आहे तिच्यासाठी ते अनुरूप असावे. त्या व्यक्तीच्या आवडी निवडी, सवयी विचारात घेतल्या पाहिजेत. उदाहरणार्थ : तासभर किंवा त्यापेक्षा थोडा जास्त वेळ अभ्यास केल्यानंतर थोडा वेळ खंड घेण्याची सवय असलेल्या विद्यार्थ्यांसाठी एकसलग काही तास अभ्यास करण्याचे नियोजन अवघड वाटेल.

**तुमची बुद्धी वापरा :**
वर शिकलेल्या प्रत्येक वैशिष्ट्यासाठी एक उदाहरण शोधून काढा.

**हे समजून घ्या :**
व्यवस्थापन प्रक्रियेमधील नियोजनाचे महत्त्व.

- नियोजनामुळे भविष्यकाळातील क्रियेसाठी अनुमान वर्तविण्यास मदत होते.
- उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी कोणत्या क्रिया पार पाडाव्या लागतील ते समजण्यासाठी नियोजनाची मदत होते.
- नियोजनामध्ये समस्या सोडविण्याचा समावेश असतो. त्यामुळेच नियोजन समस्या सोडविण्यासाठी किंवा उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मार्गदर्शक ठरते.
- उपलब्ध असलेली संसाधने उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी परिणामकारकपणे वापरणे व्यक्तीला किंवा कुटुंबाला नियोजनामुळेच शक्य होते.
- व्यवस्थापनाच्या इतर क्रिया जसे – संघटन, नियंत्रण आणि मूल्यांकन यांच्यासाठी नियोजन आधारभूत ठरते.

**चला, नियंत्रण या पायरीची चर्चा करू :**

नियंत्रण ही व्यवस्थापन प्रक्रियेमधील दुसरी पायरी आहे. त्याची व्याख्या – **'नियोजन कार्यरत करणे आणि जेव्हा आणि जिथे आवश्यक असेल तिथे त्याचे समायोजन करणे'** अशी केली जाते. याचा साधा सोपा अर्थ असा की नियोजनाप्रमाणे काम सुरू करणे आणि जेव्हा आणि जिथे आवश्यकता असेल तिथे नियोजनामध्ये समायोजन करणे. याचाच अर्थ नियोजन कार्यरत करण्यासाठी वैयक्तिक आणि सामूहिक प्रयत्न करणे. जेव्हा. व्यक्तीने स्वत: कार्य करण्यासाठी स्वत: नियोजन केलेले असते, तेव्हा नियोजनाप्रमाणे कार्य सुरू करण्यासाठी स्वत:ला प्रेरणा देणे आवश्यक असते तसेच काही वेळा कार्य सुरू असताना देखील प्रेरणा देणे आवश्यक ठरते. ज्यावेळी समूहाच्या उद्दिष्ट प्राप्तीसाठी नियोजन केले जाते त्यावेळी समूहामधील व्यक्तींच्या एकत्रित प्रयत्नांची तसेच योग्य नेतृत्वाची आवश्यकता असते. उदाहरणार्थ : दिलेल्या तारखेपूर्वी समूहाचा प्रकल्प पूर्ण करणे.

**नेहमी लक्षात ठेवा :**

- अनेक वेळा, अनेक प्रकारचे नियोजन केले जाते परंतु त्यानुसार कार्य केले जात नाही. नियंत्रण ही पायरी नियोजन कार्यरत करण्यासाठी महत्त्वाची असते.
- काही लोकांना असे वाटते की, नियंत्रण म्हणजे केवळ नियोजनाप्रमाणे कार्य करणे होय, परंतु काही वेळा नियोजनामध्ये सुधारणा करणे आणि ते नियंत्रित करणे आवश्यक ठरते.
- अनेक नवे निर्णय घ्यावे लागतात, विशेषत: जर परिस्थिती किंवा उपलब्ध संसाधनांमध्ये बदल झाला असेल तर उदाहरणार्थ : दुसऱ्या दिवशी असलेल्या मित्र किंवा मैत्रिणीच्या वाढदिवसासाठी काही विशिष्ट भेटवस्तू मनात ठेऊन एखादी व्यक्ती खरेदीसाठी बाजारात जाते. बाजारात सद्ध्या ती वस्तू उपलब्ध नाही असे तिला समजते. अशा वेळी आपल्या बजेटमध्ये बसेल अशी दुसरी वस्तू घेण्याचा नवा निर्णय आयत्यावेळी घ्यावा लागतो.
- व्यक्तीजवळ विचार करण्यासाठी तत्पर मन आणि उपलब्ध पर्यायांचे ज्ञान असले पाहिजे. जर व्यक्तीला उपलब्ध असलेले अनेक पर्याय माहीत असतील तर नियोजनामध्ये त्वरित अणि समयोचित समायोजन करणे सोपे जाते आणि नियंत्रणाची या प्रक्रियेमध्ये व्यक्तीला मदत होते.

**नियंत्रणाच्या अवस्था :** ज्यावेळी नियोजनाप्रमाणे कार्य सुरू केले जाते त्यावेळी ते कार्यरत राहण्यासाठी सविस्तरपणे निर्णय घेणे आवश्यक असते. जेव्हा नियोजनामध्ये समाविष्ट नसलेल्या व्यक्तींना नियोजनाप्रमाणे कार्य करण्याची जबाबदारी दिलेली असेल तेव्हा ही गोष्ट अधिकच महत्त्वाची ठरते. सविस्तरपणे निर्णय घेणे हे नियंत्रणाच्या अवस्थांशी निगडित असते. प्रेरणा देणे, तपासणी करणे आणि समायोजन करणे या नियंत्रणाच्या अवस्था आहेत.

**खालील अवस्था समजून घ्या :**

i. **प्रेरणा देणे :** प्रेरणा देणे याचा अर्थ क्रिया सुरू करणे आणि कार्यरत राहणे असा आहे. प्रेरणा देणे, व्यवस्थापनामध्ये खूप महत्त्वाचे असते. अनेक वेळा नियोजन केले जाते परंतु ते कार्यान्वित केले जात नाही. नियोजन खूप चांगले, वास्तविक आणि लवचिक असेल परंतु त्याप्रमाणे अंमलबजावणी होत नसेल, अशा वेळी 'प्रेरणा देणे' महत्त्वाचे ठरते, दीर्घकालीन उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी अनेक अल्पकालीन उद्दिष्टे तयार करता येतात. अशी अल्पकालीन उद्दिष्टे तयार करण्याचे काही ठरावीक फायदे आढळून येतात. त्यांच्या निर्मितीमुळे दीर्घकालीन उद्दिष्टे मूर्त स्वरूपात आणली जातात आणि त्यांना अर्थ प्राप्त होतो. इच्छा आणि अपेक्षा यांच्यामधील अंतर कमी करण्यास ते मदत करतात तसेच उद्दिष्ट प्राप्तीच्या प्रगतीचे मोजमाप करण्यास सहाय्यभूत ठरतात.

ii. **तपासणी करणे :** याचा अर्थ नियोजनाप्रमाणे चालू केलेल्या कामाच्या प्रगतीचा आढावा घेणे. बरेचदा तपासणी आपोआपच केली जाते. तपासणी करण्यासाठी योग्य साधने वापरणे, कार्याचा अपेक्षित दर्जा ठरविणे आणि माध्यमिक उद्दिष्टे ठरविणे इत्यादींच्या मदतीने तपासणी करणे सोपे होते. उदाहरणार्थ : प्रकल्पाचे सादरीकरण करताना ज्यावेळी वेळेची मर्यादा दिलेली असताना विद्यार्थी घड्याळाचा उपयोग करतो. गृहिणी, सकाळी कामाच्या घाईच्या वेळी स्वत:चे वेळेचे नियोजन तपासण्यासाठी भिंतीवरचे घड्याळ वापरते. अन्नपदार्थ तयार करताना अन्नाचा पोत, चव आणि रंग हे पदार्थाचा दर्जा दर्शविणारे घटक तपासणीसाठी उपयुक्त ठरतात. नियोजनामध्ये योग्य समायोजन करण्यासाठी नियंत्रणामध्ये तपासणी योग्य वेळी करणे आवश्यक असते.

iii. **समायोजन करणे :** आवश्यकता असेल तर समायोजन करण्यासाठी नवीन निर्णय घ्यावे लागतात. जर परिस्थितीमध्ये बदल झाला असेल किंवा साधनांच्या उपलब्धतेमध्ये बदल झाला असेल तर नियोजनामध्ये समायोजन करणे आवश्यक असते. उदाहरणार्थ : सहलीला जाण्याचे नियोजन पुढे ढकलावे लागेल जेव्हा अचानक घरी पाहुणे येणार असल्याचा निरोप येतो.

**आपण चर्चा करू :**

**मूल्यांकन म्हणजे काय?**

मूल्यांकन ही व्यवस्थापन प्रक्रियेमधील तिसरी आणि शेवटची पायरी आहे. **याची व्याख्या – 'पूर्ण झालेल्या क्रियेचा आढावा घेणे आणि भविष्यातील नियोजनासाठी मार्गदर्शन मिळविणे'** अशी सांगितली जाते. याचा अर्थ आपण काय साध्य केले आहे ते शोधून काढणे असा आहे. यामध्ये

नियोजन आणि नियंत्रण या पायऱ्यांचा मागोवा घेऊन कार्य किती चांगले झाले किंवा किती वाईट झाले हे समजून घेणे समाविष्ट असते. सर्वसाधारणपणे, मूल्यांकन ही अशी पायरी आहे की जी लोकांकडून नियंत्रणापेक्षा जास्त प्रमाणात वापरली जाते. नियंत्रणामधील तपासणी करणे या अवस्थेमध्ये आणि मूल्यांकन यामध्ये साम्य आहे. परंतु नियंत्रणामधील तपासणी करणे ही क्रिया सुरू असताना केले जाते आणि त्याचा उद्देश नियोजनामध्ये समायोजन करणे असा असतो. मूल्यांकनामध्ये झालेल्या कार्याचा संपूर्ण मागोवा घेणे समाविष्ट असते. मूल्यांकनाचा उद्देश भविष्यातील नियोजन आणि नियंत्रण या पायऱ्यांसाठी मार्गदर्शन मिळविणे असा असतो. प्रसंग आणि परिस्थिती यांचे विश्लेषण करण्याच्या क्षमतेवर परिणामकारक मूल्यांकन अवलंबून असते. मूल्यांकन अर्थपूर्ण होण्यासाठी ते उद्दिष्टांशी निगडित असावे.

**नेहमी लक्षात ठेवा –**

**मूल्यांकनाचे फायदे :**

- मूल्यांकन, कार्याचा दर्जा ओळखण्यास आपणास मदत करते. उद्दिष्ट प्राप्तीसाठी काय केले गेले आहे आणि ती प्रक्रिया किती परिणामकारक होती ते समजण्यास मूल्यांकन सहाय्यभूत ठरते.
- मूल्यांकन आपल्याला नियोजन चांगले होते की खराब होते, नियोजनामध्ये बऱ्याच त्रुटी होत्या का, कोणत्या घटकांचा नियोजनावर परिणाम झाला, आवश्यक तेथे योग्य वेळी नवीन निर्णय घेऊन नियोजनामध्ये समायोजन केले होते का अशा गोष्टी सांगते.
- कुटुंबाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी मर्यादित संसाधने किती परिणामकारक पद्धतीने वापरली गेली ते समजण्यासाठी मूल्यांकनाची मदत होते.
- मूल्यांकनाचा सर्वांत महत्त्वाचा फायदा म्हणजे ते भविष्यकाळातील नियोजनासाठी पायाभूत ठरते. आपला स्वत:कडे आणि इतरांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यास आणि परिस्थितीकडे नव्याने पाहण्यासाठी मूल्यांकन मदत करते.
- मूल्यांकन प्रभावी होण्यासाठी ते उद्दिष्टांशी निगडित असावे. मूल्यांकनासाठी आधारभूत व्हावे यासाठी उद्दिष्टे अधिक स्पष्ट असावीत.

**मूल्यांकनाचे तीन प्रकार :**

- **सर्वसाधारण मूल्यांकन :** सर्वसाधारण मूल्यांकन हे अत्यंत प्रासंगिक आणि व्यक्तिपरक असते. कार्याच्या प्रत्येक घटकाचे विश्लेषण न करता व्यवस्थापक परिस्थितीनुरूप चांगला किंवा वाईट असा शेरा देतो.
- **विशिष्ट मूल्यांकन :** हे मूल्यांकन सविस्तरपणे केले जाते. या मूल्यांकनामध्ये व्यक्ती, व्यवस्थापनाच्या सर्व वेगवेगळ्या घटकांचे निरीक्षण करते आणि कार्याच्या उत्तमपणाची पातळी ठरविते. यासाठी वापरले जाणारे मोजमापाचे साधन म्हणजे वर्णन करणारे तुलनात्मक शब्द होय; जसे – उत्तम, चांगला, वाईट इत्यादी.
- **स्वयंमूल्यांकन (स्वमूल्यांकन/आत्ममूल्यांकन) :** आयुष्यामध्ये अनेक प्रसंगांमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर स्वमूल्यांकन केले जाते. गृहिणी आपापल्या घरात एकट्या असतात आणि सदस्य समूह देखील लहान असतो. घरामधील वातावरण अनौपचारिक असते तसेच गृहिणीला उपयुक्त ठरेल अशी तंत्रप्रणाली विकसित झालेली नाही. त्यामुळे स्वयंमूल्यांकन वस्तुनिष्ठपणे करणे गृहिणीला कठीण जाते. तरी देखील स्वयंमूल्यांकन ही अर्थपूर्ण क्रिया आहे.

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| क्रिया | मूल्यांकन |
|---|---|
| पदार्थाची चव चांगली आहे. | |
| पदार्थाची पोषण मूल्ये उच्च आहेत. | |
| मी पदार्थ चांगला शिजवला आहे. | |
| पदार्थाचे एकंदर दृश्य स्वरूप चांगले आहे. | |

गृहिणी किंवा समूह स्वयंमूल्यांकनासाठी खालील पद्धती वापरू शकतात –

➢ स्वत:च्या व्यवस्थापनाचा दर्जा तपासणे आणि त्याची तुलना इतरांच्या व्यवस्थापनाच्या दर्जाशी करणे.

➢ स्वत:च्या कार्याच्या दर्जाची तुलना प्रस्थापित झालेल्या दर्जाशी करणे, स्वत:ला त्यादृष्टीने प्रश्न विचारणे आणि भविष्यातील क्रियांमध्ये किंवा नियोजनामध्ये बदल घडवून आणणे.

➢ गृहिणी दैनंदिनीचा उपयोग करून त्यामध्ये कोणकोणती कार्ये करावयाची आहेत? ती पूर्ण झाली आहेत का? त्यांचा दर्जा कसा आहे? इत्यादी गोष्टींची नोंद ठेऊ शकते.


**तुम्ही ओळखू शकाल का?**
**खाली दिलेल्या उदाहरणांमधून दर्शविला जाणारा मूल्यांकनाचा प्रकार ओळखू शकाल?**

- विद्यार्थी जीवनामध्ये, निकालपत्र हाती आल्यानंतर सर्वसाधारण टक्केवारी पाहून चांगला किंवा वाईट असा शेरा दिला जातो.
- विद्यार्थ्यांचे निकालपत्र मिळाल्यानंतर प्रत्येक विषयाचे गुण किंवा टक्केवारी सविस्तरपणे पाहिली जाते ज्यावरून प्रत्येक विषयात किती यश मिळाले ते ठरविले जाते. यावरून काही वेळा असे दर्शविले जाते की जरी पूर्ण ठक्केवारी किंवा ग्रेड चांगली असली तरी एखाद्या ठराविक विषयासाठी अधिक मार्गदर्शन आवश्यक आहे.

## ३.३ नियोजन, नियंत्रण आणि मूल्यांकन यांमधील सहसंबंध :

नियोजन, नियंत्रण आणि मूल्यांकन या पायऱ्या एकमेकांवर आधारित असतात. समस्येचे निराकरण करणे किंवा उद्दिष्ट पूर्तीसाठी क्रिया करणे नियोजनापासून सुरू होते जी एक मानसिक प्रक्रिया आहे. दुसरी पायरी नियंत्रण ही नियोजनाच्या पायरीवर आधारित असते. यामध्ये नियोजनानुसार क्रिया केली जाते. तिसरी पायरी मूल्यांकन ही नियोजन आणि नियंत्रण या दोन्ही पायऱ्यांशी निगडित आहे. उद्दिष्टपूर्ती नंतर किंवा समस्या सोडवून झाल्यानंतर व्यक्ती नियोजन आणि नियंत्रण या पायऱ्यांचा आढावा घेऊन त्यामधील सकारात्मक आणि नकारात्मक बाबी शोधून काढते. मूल्यांकनामधून मिळणारे असे मुद्दे भविष्यकाळातील नियोजन आणि नियंत्रण अधिक चांगले करण्यासाठी उपयुक्त ठरते.

अशाप्रकारे सर्व तीनही पायऱ्या परस्परांशी खूपच निगडित आहेत आणि आधीची पायरी योग्य प्रकारे पार पाडल्याशिवाय व्यक्ती पुढे जाऊ शकत नाही.




**आकृती ३.३ : नियोजन, नियंत्रण आणि मूल्यांकन यामधील सहसंबंध**

**तुम्ही आठवू शकता का?**

- व्यवस्थापन हा कौटुंबिक जीवनाचा आवश्यक भाग आहे. गृहव्यवस्थापन हे कौटुंबिक उद्दिष्टे साध्य करण्याचे एक साधन आहे.
- उपलब्ध साधनांचा उपयोग करून कौटुंबिक उद्दिष्टे साध्य करणे आणि कुटुंबामध्ये आनंद आणि समाधान आणण्याचे व्यवस्थापन हे एक साधन आहे.
- साधनांचा प्रभावी उपयोग, कुटुंबातील सदस्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि आयुष्याचा दर्जा सुधारण्यासाठी सहाय्यक ठरतो.
- व्यक्ती दररोज बऱ्याचशा क्रिया साध्य करण्यासाठी व्यवस्थापन प्रक्रिया वापरते.
- गृह व्यवस्थापन ही एक मानसिक प्रक्रिया आहे. ज्यामध्ये निर्णयांची शृंखला समाविष्ट असते आणि ज्याच्या परिणामाने क्रिया केल्या जातात. व्यवस्थापन प्रक्रियेमध्ये एका पाठोपाठ येणाऱ्या तीन पायऱ्या आहेत - नियोजन, नियंत्रण आणि मूल्यांकन.
- उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी योजना आखणे म्हणजे नियोजन. नियोजन क्रिया सुरू करण्यापूर्वी केले जाते. ते यशस्वी होण्यासाठी लवचिक, वास्तववादी आणि अनुरूप असावे.
- नियंत्रण म्हणजे नियोजन कार्यान्वित करणे तसेच जेव्हा आणि जिथे आवश्यकता असेल तिथे नियोजन समायोजित करणे. ते क्रिया सुरू असताना केले जाते.

- नियंत्रणाच्या तीन अवस्था आहेत - प्रेरणा देणे, तपासणी करणे आणि समायोजन करणे.
- मूल्यांकन म्हणजे कार्याचा आढावा घेणे, नियोजन आणि नियंत्रणामधील यशस्वीतेचे घटक किंवा त्रुटी काय आहेत ते समजून घेणे. मूल्यांकन कार्य संपल्यानंतर किंवा उद्दिष्ट साध्य झाल्यानंतर केले जाते.

## स्वाध्याय

- **वस्तुनिष्ठ प्रश्न :**

**१) एकाधिक निवड प्रश्न.**

१. नियोजनामध्ये – ची शृंखला असते.
   अ) निर्णय
   ब) संसाधने
   क) उद्दिष्टे

२. नियोजनामध्ये सुधारणा करणे तेव्हा शक्य होते जेव्हा नियोजन – असते.
   अ) कठोर
   ब) लवचिक
   क) वास्तववादी

३. नियोजनाचे महत्त्व या सत्यतेमध्ये वसलेले असते की ते क्रियेच्या – केले जाते.
   अ) नंतर
   ब) दरम्यान
   क) पूर्वी

४. व्यवस्थापनाची – ही पायरी सर्वसाधारणपणे लोकांकडून दुर्लक्षित केली जाते.
   अ) नियोजन
   ब) मूल्यांकन
   क) नियंत्रण

५. नियंत्रणाच्या तीन अवस्था म्हणजे प्रेरणा देणे, तपासणी करणे आणि – होय.
   अ) सुरू करणे
   ब) अनुकूल करणे
   क) समायोजन करणे

६. मूल्यांकन ही पायरी – साठी मार्गदर्शन देते.
   अ) भविष्यकालीन नियोजन
   ब) वर्तमानातील नियोजन
   क) नियंत्रण

७. जे मूल्यांकन अत्यंत प्रासंगिक आणि व्यक्तिपरक असते त्याला – असे म्हणतात.
   अ) विशिष्ट
   ब) स्वयंमूल्यांकन
   क) सर्वसाधारण

**२) जोड्या जुळवा.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| i) समायोजन | अ) नियंत्रण पायरीमधील अवस्था |
| ii) नियोजन | ब) सर्व घटकांची सविस्तर तपासणी |
| iii) मूल्यांकन | क) उद्दिष्ट साध्य झाल्यानंतरची तपासणी |
| iv) विशिष्ट मूल्यांकन | ड) सुयोग्य असे नवीन निर्णय घेणे |
| v) प्रेरणा देणे | इ) क्रियेला आराखडा तयार करणे |

**३) खालील विधाने चूक की बरोबर ते ओळखा.**

अ) नियोजन क्रिया चालू असताना केले जाते.

ब) नियंत्रणामध्ये नवीन निर्णय घेतले जाऊ शकतात.

क) 'प्रेरणा देणे' यामध्ये अल्पकालीन उद्दिष्ट बनविणे सहायभूत ठरते.

ड) मूल्यांकन भविष्यातील नियोजनासाठी मार्गदर्शके पुरविते.

इ) नियंत्रण ही व्यवस्थापन प्रक्रियेमधील पाहिली पायरी आहे.

- **थोडक्यात सोडविण्याचे प्रश्न.**

**१) खालील संज्ञांच्या व्याख्या लिहा.**

i) नियोजन

ii) नियंत्रण

iii) प्रेरणा देणे

iv) मूल्यांकन

v) आत्म मूल्यांकन

**२. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

अ) नियोजन म्हणजे काय? त्याची वैशिष्ट्ये कोणती?

ब) नियोजनामध्ये समाविष्ट असलेल्या पायऱ्या स्पष्ट करा.

क) नियंत्रण म्हणजे काय? नियंत्रणाच्या अवस्था कोणत्या?

ड) मूल्यांकन म्हणजे काय? त्याचे फायदे कोणते?

इ) आत्म मूल्यांकन म्हणजे काय? त्याचे तंत्र कोणते?

**३. फरक लिहा.**

अ) नियंत्रण आणि मूल्यांकन.

ब) प्रेरणा देणे आणि तपासणी करणे.

क) सर्वसाधारण आणि विशिष्ट मूल्यांकन.

**४. खालील टिपा लिहा.**

अ) नियोजनाचे महत्त्व.

ब) नियोजनामधील पायऱ्या.

क) नियंत्रणाच्या अवस्था

व) सर्वसाधारण आणि विशिष्ट मूल्यांकन.

**५. कारणे द्या.**

अ) नियोजन आणि नियोजन करणारी व्यक्ती लवचिक आणि वास्तववादी असावी.

ब) प्रेरणा देणे ही नियंत्रणाची महत्त्वाची अवस्था आहे.

क) योग्य वेळी तपासणी करणे नियंत्रणामध्ये महत्त्वाचे असते.

ड) विशिष्ट मूल्यांकन कार्याच्या उत्तमपणाची पातळी ठरविते.

- **दिर्घोत्तरी प्रश्न.**

अ) सुयोग्य उदाहरणे देऊन निमंत्रणाच्या अवस्था स्पष्ट करा.

ब) व्यवस्थापन प्रक्रियेमधील तीन पायऱ्या कोणत्या? सुबक आकृती काढून त्यांच्यामधील सहसंबंध स्पष्ट करा.

**प्रकल्प/असाईनमेंट :**

अ) व्यवस्थापन प्रक्रियेच्या ज्ञानाचा उपयोग करून तुमच्या वर्गासाठी एक दिवसाच्या सहलीचे नियोजन करा.

ब) वार्षिक परीक्षेमध्ये 'फर्स्ट क्लास' मिळविण्याच्या तुमच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी व्यवस्थापन प्रक्रियेचे उपयोजन करा.

❑❑❑

# ४. निर्णय घेणे

४.१ निर्णय प्रक्रियेचा अर्थ आणि व्याख्या
४.२ निर्णय प्रक्रियेच्या पायऱ्या
४.३ निर्णयांचे प्रकार
४.४ निर्णय प्रक्रियेचे महत्त्व

**माहीत आहे काय? :** व्यक्ती सकाळपासून विविध समस्यांना तोंड देते.

गृहव्यवस्थापन प्रक्रियेत निर्णय घेणे हा आपल्या दैनंदिन जीवनात अत्यंत महत्त्वपूर्ण भाग आहे. दररोज प्रत्येक व्यक्तीला विविध परिस्थितीला तोंड द्यावे लागते. काही समस्या साध्या अल्पकालीन असल्या तरी निर्णय सहजतेने घेऊन त्या सोडविल्या जातात. काही निर्णय दीर्घकालीन असतात, ज्यामुळे आयुष्याला दिशा मिळू शकते. उदाहरणार्थ, लग्न, करिअर, घर विकत घेणे इत्यादी. संपूर्ण निर्णय महत्त्वपूर्ण असतात आणि त्यांचा व्यक्तीच्या जीवनावर अत्याधिक परिणाम होतो. व्यवस्थापन प्रक्रिया ही निर्णय प्रक्रियेवर केंद्रित असते.

## ४.१ निर्णय प्रक्रियेचा अर्थ आणि व्याख्या :

निर्णय घेणे हे व्यवस्थापनेचे अविभाज्य अंग (Crux) आहे. मग ते व्यवस्थापन, व्यवसायाचे असो, एखाद्या संस्थेचे असो, एखाद्या प्रसंगाचे असो किंवा घर बांधायचे असो. निर्णय नेहमीच ध्येयाला मनामध्ये ठेवून साध्य केले जातात. निर्णय प्रक्रिया ही मानसिक प्रक्रिया असल्यामुळे ज्ञान, कल्पकता आवश्यक आहे. समस्या निर्माण झाल्यास ती सोडविण्याकरिता ज्ञान उपयुक्त असते.

**व्याख्या :**

**निकेल व डॉर्सी यांच्या मते :**

**''एखादी समस्या सोडविण्यासाठी किंवा एखादी परिस्थिती हाताळण्यासाठी उपलब्ध असलेल्या अनेक पर्यायांमधून पर्यायाची निवड करणे म्हणजे निर्णय घेणे.''**

**लिमये यांच्या मते :**

**''समस्या सोडविण्यासाठी किंवा ध्येयप्राप्तीसाठी वेगवेगळे पर्याय आणि क्रिया विचारात घेतल्या जातात. निर्णय घेणे म्हणजे असे पर्याय आणि अशा क्रियांमधील एक पर्याय निवडणे किंवा त्यामधील कोणत्याही पर्यायांची किंवा क्रियेची निवड न करणे.''**

निर्णय हे कमी किंवा जास्त महत्त्वपूर्ण असो परंतु त्यांची व्यक्तीच्या जीवनात महत्त्वपूर्ण भूमिका असते. ते निर्णय व्यक्तीला ध्येय प्राप्तीसाठी किंवा ध्येय प्राप्तीच्या प्रक्रियेत व्यक्तीचे राहणीमान ठरवितात. अशा प्रकारे जीवनाची गुणवत्ता व्यक्तीने घेतलेल्या निर्णयांच्या प्रकारावर आणि ते किती प्रमाणात अचूक ठरतात यावर अवलंबून असते.

## ४.२ निर्णय प्रक्रियेच्या पायऱ्या :

**चर्चा करा :**

निर्णय प्रक्रियेमध्ये काही पायऱ्यांचा समावेश आहे. निर्णय प्रक्रिया ही केवळ घर चालविण्यासाठी उपयुक्त नसून संघटना, संस्था, क्लब, व्यवसाय, राज्य किंवा देश चालविण्याकरिता सुद्धा उपयुक्त आहे. या संघटनेमध्ये उच्चपदावर असलेल्या व्यक्तीला एक चांगला निर्णय घेणारी व्यक्ती असावी लागते. नाही तर कार्य सुरळीत चालणार नाही. निर्णय प्रकियेमध्ये काही विशिष्ट अशा गतिविधी समाविष्ट आहेत. त्यांना निर्णय प्रक्रियेच्या पायऱ्या म्हटल्या गेल्या आहेत. ज्या पुढील प्रमाणे आहेत.

**निर्णय प्रक्रियेच्या पायऱ्या**

१. समस्या ओळखणे/समस्या समजून घेणे.

↓

२. पर्यायांची यादी करणे.

↓

३. पर्यायांचे विश्लेषण करणे.

↓

४. एक योग्य पर्यायाची निवड करणे.

↓

५. परिणामांचा स्वीकार करणे.

**आकृती क्र. ४.२ (अ) निर्णय प्रक्रियेच्या पायऱ्या**

**१. समस्या ओळखणे/समस्या समजून घेणे :** समस्येला ओळखण्यापासून निर्णय प्रक्रिया सुरू होते. जेव्हा व्यक्तीला समस्येचे आकलन होते तेव्हा योग्य उपाय शोधण्यासाठी विचार करू लागतात. याचाच अर्थ समस्ये बरोबर निर्णय प्रक्रिया सुरू होते. समस्या स्पष्टपणे ओळखणे आणि ती नीट समजून घेणे आवश्यक आहे. जर समस्या बरोबर ओळखली नाही तर परिणामकारक निर्णय प्रक्रिया होऊ शकणार नाही.

समस्या स्पष्टपणे समजावी याकरिता गृहिणीने गृहव्यवस्थापक म्हणून कुटुंबातील सदस्यांबरोबर समस्येविषयी चर्चा करून तिच्या माहितीसह विश्लेषण करणे आवश्यक असते. समस्येच्या मूळापर्यंत जाणे जरूरीचे असते, त्यामुळे समस्या का निर्माण झाली आणि व्यवस्थापनेचे कोणते घटक यामध्ये समाविष्ट आहेत हे समजून घेता येईल. विचार न करता घाईघाईने उपाय शोधला तर कदाचित तो उपाय चुकीचा होतो याची नंतर जाणीव होईल. त्यामुळे नैराश्य येण्याची शक्यता असते. तसेच वेळ, पैसा, शक्ती, साहित्य यासारख्या मानवीय आणि अमानवीय संसाधनांचा अपव्यय होऊ शकतो. हे टाळण्यासाठी समस्या स्पष्टपणे ओळखणे आणि त्या संबंधित माहितीचे विश्लेषण करणे महत्त्वाचे असते. येथे संबंधित माहिती म्हणजे परिस्थितीनुरूप असलेल्या मर्यादा आणि संधी ओळखणे. उदा. सर्वसाधारण समस्येला विद्यार्थ्यांना तोंड द्यावे लागते, ते म्हणजे दहावीनंतर अभ्यासक्रमाची निवड करणे. ही पायरी अत्यंत महत्त्वाची आहे. कारण यामधून एखाद्या निर्णयाचा पाया रचला जातो.

**२. पर्यायांची यादी करणे :** अर्थात विविध पर्याय शोधणे. एकदा समस्येचे आकलन झाले की, व्यक्ती शक्य ते पर्याय किंवा उपाय शोधण्यास सुरुवात करतात. जर व्यक्ती सर्व संभाव्य पर्याय शोधू शकली तर व्यक्तीला परिणामकारक निर्णय घेता येतात. ही गोष्ट व्यक्तीला उत्तम पर्याय शोधण्यास समर्थ करेल. अशा प्रकारचे सर्व संभाव्य पर्याय शोधल्याशिवाय चांगला निर्णय घेणे व्यक्तीला अशक्य आहे. या प्रक्रियेत जरी सर्व पर्याय शोधणे महत्त्वाचे असले, तरी त्यातील विविधतेमुळे व्यक्तीच्या मनात कोणताही गोंधळ निर्माण होऊ देऊ नये.

अगोदरच्या उदाहरणामध्ये एखाद्या विद्यार्थ्याला त्याच्या परिसरात किती विद्यालये किंवा अभ्यासक्रम आहे हे शोधावे लागेल. प्रत्येक विद्यालयामध्ये किंवा अभ्यासक्रमाला किती शेकडा लागेल. अशा चार ते पाच विद्यालयांची सूची केल्यानंतर कोणत्या विद्यालयामध्ये कोणत्या विषयांचे विकल्प (Comb nation) आहे? त्याचे शुल्क काय आहे? वेळ काय आहे? विद्यालयामध्ये कसे जायचे? किती वेळ जायला लागेल? इत्यादी.


**३. पर्यायांचे विश्लेषण करणे :** साध्या शब्दामध्ये पर्यायांची तुलना करणे, अगोदरच्या पायरीमध्ये विविध पर्याय प्राप्त झाले आहेत. विविध पर्यायांचे संक्षेपमध्ये माहिती प्राप्त केल्यावर विश्लेषण केले जाते. पर्याय शोधल्यानंतर व्यक्ती प्रत्येक पर्यायांचे गुण व अवगुण यांचा विचार करते. ही पायरी किती काळजीपूर्वक पूर्ण केली जाते यावर निर्णय प्रक्रियेचे यश अवलंबून असते. ही पायरी व्यक्तीला सर्वांत उत्तम पर्यायाची निवड करण्यास मदत करते. वरील उदाहरणामध्ये एकदा काय विद्यार्थ्याने महाविद्यालय किंवा अभ्यासक्रम संबंधी माहिती एकत्रित केली. त्याबद्दल तो/ती आपल्या मित्रांसोबत किंवा कुटुंबासोबत त्यांची तुलना करतील.

**४. एका योग्य पर्यायाची निवड करणे :** ही पायरी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे कारण या पायरीमध्ये व्यक्तीला प्रत्यक्ष

निर्णय घ्यावा लागतो. योग्य निर्णय तेव्हाच होईल जेव्हा व्यक्तीने योग्य पर्यायाची निवड केली असेल. पर्यायाची निवड कोणत्याही दबावामध्ये घेऊ नये. निर्णय सगळ्या पर्यायांमध्ये अत्यंत योग्य व संतोषजनक असावा. वरील उदाहरणामध्ये सगळ्या महाविद्यालय व अभ्यासक्रमांचे यश व अपयश विचारात घेऊन विद्यार्थ्याने एका महाविद्यालय किंवा अभ्यासक्रमाची निवड करावी जी त्याला/तिला योग्य वाटेल.

५. **परिणामाचा स्वीकार करणे :** निर्णय प्रक्रियेतील ही महत्त्वाची पायरी आहे. ज्याच्याकडे बरेचजण दुर्लक्ष करतात. निर्णयाचा परिणाम चांगला होवो किंवा वाईट त्याची जबाबदारी स्वीकारण्याची क्षमता निर्णय घेणाऱ्या व्यक्तीची असली पाहिजे. या गोष्टींचा सर्वांत मोठा फायदा असा होतो की, निर्णयाचे यश हे भविष्यात परिणामकारक निर्णय घेण्यासाठी व्यक्तीमध्ये आत्मविश्वास वाढविण्यास मदत करते आणि अपयश व्यक्तीला भविष्यातील मूल्यांकनासाठी निकष तयार करण्यास मदत करते. तसेच कमी वेळात परिणामकारक निर्णय घेण्याची क्षमता विकसित करते. वरील उदाहरणात आधीच्या पायरीमध्ये अभ्यासक्रमाची निवड दर्शविली आहे म्हणजेच निर्णय घेतलेला आहे. विद्यार्थ्यांनी निवडलेले महाविद्यालय किंवा अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतो आणि महाविद्यालयात जाऊ लागतो. त्यांना जरी अभ्यासक्रम कठीण वाटला तरी ती वस्तुस्थिती स्वीकारणे आणि अभ्यासक्रम सुरूच ठेवणे व यशासाठी जास्त प्रयत्न करणे त्याला आवश्यक ठरते.

## निर्णय वृक्ष




**आकृती ४.२ (ब) इयत्ता १२ वी नंतर विविध करियर पर्यायामध्ये निर्णय प्रक्रियांचा उपयोग**

**आपली बुद्धी वापरा :**
निर्णय प्रक्रियेचे दुसरे उदाहरण देऊन तक्ता तयार करा.

**४.३ निर्णयांचे प्रकार :** निर्णयांचे मुख्य दोन प्रकारे वर्गीकरण करता येईल.

१. वैयक्तिक आणि सामूहिक निर्णय.

२. सवयीने घेतलेले आणि बौद्धिक निर्णय.

**निर्णयांचे प्रकार**

- समाविष्ट व्यक्तीच्या आधारावर
  - वैयक्तिक निर्णय
  - सामूहिक निर्णय
- मानसिक प्रक्रियेच्या आधारावर
  - सवयीने घेतलेले निर्णय
  - बौद्धिक निर्णय

**१. वैयक्तिक आणि सामूहिक निर्णय :** समाविष्ट व्यक्तीच्या आधारावर खालील प्रमाणे निर्णयाचे वर्गीकरण केले जाते.

**अ) वैयक्तिक निर्णय :** एका व्यक्तीने स्वत:साठी/तिच्यासाठी घेतलेला निर्णय व त्याचे परिणाम स्वत:च स्वीकारावा लागतो. म्हणजेच वैयक्तिक निर्णय होय. या निर्णयाचा परिणाम मुख्यत: ज्या व्यक्तीकरिता घेतला त्याच्यावर होतो. निर्णयाची जबाबदारी पूर्णपणे एकाच व्यक्तीवर असते. या निर्णयास कार्यान्वित करण्याची गती तीव्र असते. कारण तो/ती दुसऱ्यांबरोबर चर्चा करण्यासंबंधी त्यांचा विश्वास नसतो. या निर्णयाची गुणवत्ता निर्णय घेणाऱ्या व्यक्तीच्या बुद्धिमत्तेवर आणि अनुभवावर अवलंबून असते. उदा. महाविद्यालय किंवा संस्थेची निवड, सार्वजनिक वाहन सेवा किंवा वैयक्तिक वाहनाची निवड इत्यादी.

**ब) सामूहिक निर्णय :** हे निर्णय समूहातील अनेक व्यक्तींनी एकत्रितपणे घेतलेले असतात. वैयक्तिक निर्णयापेक्षा सामूहिक निर्णयाची प्रक्रिया कठीण असून ती कार्यान्वित करण्याची गती मंद असते. या निर्णयामध्ये सदस्यांच्या विचारांची व सखोल चर्चेची आवश्यकता असते आणि त्यामुळे निर्णय घेण्यास जास्त वेळ लागतो.

सामूहिक निर्णयांचे काही फायदे असतात. एकत्र विचार विनिमयांमुळे जास्त पर्याय शोधले जातात. तसेच समूहातील अनेक व्यक्तींच्या अनुभवामुळे अयोग्य पर्याय काढून टाकणे सोपे जाते. तसेच निर्णयाची जबाबदारी कुणा एकाची न राहता समूहातील सर्व सदस्यांची असते. काही वेळा संघर्ष व मतभिन्नता निर्माण होते आणि सामूहिक निर्णय घेणे कठीण जाते. उदा. सण साजरा करणे, संपूर्ण कुटुंबाकरिता सहलीचे नियोजन करणे, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सहलीला नेणे.

**विचार करा आणि लिहा :**
वैयक्तिक निर्णय आणि सामूहिक निर्णयामध्ये फरक.

**२. सवयीने घेतलेले आणि बौद्धिक निर्णय :** निर्णय प्रक्रियांमध्ये मानसिक प्रक्रिया समाविष्ट करून खालील प्रकारे निर्णयाचे वर्गीकरण केले जाते.

**असे का करावे लागते ?**
१. का बरं तुम्ही सांकेतिक (Siga l) नियमांचे अनुकरण आपोआप करता ?
२. दररोज सकाळी तुम्ही दात का घासता ?

**अ) सवयीने घेतलेले निर्णय :** या प्रकारचे निर्णय आपल्या दैनंदिन जीवनात समाविष्ट झालेले असल्याने त्याकरिता प्रत्येक वेळी विस्तारपूर्वक विचार करून निर्णय घेण्याची आवश्यकता नसते. यापैकी काही निर्णय राबविण्याकरिता वेळ लागतो आणि सर्व प्रक्रियेचा सविस्तर विचार करण्याची आवश्यकता असते. हे मुख्यत: वारंवार केल्या जाणाऱ्या दैनंदिन क्रियांशी निगडित असतात आणि निवड बहुतेक वेळा आपोआप आणि स्वयंप्रेरित असते. उदाहरणार्थ : रोज सकाळी ठराविक वेळेस उठणे, विशिष्ट बस किंवा ट्रेन पकडून निश्चित स्थळांपर्यंत पोहोचणे.

**ब) बौद्धिक निर्णय :**

**शोध घ्या :**
बौद्धिक निर्णयावर कोणत्या घटकांचा परिणाम होतो ?

या प्रकारच्या निर्णयाचे आपल्या जीवनावर सखोल आणि दीर्घकालीन दुष्परिणाम होऊ शकतात म्हणूनच आपल्या कुटुंबाला

विचारपूर्वक निर्णय घेण्याची आवश्यकता असते. अशा निर्णयाला बौद्धिक निर्णय म्हणतात. व्यक्ती निर्णय घेताना आपली बुद्धिमत्ता, ज्ञान, तर्कशक्ती आणि विश्लेषण क्षमता यांचा उपयोग करतो. या निर्णयाची निवड जाणीवपूर्वक केलेली असते आणि निर्णयावर शिक्कामोर्तब करण्याकरिता बराच वेळ घेतला जातो. व्यक्तीकडून किंवा कुटुंबाकडून घेतले जाणारे हे निर्णय महत्त्वाचे असतात. उदाहरणार्थ : घर कोठे विकत घ्यायचे, कोणते करिअर निवडायचे, योग्य जोडीदाराची निवड. या प्रकारच्या निर्णयात व्यक्ती जर अपयशी ठरली तर त्याचा परिणाम दीर्घकालीन होऊ शकतो.

**शोध घेऊ या :**

१. दैनंदिन जीवनात निर्णय प्रक्रियेचे काय महत्त्व आहे?

२. आपल्या जीवनात निर्णय प्रक्रियेची महत्त्वपूर्ण भूमिका काय आहे?

## ४.४ निर्णय प्रक्रियेचे महत्त्व :

निर्णय घेणे ही गृहव्यवस्थापनेतील महत्त्वाची बाब आहे. व्यवस्थापन प्रक्रियेत प्रत्येक पायरीमध्ये निर्णय घ्यावा लागतो. निर्णय प्रक्रियेचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

- **व्यक्तीच्या जीवनात निर्णय प्रक्रिया महत्त्वाची भूमिका बजावते :** निर्णय प्रक्रिया उत्कृष्ट जीवन जगण्यावर परिणाम करते. निर्णय प्रक्रिया मूल्यांवर आधारित आहे. निर्धारित केलेले ध्येय गाठण्यासाठी, राहणीमानाच्या दर्जाचे मूल्यमापन करण्याकरिता आणि जीवनात अपेक्षित गुणवत्ता प्राप्त करण्याकरिता निर्णय घेण्यास मदत करतात. उदाहरणार्थ : विद्यार्थ्यांनी परीक्षेत प्रथम येण्याचा निर्णय घेणे, कारण शिक्षण हे त्याच्या जीवनाचे मूल्य आहे. शैक्षणिक ध्येय गाठण्याकरिता उच्च अभ्यासक्रमात प्रवेश घेईल आणि त्याकरिता विद्यार्थी ज्या पद्धतीने अभ्यास करेल व आपल्या दैनंदिन कार्याचे व्यवस्थापन करेल, हे त्याचे/तिचे निर्धारित स्तर प्रतिबिंबित करेल.
- **व्यवस्थापनेत निर्णय घेणे महत्त्वाचे आहे :** व्यवस्थापनेत प्राप्त करावयाच्या ध्येयाच्या निश्चिती करिता विविध निर्णय घ्यावे लागतात. एकदा ध्येय निश्चित झाले की त्यांच्या पूर्ततेकरिता उपलब्ध संसाधनाची विभागणी करण्यास निर्णय मदत करते.
- **व्यक्तीला मर्यादित संसाधनांचा उपयोग करण्यासाठी निर्णय घेण्यास मदत करते :** मानवीय संसाधने आणि भौतिक संसाधने ही दोन्ही प्रकारची संसाधने मर्यादित स्वरूपाची असतात व कुटुंबात गरजा मात्र अमर्याद असतात म्हणूनच अशा अमर्यादित गरजा पूर्ण करण्यासाठी व्यवस्थापन प्रक्रिया वापरणे आवश्यक आहे. कुटुंबातील सदस्यांना जास्तीत जास्त समाधान देण्यासाठी बरेच निर्णय घेणे आवश्यक असते.
- **निर्णय घेणे हे व्यवस्थापनेचे अविभाज्य अंग (Crux) आहे :** निर्णय घेणे हे व्यवस्थापनेचे केंद्रस्थान आहे. व्यवस्थापनेपासून ते वेगळे करता येत नाही. व्यवस्थापन प्रक्रियेच्या प्रत्येक पायरीत म्हणजेच नियोजनात, नियंत्रणात आणि मूल्यांकनात सुद्धा निर्णय आवश्यक असतात. वास्तविक स्वरूपात व्यवस्थापनेच्या प्रत्येक पायरीमध्ये ही शृंखला सामाविष्ट असते.
- **निर्णय घेणे व्यवस्थापनाची परिणामकारकता ठरविते :** निर्णय प्रक्रिया ही जटिल प्रक्रिया आहे; तिचा व्यवस्थापन प्रक्रियेवर अत्यंत प्रभाव पडतो. व्यवस्थापनेत निर्णय घेताना व्यक्ती विचार करण्याची क्षमता, स्मरणशक्ती, तर्क करण्याची क्षमता, कौशल्य आणि ज्ञान यांचा उपयोग करतात. निर्णय घेणे ही एक मानसिक प्रक्रिया असून त्यामध्ये उपलब्ध असलेल्या क्रिया किंवा पर्यायांमधून सर्वांत योग्य अशा पर्यायांची किंवा क्रियेची निवड करणे सामविष्ट असते. हीच प्रक्रिया व्यवस्थापनांची परिणामकारकता ठरविते.
- **जीवनाच्या वर्तमान परिस्थितीवर आणि भविष्यावर निर्णयाचा परिणाम होतो :** कुटुंबाच्या जीवनचक्रातील वेगवेगळ्या अवस्थांमध्ये अनेक निर्णय घ्यावे लागतात. हे निर्णय व्यक्तीच्या वर्तमान आणि भविष्याकाळातील जीवनावर परिणाम करतात. उदाहरणार्थ : आयुष्याचा जोडीदार निवडण्याचा निर्णय किंवा घर घेण्याचा निर्णय इत्यादी. असे काही निर्णय एकदा घेतले, की पुन्हा सहज बदलता येत नाहीत म्हणून ते काळजीपूर्वक घ्यावे लागतात. परंतु काही सोपे निर्णय सहज बदलता येतात, जसे : उपकरणांची खरेदी.

- **समस्या सोडविण्यास निर्णय प्रक्रिया मदत करते :** ज्यावेळी एखादी समस्या सोडवायची असते किंवा काहींची निवड करायची असते तेव्हा निर्णय घ्यावे लागतात, म्हणून कुटुंबातील समस्या सोडविण्यासाठी व कौटुंबिक ध्येय साध्य करण्यासाठी आणि त्यांचा उपयोग करणे या सारख्या क्रियांकरिता निर्णय घेण्याची मानसिक प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असते.
- **बदलत्या परिस्थितीत समायोजन करण्यासाठी निर्णय घेणे सहायक ठरते :** योग्य निर्णय आपल्या जीवनात सहज आणि यशस्वी बनविते. आपल्या जीवनातील एखाद्या परिस्थितीत काही निर्णय सहजतेने किंवा विचार करून घेतले जातात. परंतु जर परिस्थिती बदलली तर व्यक्तीच्या जबरदस्तीने त्याला/तिला आपल्या सवयी बदलाव्या लागतात. म्हणूनच अशा बदलत्या परिस्थितीमध्ये निर्णय घेणे समायोजनेसाठी उपयुक्त साधन ठरते.

## तुम्हाला आठवतंय काय ?

- निर्णय प्रक्रिया ही मानसिक प्रक्रिया आहे आणि ती व्यवस्थापनेच्या प्रत्येक पायरीमध्ये आवश्यक आहे.
- निर्णय घेणे हा व्यवस्थापनेचा केंद्रबिंदू (Crux) आहे.
- नवीन निर्णय हा अगोदरच्या निर्णयावर अवलंबून असतो आणि म्हणून निर्णयाची एक शृंखला तयार होते.
- निर्णय प्रक्रियेत पाच पायऱ्या सामाविष्ट आहेत : समस्या ओळखणे किंवा समजून घेणे, पर्यायांची यादी करणे, पर्यायांचे विश्लेषण करणे, योग्य पर्यायांची निवड करणे आणि परिणामांचा स्वीकार करणे.
- निर्णयाचे वर्गीकरण – सवयीने घेतलेले निर्णय व बौद्धिक निर्णय आणि वैयक्तिक व सामूहिक निर्णय असे वर्गीकरण केले जाते.
- सुव्यवस्थित गृहव्यवस्थापनाकरिता गृहिणीने समजदारीने व योग्य निर्णय घ्यायला पाहिजे.

## स्वाध्याय

- **वस्तुनिष्ठ प्रश्न :**

**१) बहुपर्यायी प्रश्न.**

१. समस्या ओळखणे ही – निर्णय प्रक्रियेची पायरी आहे.
   अ) प्रथम
   ब) द्वितीय
   क) शेवटची

२. वैयक्तिक निर्णय हे – निर्णयापेक्षा लवकर घेतले जातात.
   अ) सामूहिक
   ब) बौद्धिक
   क) सवयीने घेतलेल्या

३. सखोल विचार हा – निर्णय प्रक्रियेसाठी आवश्यक आहे.
   अ) वैयक्तिक
   ब) सामूहिक
   क) सवयीने घेतलेले

४. रोजच्या घडामोडीच्या निर्णयांना – निर्णय असे म्हणतात.
   अ) बौद्धिक निर्णय
   ब) सवयीने घेतलेले निर्णय
   क) सामूहिक निर्णय

**२) खालील विधाने चूक की बरोबर ते ओळखा.**

अ) निर्णय प्रक्रिया ही आपल्या जीवनाला बदलते.

ब) निर्णय प्रक्रिया ही नवीन विचार करण्याकरिता उपयुक्त नाही.

क) वैयक्तिक निर्णयामध्ये भांडणे व आंतरिक मते वाढविते.

ड) निर्णय प्रक्रिया गृहिणीला छान घर बनविण्यास मदत करते.

### ३) जोड्या लावा.

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) समस्या ओळखणे | अ) ज्ञान, विद्वत्ता, तर्क पात्रता. |
| २) परिस्थितीला स्वीकारणे | ब) वैयक्तिक मूल्ये, ध्येये व स्तर याच्या सभोवताली फिरणे. |
| ३) बौद्धिक निर्णय | क) निर्णय प्रक्रियेतील प्रथम पायरी |
| ४) सवयीने घेतलेले निर्णय | ड) निर्णय प्रक्रियेतील शेवटची पायरी |

- **लघुत्तरी प्रश्न.**

**१. व्याख्या लिहा.**

अ. निर्णय प्रक्रिया

ब. व्यक्तीगत निर्णय प्रक्रिया

क. सवयीने घेतलेले निर्णय

**२. फरक स्पष्ट करा.**

अ. व्यक्तिगत व सामूहिक निर्णय

ब. बौद्धिक व सवयीने घेतलेले निर्णय

**३. टिपा लिहा.**

अ. निर्णय प्रक्रियेचे महत्त्व

ब. निर्णय प्रक्रियेचे प्रकार

**४. कारणे द्या.**

अ. निर्णय घेणे हा व्यवस्थापनाचा परमोच्च (Crux) भाग आहे.

ब. सामूहिक निर्णय प्रक्रिया ही वैयक्तिक निर्णयाच्या तुलनेने संथ असते.


क. सामूहिक निर्णय प्रक्रियेमध्ये मतभिन्नता निर्माण होते.

- **दीर्घोत्तरी प्रश्न.**

अ. निर्णय घेण्याची प्रक्रिया सविस्तर स्पष्ट करा.

ब. निर्णयांचे विविध प्रकार उदाहरणे देऊन स्पष्ट करा.

- **ओघतक्ता पूर्ण करा.**




**प्रकल्प/असाईनमेंट :**

अ) तुमच्या विद्यार्थी जीवनातील वैयक्तिक व सामूहिक निर्णयाची सूची तयार करा.

ब) वैयक्तिकरित्या सवयीने घेतलेल्या निर्णयाबद्दल लिहा.

क) तुमच्या कुटुंबाने कार्यक्रमामध्ये घेतलेल्या निर्णयाची यादी करा.

# ५. कौटुंबिक संसाधने


५.१ अर्थ आणि व्याख्या

५.२ संसाधनांचे वर्गीकरण

५.३ संसाधानांची वैशिष्ट्ये

५.४ कौटुंबिक संसाधनांवर परिणाम करणारे घटक


**चर्चा करू या :**

१. संसाधने म्हणजे काय?

वैयक्तिक व कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी व ध्येय साध्य करण्यासाठी विविध भौतिक व अभौतिक बाबींची आवश्यकता असते. अशा मूर्त व अमूर्त गोष्टींना संसाधने असे म्हणतात. कुटुंबास उपलब्ध असलेली संसाधने गृहव्यवस्थापनचा पाया आहे.

प्रत्येक व्यक्ती आणि कुटुंबाजवळ विविध संसाधने असतात. जसे – पैसा, वेळ, ऊर्जा, कौशल्य, योग्यता, ज्ञान, बुद्धी, अभिवृत्ती/दृष्टिकोन इत्यादी. या व्यतिरिक्त काही सामुदायिक संसाधने पोलिस, अग्निशामक दल, विद्युत सेवा व पाणीपुरवठा सेवा, बगिचे, रस्ते, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था व दवाखाने इत्यादींचा व्यक्ती किंवा कुटुंब आपल्या गरजा व ध्येय पूर्ण करण्यासाठी उपयोग करतात.

या संसाधनांची काही सामान्य वैशिष्ट्ये आहेत. संसाधने उपयोग, मर्यादित आणि एकमेकांशी संबंधित असतात, म्हणूनच त्यांच्या विचारपूर्वक उपयोगाकरिता सर्व संसाधनांना व्यवस्थापन प्रक्रिया लागू करणे गरजेचे असते. सर्व संसाधनांना आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे.

## ५.१ अर्थ आणि व्याख्या :

प्रत्येक कुटुंबास काही विशिष्ट गरजा व ध्येय पूर्ण करायची असतात. या कौटुंबिक ध्येयांची पूर्तता संसाधनांच्या उपलब्धतेवर अवलंबून असते. संसाधन म्हणजे असे साधन किंवा साहित्य, की ज्याच्या उपयोगाने आपण कार्य करू शकतो किंवा ध्येय साध्य करू शकतो. आपल्या गरजा पूर्ण करणारे भौतिक व मानवीय गुणधर्म म्हणजेच संसाधने. संसाधनांची व्याख्या खालीलप्रमाणे करता येते.

**रॅन्डम हाऊस शब्दकोशानुसार 'रक्षित करण्यात आलेल्या पुरवठ्याच्या, आधाराच्या व मदतीच्या स्रोतास संसाधन असे म्हणतात.' (Resources means a source of supply support or aid especially one held in reserve.)**

**मॅलॅक डेकान यांच्या मते 'वेगवेगळ्या मागण्यांच्या पूर्ततेकरिता आवश्यक ती सुप्तशक्ती असणारे महत्त्वपूर्ण घटक म्हणजे संसाधने.' (Resources are means which are available and recognized for their potential in meeting demands.")**

प्रत्येक व्यक्तीजवळ उपयोगाकरिता विविध संसाधने असतात. कुटुंबाजवळ असलेल्या संसाधनांना कौटुंबिक संसाधने असे म्हणतात. वैयक्तिक व कौटुंबिक ध्येय साध्य करण्याकरिता अशा संसाधनांची जाणीव करून देणे आणि त्याची योग्य वाटणी किंवा विभागणी करणे गरजेचे असते प्रत्येक व्यक्तिपरत्वे आणि कुटुंबानुरूप संसाधनांचे उपलब्ध प्रमाण भिन्न असते. परिणामकारक व्यवस्थापनाकरिता संसाधनांचा पूर्ण प्रमाणात उपयोग करणे आवश्यक असते.

## ५.२ संसाधनांचे वर्गीकरण :

कुटुंबासाठी उपलब्ध संसाधने वेगवेगळ्या प्रकारे वर्गीकृत केल्या जाऊ शकतात. संसाधनांच्या स्रोताच्या आधारे संसाधनांचे खालील दोन प्रकारात वर्गीकरण करतात.

**संसाधनांचे वर्गीकरण**

**मानवीय संसाधने**
- वेळ
- ऊर्जा/शक्ती
- रुची/आवड
- कुशलता/कौशल्य
- ज्ञान
- योग्यता
- प्रवृत्ती

**अमानवीय संसाधने**
- पैसा
- भौतिक संसाधने
- मालमत्ता
- सामुदायिक सुविधा

### जरा डोके चालवा.

खालील दिलेल्या संसासधनांना मानवीय आणि अमानवीय संसाधने म्हणून ओळखा व लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| वेतन, निवृत्ती वेतन, नफा इत्यादी. | | विविध उपकरणांविषयीचे ज्ञान | |
| शारीरिक व मानसिक कामाकरिता उपयोगी | | घर, गुंतवणूक, दागदागिने इत्यादी | |
| दवाखाने, शाळा, महाविद्यालये, वाहतुकीची साधने, बगिचे, उद्याने, ग्रंथालये | | पेंटींग, पाककला, भरतकाम, खेळ इत्यादी उपयुक्त. | कौशल्य |
| शारीरिक व मानसिक योग्यता म्हणून वर्गीकरण करता येऊ शकते. | | काम करण्याची प्रवृत्ती | |
| संगीत, सजावट, वाचन, लेखन इत्यादी | आवड/रुची | | |
| दिवसाचे चोवीस तास | | | |

**मानवीय संसाधने :**

व्यक्तिगत वैशिष्ट्ये व गुणविशेषांचा समावेश असलेल्या आणि मानवामध्ये आंतरिकरित्या निर्माण झालेल्या संसाधनांना मानवी संसाधने असे म्हणतात. अशी संसाधने नेहमी मानवी गुण व व्यक्तिगत स्वभाव-वैशिष्ट्ये किंवा विशेष गुणांशी संबंधित असतात. मानवीय संसासधने काही प्रमाणात मूर्त किंवा अमूर्त स्वरूपाची असतात. व्यक्तीला ती अनुभवता येतात पण प्रत्यक्ष पाहता किंवा मोजता येऊ शकत नाहीत. त्यांच्या अमूर्त स्वरूपामुळे त्यांचे महत्त्व सहज लक्षात येत नाही. अशी संसाधने अनेकदा दुर्लक्षित असतात किंवा त्यांचा उपयोग पूर्ण प्रमाणात केला जात नाही. वेळ, ऊर्जा/शक्ती, कौशल्य, योग्यता, ज्ञान, प्रवृत्ती, रुची किंवा आवड इत्यादी मानवी संसाधने आहेत. या संसाधनांचा उत्पादनक्षम हेतूने उपयोग करतात.

१) **वेळ :** सतत घडणाऱ्या घटनांचा क्रम म्हणजे वेळ. वेळ हे महत्त्वाचे मानवी संसाधन आहे. एकदा वाया गेलेला वेळ परत मिळविता येत नाही. प्रत्येक व्यक्तीला वेळ सारख्याच प्रमाणात व मर्यादित स्वरूपात उपलब्ध असतो. मिनिट, तास, दिवस, आठवडे, महिने यासारखी परिमाणे वापरून वेळ सहज मोजता येतो. सर्वांना ध्येय साध्य करण्यासाठी व इतर भौतिक संसाधनांच्या निर्मितीसाठी वेळेचा उपयोग होतो. वेळेची जाणीव व वेळेचे महत्त्व व्यक्तीपरत्वे बदलते. ठरविलेले काम जलदगतीने व सहज होण्यासाठी आणि ताण-तणाव कमी करण्याकरिता वेळेचे व्यवस्थापन व्यक्तीला सक्षम करते.

२) **ऊर्जा किंवा शक्ती :** काम करण्याची क्षमता म्हणजे ऊर्जा किंवा शक्ती अशी ऊर्जा किंवा शक्तीची व्याख्या करतात. सक्रिय शारीरिक आणि मानसिक कार्य करण्याची ताकद म्हणजे ऊर्जा/शक्ती आहे. विविध कार्य करण्याकरिता प्रत्येकालाच ऊर्जा किंवा शक्तीची आवश्यकता असते. ऊर्जा सहज मोजणे कठीण आहे. एखादे काम केल्यानंतर जाणवणारा थकवा किंवा कंटाळा हे काम करताना वापरलेल्या ऊर्जेची किंवा शक्तीची व्यक्तीला जाणीव करून देऊ शकतो. व्यक्तीला उपलब्ध असलेली ऊर्जा किंवा शक्ती व्यक्तीपरत्वे आणि कालपरत्वे भिन्न असते. व्यक्तिगत आरोग्य, कामातील आवड, काम करण्याची परिस्थिती आणि काम पूर्ण करण्यासाठी लागणारे प्रयास इत्यादींचा ऊर्जेच्या किंवा शक्तीच्या वापरावर परिणम होतो. कार्याचा योग्य क्रम, योग्य पद्धती ठेवल्यास आणि अनावश्यक हालचाली टाळल्यास ऊर्जेचे व्यवस्थापन करता येते.

कोणतेही ध्येय पूर्ण करण्यासाठी आणि काम करण्यासाठी लागणाऱ्या ऊर्जेचे दोन प्रकारात वर्गीकरण करता येते. :

(अ) शारीरिक ऊर्जा किंवा शक्ती

(ब) मानसिक ऊर्जा किंवा शक्ती

**शारीरिक शक्ती किंवा ऊर्जा म्हणजे शारीरिक कार्य करण्याची क्षमता आणि सुप्त ताकद होय.** वाचणे, चालणे, चढणे, धावणे, वस्तू उचलणे यांसारख्या विविध क्रिया करण्याकरिता विविध प्रयास, जसे – दृष्य प्रयास, मानसिक प्रयास, विशेषांग प्रयास, पादप्रयास, हस्तप्रयास इत्यादींची गरज असते. दृष्य प्रयास व मानसिक प्रयासांकरिता कमी ऊर्जा लागते तर विशेषांग प्रयासास जास्त ऊर्जा वापरली जाते.

**मानसिक ऊर्जा किंवा शक्ती म्हणजे मानसिक काम करण्यासाठीची ताकद किंवा सामर्थ्य होय.** निर्णय प्रकियेत विचार करताना कारणमीमांसा, पाठ करणे आणि आठवणे यांसारख्या क्रियांसाठी मानसिक ऊर्जा किंवा शक्तीची आवश्यकता असते.

**विचार करा :**
शारीरिक आणि मानसिक ऊर्जा/शक्ती यांमधील फरक.

**३) आवड किंवा रुची :** ऑक्सफोर्ड डिक्शनरीनुसार रुची किंवा आवड म्हणजे काहीतरी किंवा कोणाबद्दल जाणून घेण्याची किंवा शिकण्याची इच्छा असणे. सोपविलेल्या कामात आवड असणे अतिशय महत्त्वाचे असते. जर एखाद्या कामात आवड असेल, तर ते काम जलद व उत्तम गुणवत्ता दर्जासह कार्यक्षमतने पूर्ण होते. कुटुंबातील विविध सदस्यांना वेगवेगळ्या कामात आवड असल्याचे निदर्शनास येते. यामुळे आवडीप्रमाणे कामाची विभागणी केल्यास थकवा न येता कामात आनंद वाटतो आणि विशिष्ट कामात यश मिळण्यास मदत होते. कौटुंबिक सदस्यांच्या विविध रुची किंवा आवड, काही संसाधनांची बचत करण्यास किंवा काही संसाधने निर्माण करण्यास मदत करतात. उदाहरणार्थ : गार्डनिंगमध्ये आवड असलेले कौटुंबिक सदस्य घरी गार्डन करून भाज्या पिकवून पैशाची बचत करू शकतात.

**४) योग्यता : दिलेले काम करण्याची व्यक्तीची शारीरिक आणि मानसिक क्षमता म्हणजे योग्यता.** काही व्यक्तींजवळ काम करण्याची शारीरिक क्षमता किंवा ताकद असते, तर काहींजवळ बौद्धिक क्षमता असते. योग्यता सामान्यपणे जन्मजात असतात आणि प्रशिक्षण व सरावाने म्हणजेच वारंवार केल्याने ती वाढू शकते. रुचीमुळे योग्यता वाढते. एखाद्या व्यक्तीला एखाद्या कामात रुची असल्यास ती किंवा तो ते काम वारंवार करते, ज्यामुळे योग्यता वृद्धिंगत होण्यास मदत होते.

**५) कौशल्य किंवा कुशलता :** कार्यक्षमतेने आणि दर्जात्मक काम करण्याची योग्यता म्हणजे कौशल्य किंवा कुशलता. कुटुंबातील सदस्यांजवळ पाककला, शिवण काम यांसारख्या नावीन्यपूर्ण कलेतील कौशल्ये अशी विविध क्षेत्रातील कौशल्ये असतात. यातील काही कौशल्ये जन्मजात असतात, तर काही सरावाने व प्रशिक्षणाने संपादित करता येतात. जर व्यक्तीला त्यात आवड असेल, करण्याची योग्यता असेल आणि शिकण्याची व सरावाची इच्छा असेल, तर कोणतेही कौशल्य मिळवता किंवा प्राप्त करता येऊ शकते. उदाहरणार्थ : गृहिणी मायक्रोवेव्ह ओव्हन, फूड प्रोसेसर यांसारखी उपकरणे हाताळण्याचे तंत्र शिकून स्वयंपाकातील कौशल्य वाढवू शकते.

**६) ज्ञान :** योग्य पर्यायाची निवड करण्यासाठी आणि संसाधनांचा अपव्यय टाळण्यासाठी ज्ञान हे मानवीय संसाधन अतिशय महत्त्वाचे आहे. शिक्षण किंवा अभ्यासाने आणि अनुभवाने ज्ञान मिळविता येते आणि मिळवलेले ज्ञान सतत वाढविताही येते. पोशाख निर्मिती, पोषणशास्त्र व श्रमबचतीच्या साधनांचे गृहिणीला असलेले ज्ञान जीवनाची गुणवत्ता वाढविण्यास निश्चितच सहाय्यक ठरू शकते.

**७) प्रवृत्ती :** एखाद्याबद्दल किंवा एखाद्या गोष्टीबद्दल विचार करण्याची पद्धत किंवा भावना म्हणजे प्रवृत्ती, जे एखादी क्रिया करण्यास प्रेरणा देते किंवा कामाची प्रगती थांबवते. काही व्यक्ती आपल्या ध्येयासाठी आशावादी प्रवृत्तीच्या असतात, म्हणूनच त्या स्वयंप्रेरणेने च उत्साहाने योग्य दिशेने कार्य करतात. निराशावादी प्रवृत्तीच्या व्यक्ती मंद गतीने काम करतात किंवा काम थांबवतात. निराशावादी प्रवृत्तीच्या लोकांना काम करण्यासाठी दुसऱ्यांकडून प्रेरणेची आणि समुपदेशनाची आवश्यकता असते. ठरविलेली ध्येय यशस्वीरित्या साध्य करण्यासाठी व्यक्तीने परिस्थितीनुरूप आणि बदलांनुसार आपल्या प्रवृत्तीचे स्वरूप बदलावे.

**थोडे आठवा :**
१. तुम्ही वरीलप्रमाणे शिकलेल्या संसाधनांपैकी विविध मानवीय संसाधने कोणती ?
२. तुमच्या दैनंदिन जीवनात मानवी संसाधनांचा उपयोग काय ?

**अमानवीय संसाधने :**

अमानवीय संसाधने मूर्त स्वरूपाची असतात. ही संसाधने सहज ओळखता येतात. पैसा, भौतिक वस्तू, नाशवंत आणि अनाशवंत अन्नपदार्थ, उपकरणे, फर्निचर, दागदागिने, मालमत्ता तसेच दवाखाने, बगिचे, ग्रंथालये, पोलिस दल, अग्निशामक सेवा, बाजार, वाहतुकीच्या सुविधा, पाणीपुरवठा, वीजपुरवठा इत्यादी सामुदायिक सेवा-सुविधांचा यात समावेश होतो. अमानवीय संसाधने एका व्यक्तीकडून दुसऱ्याला सहज हस्तांतरित करता येतात. अशा सर्व संसाधनांना स्वत:ची मर्यादा व वैशिष्ट्ये असतात. मानवीय संसाधनांच्या उपयोगाने ही संसाधने निर्माण होतात. जास्तीत जास्त ध्येय साध्य करण्यासाठी या संसाधनांचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक असते.

१) **पैसा :** अमानवीय संसाधनांपैकी पैसा हे महत्त्वाचे संसाधन आहे. पैसा सहज मोजता येतो व हस्तांतरित करता येतो. वस्तू किंवा सेवा मिळविण्याचे पैसा हे सर्वमान्य माध्यम आहे. वेतन, मानधन, व्याज, भाडे, नफा इत्यादी पैसा मिळविण्याचे मार्ग आहेत. पैसा सर्वांना सारख्या प्रमाणात उपलब्ध नसतो, परंतु इतर संसाधनांच्या वापराने जास्तीचे काम करून वाढविता येऊ शकतो. भविष्यात आयुष्य सहज व सुखकर होण्याकरिता पैसा बचत करून साठवून ठेवता येऊ शकतो. परिस्थितीनुरूप पैशाची उपलब्धता बदलत असल्यामुळे पैशाचे योग्य व्यवस्थापन करणे महत्त्वाचे असते. पैशाच्या काळजीपूर्वक उपयोगाकरिता अंदाजपत्रक तयार करणे ही सामान्य पद्धत आहे.

२) **भौतिक वस्तू :** दैनंदिन उपयोगातील वापरून संपणाऱ्या गोष्टी जसे - अन्नधान्य, कपडे इत्यादी तसेच दीर्घकाळ टिकणाऱ्या वस्तू जसे - विविध उपकरणे, फर्निचार, सजावटी वस्तू, वाहने इत्यादींचा भौतिक वस्तूंमध्ये समावेश होतो. अशा संसाधनांची संख्यात्मक व गुणात्मक मोजमाप सहज करता येते, यामुळेच प्रत्येक कुटुंबाला आपल्याजवळ असलेल्या अशा संसाधनांच्या उपलब्धतेची व त्यांच्या उपयोगाची स्पष्ट कल्पना असते. ही संसाधने सामान्यपणे विकत घेतात किंवा कुटुंबाने तयार केलेली असतात. अशा संसाधनांचा दर्जा व उपलब्धता पैशाच्या उपलब्धतेवर अवलंबून असतो. घरी तयार केलेल्या भौतिक वस्तूंच्या मर्यादा व दर्जा, मानवीय संसाधने जसे - योग्यता, कौशल्य, आवड, प्रवृत्ती, वेळ आणि ऊर्जा इत्यादींवर अवलंबून असतो.

३) **मालमत्ता :** कुटुंबाजवळ उपलब्ध असलेल्या मौल्यवान वस्तू व बाबी म्हणजे मालमत्ता होय. मालमत्तेत बचत व गुंतवणुकीचा समावेश होतो. पैसा भविष्यात उपयोगी पडावा म्हणून बँक, पोस्ट ऑफिस इत्यादीमध्ये बचत करून ठेवतात. तसेच शेअर्स, बॉन्ड्स, घर, जमीन व दागदागिन्यांमध्येही पैशाची गुंतवणूक करून ठेवू शकतात. अडचणीच्या वेळी अशा संसाधनांचे पैशात रूपांतर करता येऊ शकते. भविष्यात अडचणींवर मात करण्यासाठी प्रत्येकाजवळ काही मालमत्ता असणे आवश्यक आहे.

४) **सामुदायिक सुविधा :** मनुष्य हा कुटुंब आणि समाजाचा घटक आहे; म्हणूनच प्रत्येक व्यक्ती सामुदायिक सुविधांचा फायदा घेऊ शकतो. सामुदायिक सुविधा किंवा सेवांचे तीन गटात वर्गीकरण केले जाते.

अ) आरोग्य आणि सुरक्षा सेवा

ब) आत्मसंवर्धन किंवा व्यक्तिमत्त्व विकास सेवा केंद्रे

क) सार्वजनिक/सामुदायिक सेवा

**करून पहा व याबाबत विचार करा :** दिलेल्या तक्त्यात खालील बाबींचे वर्गीकरण करा.

ग्रंथालय, वाहतुकीच्या सुविधा, अग्निशामक दल, वीज व पाणीपुरवठा, शैक्षणिक संस्था, आरोग्य केंद्र, खेळाचे मैदान, छंद केंद्रे, टेलिफोन, दवाखाने, पोस्ट ऑफिस सेवा, सामाजिक क्लब, उद्याने, बँक, पोलिस, संगणक केंद्रे.

| आरोग्य आणि सुरक्षा सेवा | आत्मसंवर्धन किंवा व्यक्तिमत्त्व विकास सेवा/केंद्र | सांस्कृतिक/सामुदायिक सेवा |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

१) **दवाखाने/रुग्णालये :** आजारी व्यक्ती, अपघातातील व्यक्ती, गर्भवती स्त्रिया, तान्ही बाळं, मुले व वृद्ध अशा सर्वांना शासकीय आणि खाजगी दवाखान्यात वैद्यकीय उपचार मिळतात. ज्या रुग्णांची आर्थिक परिस्थिती चांगली नसते किंवा जे आर्थिक अडचणीत असतात किंवा दारिद्रेषेच्या खाली असतात, अशा रुग्णांना माफक दरात वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्याकरिता शासकीय दवाखाने असतात. अशी रुग्णालये साधारणपणे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना जोडलेली असतात. अशा रुग्णालयात आपत्कालीन आणि तातडीच्या वैद्यकीय सेवा उपलब्ध असतात, याबरोबरच रोगमुक्त करणारी व रोगप्रतिबंधक औषधे मोफत किंवा कमी दरात उपलब्ध असतात.

या दवाखान्यांमध्ये शल्यचिकित्सा विभाग, क्ष-किरण चिकित्सा, दंत विभाग, सांसर्गिक रोग्यांसाठी स्वतंत्र विभाग (Isolation Ward), मलमूत्र चिकित्सा केंद्र इत्यादींपासून विशिष्ट आजारांकरिता विशिष्ट व अतिविशिष्ट (Speciality and Super Speciality) विभागांचा समावेश असतो. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थापन केलेली आहेत तसेच जिल्हा पातळीवर जिल्हा रूग्णालये आणि रक्तपेढीची उपलब्धता आहे.

या व्यतिरिक्त खाजगी रुग्णालये आणि शुश्रुषा सदने (Nursing Homes) विशेष शिक्षण घेतलेल्या तज्ज्ञांद्वारे चालविली जातात. विशेषता आणि अतिविशिष्टता (Speciality and Multispeciality) रुग्णालयात अपघात उपचार केंद्र, स्वतंत्र किंवा विभक्त विभाग (Isolation Ward), रक्तपेढी, क्ष-किरण विभाग, आंतर व बाह्य रुग्ण विभाग, शल्यचिकित्सागृह, अतिदक्षता विभाग (ICU) व अतिविशेष दक्षता विभाग (ICCU) असे वेगवेगळे विभाग असतात. रुग्णाला ताबडतोब दवाखान्यात भरती करण्यासाठी रुग्णवाहिकेची सोय असते. या व्यतिरिक्त विविध खाजगी संस्थांद्वारे अतिविशेष रुग्णालये चालविली जातात.

२) **पोलिस :** सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याकरिता किंवा राखण्याकरिता तसेच जनतेच्या मालमत्तेचे व जीविताचे रक्षण करण्यासाठी पोलिस सेवा कार्यरत असते. महिलांची सुरक्षितता, हरविलेल्या व्यक्तींचा तपास, वाहन मार्गदर्शन व रहदारी नियंत्रण, गुन्ह्याच्या तक्रारींची नोंद घेऊन तपास करणे, तसेच निदर्शने, सभा, मोर्चे, धरणे, आंदोलने, मिरवणुका, संप आणि धार्मिक मिरवणूका योग्य पद्धतीने हाताळून नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी पोलिस दलावर सोपविलेली असते. पोलिस दलाच्या मदतीला श्वान पथक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, फिंगरप्रिंट ब्युरो, विस्फोटक ओळखणारे व निष्क्रिय करणारे पथक इत्यादी असते. प्रत्येक नागरिक या सेवांचा लाभ घेण्यास पात्र असतो.

३) **अग्निशामक दल :** संकटकाळी नागरिकांचे प्राण वाचविणे आणि सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे हा अग्निशामक दलाचा मुख्य उद्देश आहे. या सेवेचे दुसरे उद्दिष्ट म्हणजे कोठेही आग लागल्यास ती विझवणे व तेथील लोकांचे प्राण वाचविणे हे आहे. आग लागलेल्या स्थळी किंवा अपघाताच्या ठिकाणी बचाव कार्य व प्राथमिक उपचार करण्यासाठी अग्निशामक दलात आग विझविण्यासाठी लागणारे विशेष साहित्य व उपकरणांनी सुसज्ज गाड्या आणि तज्ज्ञ व प्रशिक्षित पथक असते. ही सेवा मोठ्या शहरात व महानगरपालिकेच्या क्षेत्रात उपलब्ध असते.

४) **करमणुकीची केंद्रे :** जनतेला दैनंदिन कामातील ताण दूर करून तनमन उत्साहित करण्यासाठी व कामाची प्रेरणा मिळण्यासाठी करमणूक किंवा मनोरंजन आवश्यक असते. शहरामध्ये करमणुकीच्या विविध सुविधा असलेली अनेक करमणूक केंद्रे असतात. यात चित्रपटगृहे, नाट्यगृहे, बैठे व मैदानी खेळ यांसाठी केंद्रे, ग्रंथालये आणि उद्याने इत्यादींचा समावेश होतो.

५) **छंद केंद्रे :** पेंटींग, संगीत, नृत्य, ओरिगामी, मूर्तीकाम इत्यादी विविध छंद जोपासण्यासाठी व विकसित करण्यासाठी विविध कला केंद्रे किंवा छंद केंद्रे असतात. लोक आपले छंद किंवा कौशल्य विकसित करण्यासाठी या केंद्राचा फायदा घेऊ शकतात.

६) **क्लब व सामुदायिक केंद्रे :** क्लब व सामुदायिक केंद्रांमुळे आत्मसंवर्धन किंवा व्यक्तिमत्त्व विकास होण्यास मदत होते. अशी केंद्रे फावल्या वेळात करायच्या विविध क्रिया किंवा काम उपलब्ध करून देतात. या केंद्राद्वारे विविध स्पर्धा, ज्ञानवर्धक कार्यक्रम, स्नेहसंमेलन इत्यादींचे आयोजन करून विविध धार्मिक, सामाजिक व राष्ट्रीय सण साजरे केले जातात.

७) **सार्वजनिक उद्याने व बगिचे :** मानवाच्या आनंदासाठी आणि मनोरंजनाकरिता सार्वजनिक उद्याने व बगिचे असणे अत्यंत आवश्यक आहे. व्यक्तीला फावला वेळ घालवण्यासाठी, वृद्ध आणि मुलांना खेळण्यासाठी आवश्यक

असतात. उद्याने व बगिचांचा उपयोग चालण्यासाठी, जॉगिंगसाठी व जिमसाठी होतो. अशा उद्यानांची व बगिचांची देखभाल व व्यवस्थापन महानगरपालिका करते.

८) **शैक्षणिक संस्था :** प्राथमिक शिक्षणातून व्यवसायाभिमूख शिक्षण व व्यावसायिक शिक्षण देण्याकरिता सरकारी, निमसरकारी आणि खाजगी संस्था विविध शैक्षणिक संस्था चालवितात. या संस्था शिक्षणासाठी आवश्यक सोयी–सुविधा उपलब्ध करून देतात आणि व्यक्तीच्या योग्यतेनुसार, आवडीनुसार व शैक्षणिक गुणवत्ता किंवा बुद्धिमत्तेनुसार विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. मूल्यशिक्षण आणि व्यक्तिमत्त्व विकास ही देखील शिक्षणाची महत्त्वाची अंग आहेत, ज्यामुळे जीवनाचा भक्कम पाया तयार होतो. शिक्षणामुळे व्यक्तीला आर्थिक स्थैर्य व सामाजिक प्रतिष्ठा लाभते. शिक्षणामुळे जबाबदार नागरिक निर्माण होतो.

९) **इतर सेवा :** टपाल सेवा, दूरभाष सेवा आणि वाहतूक सेवांचा या प्रकारात समावेश होतो.

अ) **टपाल सेवा/डाक :** केंद्र सरकार टपाल सेवा पुरविते, यालाच भारतीय टपाल किंवा डाक कार्यालय असेही म्हणतात. हा संचार आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत येणारा विभाग आहे. टपाल किंवा डाक सेवेचे मूलभूत कार्य म्हणजे पत्रांचे संकलन, प्रक्रिया, प्रसारण आणि वितरण करणे हे आहे, यात पत्र व बिलांचा समावेश होतो. ही सेवा पार्सल्स, मनीऑर्डर त्याचबरोबर तिकिटे, पोस्टकार्ड्स आणि पाकिटे इत्यादी टपाल साहित्य विकणे अशा सेवा पुरविते.

टपाल कार्यालय बचत बँक, इलेक्ट्रॉनिक भारतीय पोस्टल ऑर्डर, भारतीय पोस्ट पेमेंट बँक, पोस्टल जीवन विमा अशा सेवा पुरविते. टपाल विभागाच्या अल्पबचत विभागामार्फत बचतीच्या विविध योजना, जसे बचत खाते, आवर्ती ठेव खाते, मुदतबंद ठेव, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे आणि किसान विकास पत्र इत्यादी योजना राबविल्या जातात. लोकांमध्ये बचतीची सवय विकसित करण्यास याची मदत होते.

ब) **वाहतुकीच्या सेवा :** नागरिकांकरिता वाहतुकीच्या विविध सेवा जसे – राज्य परिवहन मंडळाची बस सेवा, रेल्वे सेवा, विमान सेवा, जलवाहतूक सेवा, केंद्र व राज्य सरकारद्वारे तसेच स्थानिक प्रशासन व खाजगी कंपन्यांद्वारे चालविल्या जातात.

क) **दूरभाष सेवा :** दूरभाष सेवेत फोन (landline telephone) आणि भ्रमणध्वनी सेवेचा समावेश होतो. ही सेवा स्थानिक व जागतिक पातळीवर संवाद साधण्यासाठी स्थानिक कॉल्स्, एस.टी.डी., आय.एस.डी. सेवा देते. दूरभाष विभाग ग्राहकांसाठी इंटरनेट सेवा देखील उपलब्ध करून देते. हा विभाग केंद्र सरकारद्वारा चालविला जातो. आजकाल खाजगी सेवा देणाऱ्या संस्थाही फोन, भ्रमणध्वनी सेवा व इंटरनेट सेवा देतात.

**सांगा पाहू :**

यापूर्वी तुम्ही कोणकोणत्या सामुदायिक सेवांना भेटी दिल्या आहेत/वापरल्या आहेत?

**जरा डोके चालवा.**

मानवीय आणि अमानवीय संसाधनातील फरक सांगा

| मानवीय संसाधने | अमानवीय संसाधने |
|---|---|
| ही अमूर्त स्वरूपाची असतात. | ही मूर्त स्वरूपाची असतात. |
| | |
| | |
| | |

### ५.३ संसाधनांची वैशिष्ट्ये :

संसाधनांचा आणि गृहव्यवस्थापनाचा घनिष्ट संबंध आहे. संसाधनाच्या व्यवस्थापनामुळे संसाधनांचा योग्य वापर करता येऊ शकतो. त्याचप्रमाणे संसाधनाच्या योग्य वापरामुळे त्याचे व्यवस्थापन चांगले करता येते. संसाधनांच्या व्यवस्थापनाकरिता प्रत्येक व्यक्तीला संसाधनांची वैशिष्ट्ये माहिती असणे आवश्यक आहे.

संसाधनांची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत –

अ) संसाधने उपयुक्त असतात.

ब) संसाधने मर्यादित असतात.

क) संसाधने परस्पर संबंधित असतात.

ड) सर्व संसाधनांना व्यवस्थापन प्रक्रिया लागू करता येते

**नेहमी लक्षात ठेवा :**
संसाधनांची वैशिष्ट्ये काय काय आहेत?

**अ) संसाधने उपयुक्त असतात :** उपयुक्तता हे सर्व संसाधनांचे मूलभूत वैशिष्ट्य आहे. संसाधने म्हणजे अशी गोष्ट, की ज्याद्वारे आपल्याला कार्य करता येते किंवा ध्येय साध्य करता येते. संसाधनांची ही परिभाषाच उपयुक्तता हे वैशिष्ट्य स्पष्ट करते. विशिष्ट ध्येय किंवा विशिष्ट परिस्थितीच्या अनुषंगाने संसाधनांची उपयुक्तता ओळखता येऊ शकते. विशिष्ट परिस्थितीत एखादे संसाधन महत्त्वाचे किंवा प्रमुख संसाधन म्हणून वापरले जाते, तर इतर संसाधने सहाय्यभूत संसाधने म्हणून भूमिका निभावतात. उदाहरणार्थ, उपकरणाच्या खरेदीस पैसा हे संसाधन प्रमुख असते, तर परीक्षेत ज्ञान आणि हुशारी प्रमुख संसाधन म्हणून काम करते. एखाद्या गोष्टीची उपयुक्तता ओळखल्याशिवाय त्याला संसाधन म्हणता येत नाही.

**ब) संसाधने मर्यादित असतात :** सर्व मानवीय व अमानवीय संसाधने मर्यादित असतात. काही संसाधनांची उपलब्धतता इतर संसाधनांपेक्षा कमी असते म्हणूनच त्याचा काळजीपूर्वक उपयोग करणे गरजेचे असते. याकरिताच व्यवस्थापन प्रक्रियेचे ज्ञान आणि उपयोगिता माहिती असणे गरजेचे असते. विशिष्ट ध्येयाच्या अनुषंगाने संसाधनांची मर्यादा ओळखावी. संसाधनांची मर्यादा व्यक्तीपरत्वे बदलते. संसाधनांच्या मर्यादा दोन प्रकारच्या असतात –

अ) परिमाणात्मक मर्यादा

ब) गुणात्मक मर्यादा

**अ) परिमाणात्मक मर्यादा :** सर्व अमानवीय संसाधनांना परिमाणात्मक मर्यादा असतात. परिमाणात्मक मर्यादा सहज मोजता येण्यासारख्या असतात. उदाहरणार्थ, व्यक्ती किंवा कुटुंबाजवळ उपलब्ध असलेला पैसा वेळेसारख्या मानवीय संसासधनाला परिमाणात्मक मर्यादा आहेत. जसे – प्रत्येक व्यक्तीला तिचे दैनंदिन व्यवहार पार पाडण्यासाठी २४ तासच उपलब्ध असतात.

**ब) गुणात्मक मर्यादा :** सर्व संसाधनांना गुणात्मक मर्यादा असतात. अशा मर्यादा मोजणे कठीण असते. अशा मर्यादा प्रत्येकाने ओळखाव्यात व जाणून घ्याव्यात. उपयोगिता, आरामदायकता, टिकाऊपणा इत्यादी वैशिष्ट्यांच्या बाबतीत गुणात्मक मर्यादा वेगवेगळी असते.

निर्णय घेताना प्रत्येकाने संसाधनांच्या गुणात्मक मर्यादा लक्षात घेणे आवश्यक असते. कुटुंबातील सदस्यांजवळ असणाऱ्या योग्यता आणि प्रवृत्तींना देखील काही मर्यादा असतात. या मर्यादा व्यक्तीच्या जन्मजात योग्यता व प्रशिक्षणावर अवलंबून असतात. काही लोकांजवळ असलेली जन्मजात योग्यता प्रशिक्षणाने वाढविता येऊ शकते, परंतु काही लोकांजवळ अशी योग्यता नसल्यास कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण अशी योग्यता वाढवू शकत नाही.

**क) संसाधने परस्पर संबंधित असतात :** ध्येयाची पूर्तता करण्याकरिता सर्वसामान्यपणे आपल्याला एकापेक्षा अधिक संसाधने किंवा अनेक संसाधनांची एकत्रितरित्या गरज असते. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीला संगणक वर्गाला जायचे असेल तर त्याला किंवा तिला संसाधनांची एकत्रित गरज असते जसे, फी करिता पैसे, जास्तीचा वेळ व ऊर्जा आणि संगणक. असे दिसून येते की, एका संसाधनाची बचत केल्यास दुसरे संसाधन जास्त वापरले जाते किंवा उपयोगात येते. एका संसाधनाचा उपयोग दुसऱ्या संसाधनाच्या उपयोगावर परिणाम करू शकतो. एखाद्या संसाधनाची कमतरता किंवा अतिशय अल्प प्रमाणात असलेली उपलब्धता ठरविलेल्या ध्येयाच्या प्राप्तीवर परिणाम करू शकते. उदाहरणार्थ, रेडिमेड ड्रेस विकत घेण्यापेक्षा ड्रेस घरी शिवल्यास पैशाची बचत होईल, परंतु वेळ व ऊर्जा जास्त वापरली जाईल. कुटुंबातील सदस्यांजवळ असलेल्या जन्मजात कौशल्य व योग्यतेचा उपयोग करून स्वत:चा व्यवसाय

सुरू केल्यास पैसा जास्त मिळेल, ज्यामुळे ध्येय साध्य करण्यासाठी उपकरणे व सेवा उपलब्ध होऊ शकतात.

**ड) सर्व संसाधनांना व्यवस्थापन प्रक्रिया लागू करता येते :** बऱ्याच वेळा व्यक्ती किंवा कुटुंबाजवळ असलेली संसाधने मर्यादित असतात व साध्य करावयाची ध्येय असंख्य असतात. अशा वेळी व्यवस्थापन प्रक्रिया उपयुक्त ठरते. संसाधनांची गरज आणि उपलब्धतेतील दरी भरून काढण्यासाठी व्यवस्थापन प्रक्रिया साहाय्य करते. काळजीपूर्वक विचाराने, योग्य निर्णय घेऊन उत्तम नियोजन आणि वेळेच्या नियंत्रणामुळे संसाधनांची उपयोगिता वाढविता येऊ शकते. उदाहरणार्थ, कौटुंबिक अंदाजपत्रक केल्यामुळे अनावश्यक खर्च कमी करून खरेदीचा व बचतीचा प्राधान्यक्रम ठरविण्यास मदत होते. अशा अंदाजपत्रकाचे मूल्यांकन कौटुंबिक उत्पन्न, बचत व गुंतवणूक वाढविण्याचे मार्ग सुचविते. त्याचप्रमाणे व्यवस्थापन प्रक्रियेच्या उपयोगाने सर्व संसाधनांची उपयोगिता वाढविता येऊ शकते. संसाधनांच्या वरील मूलभूत वैशिष्ट्यांव्यतिरिक्त अजून काही वैशिष्ट्ये आहेत.

**चर्चा करा :**

संसाधनांची खालील वैशिष्ट्ये उदाहरणांसह स्पष्ट करा :

अ) संसाधने विकसित करता येऊ शकतात.

ब) संसाधनांचा पर्यायी उपयोग करता येऊ शकतो.

क) संसाधने जीवनाची गुणवत्ता वाढवितात.

ड) संसाधनांचा पर्यायी उपयोग असतो.

**जरा डोके चालवा :**

मानवीय आणि अमानवीय संसाधनांमधील समानतेची यादी करा.

**५.४) कौटुंबिक संसाधानांच्या उपयोगावर परिणाम करणारे घटक :** खालील घटक संसाधनांच्या उपयोगावर परिणाम करतात.

अ) ज्ञान, कौशल्य व प्रवृत्ती

ब) शिक्षण

क) राहणीमानाचा स्तर

ड) मौद्रिक उत्पन्न

इ) वास्तव्याचे ठिकाण

फ) कौटुंबिक जीवनचक्राच्या अवस्था

ग) गृहिणींचे आर्थिक सहाय्य

**अ) ज्ञान, कौशल्य व प्रवृत्ती :** ज्ञान, कौशल्य व प्रवृत्ती यासारख्या मानवीय संसाधनांचा वापर इतर मानवीय व अमानवीय संसाधनांच्या उपयोगांवर परिणाम करू शकतो. फूडप्रोसेसर, ओव्हन, मायक्रोवेव्ह ओव्हन यांसारखी आधुनिक उपकरणे वापरण्याचे ज्ञान असल्यास, विविध पदार्थ करण्याचे कौशल्य असल्यास आणि कुटुंबाकरिता स्वयंपाक करण्याची प्रवृत्ती असल्यास कुटुंबाचा वेळ, ऊर्जा आणि पैशाची बचत होण्यास मदत होऊन त्याच्या उपयोगाने इतर ध्येय साध्य करता येतात.

**ब) शिक्षण :** शिक्षणातून मिळणाऱ्या माहितीमुळे ज्ञानाची पातळी वाढण्यास मदत होते, निर्णय घेण्याची क्षमता आणि व्यवस्थापकीय कौशल्य विकसित होतात. कुटुंबातील सदस्यांची विचार करण्याची क्षमताही शिक्षणामुळे वाढण्यास मदत होते.

**क) राहणीमानाचा स्तर किंवा दर्जा :** राहणीमानाचा स्तर म्हणजे व्यक्तीला उपलब्ध असलेला पैसा, सुखसोयी आणि समाधानाची पातळी होय, व्यक्ती जे जगण्यासाठी आवश्यक आहे असे समजत असते. राहणीमानाच्या स्तराचा संसाधनांच्या उपयोगावर परिणाम होतो. उदाहरणार्थ, राहणीमानाचा उच्च स्तर असलेले कुटुंब हे वेळ आणि ऊर्जेच्या बचतीसाठी श्रमबचतीच्या जास्त साधनांचा आणि स्वत:च्या वाहनाचा उपयोग करेल तर इतर कुटुंबे अशा साधनांच्या खरेदीकरिता पैशाची बचत करण्यासाठी जास्त वेळ आणि ऊर्जेचा उपयोग करतील.

**ड) मौद्रिक उत्पन्न :** पैसा किंवा मौद्रिक उत्पन्न हे कोणत्याही कुटुंबाचे भौतिक संसाधन असते. आवश्यक तेव्हा पैसा खर्च करून आपण घरात जास्त चांगल्या सोयी-सुविधा उपभोगू शकतो. जास्त पैसा असलेली कुटुंब चैनीच्या वस्तू, मनोरंजन आणि सुखसोयींकरिता सहज पैसा खर्च करेल, तर मध्यमवर्गीय कुटुंब आवश्यक ध्येयांच्या पूर्ततेकरिता पैशाचा काळजीपूर्वक उपयोग करेल.

**इ) वास्तव्याचे ठिकाण :** कुटुंबाचे वास्तव्याचे म्हणजे राहण्याचे ठिकाण हे वेळ, ऊर्जा किंवा शक्ती, पैसा

व वाहतुकीच्या सोयी यांसारख्या संसाधनांवर निश्चित परिणाम करते. कामाचे ठिकाण, शाळा, कॉलेज, बाजारपेठ इत्यादींपासून राहण्याचे ठिकाण दूर असल्यास दैनंदिन कामे करण्यासाठी कुटुंबाला वेळ, ऊर्जा, पैसा व इतर संसाधने जास्त प्रमाणात लागतात.

**फ) कौटुंबिक जीवनचक्राची अवस्था :** कुटुंबाच्या जीवनचक्राच्या अवस्था आणि कुटुंबाच्या आकारानुसार कौटुंबिक संसाधनांचा उपयोग खूप बदलतो. दोन व्यक्तींनी कुटुंबाची सुरुवात होते, अपत्यांच्या जन्मामुळे ते विस्तारते आणि मुले मोठी झाल्यामुळे शिक्षण किंवा नोकरीच्या निमित्ताने घराबाहेर पडल्यामुळे आकुंचित होते. या प्रत्येक अवस्थेत कुटुंबाचा आकार, निश्चित करण्याची आणि साध्य करावयाची ध्येये आणि संसाधनांची उपलब्धता बदलते व याचा संसाधनांच्या उपयोगावर परिणाम होतो. उदाहरणार्थ, कुटुंबाच्या प्रारंभिक अवस्थेत वेळ व ऊर्जेची मागणी कमी असते, तर विस्तारित अवस्थेत अपत्यांची काळजी घेण्यासाठी आणि त्यांना वाढविण्यासाठी गृहिणींना जास्त वेळ, ऊर्जा, पैसा आणि भौतिक वस्तूंचा वापर करावा लागतो. आकुंचित अवस्थेत कुटुंबात वृद्ध व्यक्ती असतात. त्यामुळे औषधांकरिता आणि पगारी मदतनिसाकरिता जास्त पैशांची गरज असते.

**ग) गृहिणींचे आर्थिक सहाय्य :** गृहिणी अर्थार्जन करीत असल्यास कुटुंबाचे उत्पन्न वाढते, त्यामुळे निश्चितच मानवीय संसाधने वाढतात. परंतु अशा वेळी गृहिणीची मानवीय संसाधने जसे – वेळ, ऊर्जा आणि कौशल्य जास्त उपयोगात येऊन गृहिणीला शारीरिक व मानसिक थकवा येऊ शकतो.

**चर्चा करा :**

वरील घटक तुमच्या दैनंदिन आयुष्यावर कसे परिणाम करतात?

**जोड माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाची :**

संगणकाचा संसाधन म्हणून उपयोग विस्तृतपणे सांगा.

**थोडे आठवा :**

- कौटुंबिक ध्येय साध्य करण्यासाठी व विविध कार्य करण्याकरिता कुटुंबाजवळ उपलब्ध असलेल्या मूर्त आणि अमूर्त घटकांना कौटुंबिक संसाधने असे म्हणतात.
- वेगवेगळ्या मागण्यांच्या पूर्ततेकरिता आवश्यकती सुप्तशक्ती असणारे महत्त्वपूर्ण घटक म्हणजे संसाधने.
- संसाधनांचे वर्गीकरण मानवीय संसाधने जसे – वेळ, ऊर्जा, कौशल्य, योग्यता, आवड, प्रवृत्ती इत्यादी आणि अमानवीय संसाधने जसे – पैसा, भौतिक वस्तू, मालमत्ता, सामुदायिक सुविधा असे करतात.
- सामुदायिक सुविधांमध्ये खालील सुविधांचा समावेश होतो.
  - अ) आरोग्य आणि सुरक्षा सेवा, जसे- दवाखाने, अग्निशामक दल, पोलिस इत्यादी.
  - ब) आत्मसंवर्धन आणि व्यक्तिमत्त्व विकास सेवा, जसे– शाळा, कॉलेज, ग्रंथालये, उद्याने, खेळाचे मैदान, छंद केंद्र, संगणक केंद्र, सामाजिक क्लब इत्यादी.
  - क) सार्वजनिक आणि सामुदायिक सेवा, जसे – टपाल सेवा, बँक, वाहतूक, टेलिफोन, वीज, पाणीपुरवठा इत्यादी.
- संसाधनांची मूलभूत वैशिष्ट्ये –
  - अ) संसाधने उपयुक्त असतात.
  - ब) संसाधने एकमेकांशी संबंधित असतात.
  - क) संसाधनांना मर्यादा असतात.
  - ड) सर्व संसाधनांना व्यवस्थापन प्रक्रिया लागू करता येते. ज्ञान, कौशल्य व प्रवृत्ती, शिक्षण, राहणीमानाचा दर्जा, वास्तव्याचे ठिकाण, कौटुंबिक जीवनचक्राच्या अवस्था आणि गृहिणींचे आर्थिक सहाय्य हे कौटुंबिक संसाधनांवर परिणाम करणारे घटक आहेत.

## स्वाध्याय

- **वस्तुनिष्ठ प्रश्न :**

**१) बहुपर्यायी प्रश्न.**

१. रक्षित करण्यात आलेल्या आधाराच्या व मदतीच्या ____________ ला संसाधन असे म्हणतात.

अ) ध्येय

ब) गरजा

क) स्रोत

२. ऊर्जा म्हणजे काम करण्याची ____________ होय.

अ) योग्यता

ब) कौशल्य

क) आवड

३. विविध संकटकाळी आणि अपघाताच्या वेळी नागरिकांचे प्राण वाचविणे आणि सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे ____________ चा मुख्य उद्देश आहे.

अ) पोलिस

ब) अग्निशामक दल

क) दवाखाने

४. ज्ञान हे ____________ संसाधन आहे.

अ) मानवीय

ब) अमानवीय

क) सामुदायिक

५. सर्व अमानवीय संसाधनांना ________ मर्यादा असतात.

अ) गुणात्मक

ब) परिमाणात्मक

क) गुणात्मक आणि परिमाणात्मक

**२) जोड्या जुळवा.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) सामुदायिक सेवा | अ) घर |
| २) ऊर्जा | ब) वेतन, निवृत्तीवेतन |
| ३) मालमत्ता | क) शारीरिक व मानसिक योग्यता |
| ४) योग्यता | ड) शाळा आणि महाविद्यालये |
| ५) पैसा | इ) शारीरिक व मानसिक काम |

**३) खालील वाक्ये चूक किंवा बरोबर ते ओळखा.**

१) राहणीमानाचा दर्जा कौटुंबिक संसाधनांच्या उपयोगांवर परिणाम करतो.

२) अमानवीय संसाधने आंतरिकरित्या निर्माण होतात.

३) वेळ हे मानवीय संसाधन आहे.

४) पैसा सर्वांनाच सारखा उपलब्ध असतो.

५) महाविद्यालये आणि दवाखाने ही मानवीय संसाधने आहेत.

- **लघुत्तरी प्रश्न :**

**१) थोडक्यात उत्तरे लिहा.**

खालील उत्तरे लिहा.

अ) संसाधनांचा अर्थ स्पष्ट करा.

ब) मानवीय संसाधनांची नावे लिहा.

क) अमानवीय संसाधनांची नावे लिहा.

**२) परिभाषा लिहा.**

अ) संसाधने

ब) मानवीय व अमानवीय संसाधने

क) वेळ

ड) ऊर्जा

इ) योग्यता

फ) प्रवृत्ती

**३) फरक लिहा.**

अ) मानवीय आणि अमानवीय संसाधने

ब) वेळ आणि पैसा

क) योग्यता आणि कौशल्य

**४) टीपा लिहा.**

अ) वेळ आणि ऊर्जा

ब) आवड आणि योग्यता

क) कौशल्य आणि ज्ञान

ड) पैसा आणि भौतिक वस्तू

इ) भौतिक वस्तू व मालमत्ता

फ) दवाखाने

ग) पोलिस व अग्निशामक दल

ह) मनोरंजन आणि छंद केंद्र

ई) क्लब, उद्याने व बगिचे

ज) शैक्षणिक संस्था

ह) टपाल सेवा

ल) वाहतुकीच्या सुविधा व टेलिफोन सेवा

• **दीर्घोत्तरी प्रश्न :**

अ) मानवीय संसाधने स्पष्ट करा.

ब) संसाधनांचे वर्गीकरण करून अमानवीय संसाधनांवर लिहा.

क) संसाधनांची वैशिष्ट्ये सविस्तर लिहा.

ड) कौटुंबिक संसाधनांच्या उपयोगावर परिणाम करणारे घटक उदाहरणांसह स्पष्ट करा.

**प्रोजेक्ट :**

१) तुमच्या कुटुंबाजवळ असलेली मानवीय व अमानवीय संसाधनांची यादी करा.

२) तुमच्या शहरात/गावात उपलब्ध असलेल्या सामुदायिक सुविधांचे निरीक्षण करा आणि त्याची जनतेला असलेल्या उपयुक्ततेचे विश्लेषण करा.

❑❑❑

# ६. कुटुंबाचे निवासस्थान

६.१ घराची संकल्पना आणि ओळख
६.२ घरांचे प्रकार
६.३ घरासाठी जागेची निवड

**तुम्हाला आठवतंय का?**

१. मानवाच्या मूलभूत गरजा कोणत्या?

२. निवासस्थान (घर) कोणती मूलभूत गरज पूर्ण करते?

तुम्ही तुमच्या शालेय जीवनामध्ये असे शिकला आहात की मानवाच्या काही मूलभूत गरजा असतात. मानवाच्या जगण्यासाठी त्या आवश्यक असतात. या गरजा म्हणजेच अन्न, वस्त्र आणि निवारा. या गरजांव्यतिरिक्त शिक्षण, स्वच्छ आणि आरोग्यपूर्ण वातावरण अशा गरजा देखील सांगितल्या आहेत. परंतु मूलभूत गरजा बदलल्या नाहीत. 'घर' निवारा ही गरज पूर्ण करते.

**खालील गोष्टींकडे लक्ष द्या :**

- घर या संज्ञेमधून एखादी विशिष्ट इमारत दर्शविली जाते. ती कुटुंबाकडील एक भौतिक वस्तू असून महत्त्वाची गुंतवणूक असते.
- घर ही अशी जागा आहे की जिथे व्यक्ती शब्दश: जगते. कुटुंबातील व्यक्तींना त्यांच्या घराबाबत खूप भावनिक जवळीक असते.
- घर ही गरज पूर्ण करण्यासाठी तयार घर विकत घेता येते, जमीन (प्लॉट) विकत घेऊन त्यावर घर बांधून घेता येते किंवा घर भाड्याने घेता येते. यापैकी कोणती पद्धत वापरावी याचा निर्णय कौटुंबिक गरजा आणि आर्थिक क्षमता यावर अवलंबून असतो.

## ६.१ घराची संकल्पना आणि महत्त्व :

**तुम्हाला माहीत आहे का?**

घर कोणकोणत्या गोष्टी पुरविते?

**१. भौतिक सोयी :** भौतिक सोयी विचारात घेऊन खालील तक्ता, दिलेले मुद्दे एका वाक्यात स्पष्ट करून पूर्ण करा :

| | |
|---|---|
| • निवारा पुरविणे | |
| • नैसर्गिक घटकांपासून संरक्षण | |
| • समाज विघातक घटकांपासून संरक्षण | |
| • भौतिक आणि वैयक्तिक गरजांची पूर्तता | |

आदर्श घर कुटुंबातील व्यक्तींना निवारा पुरविते. वातावरणातील घटक जसे-ऊन, वारा, पाऊस, प्रदुषणकारी घटक इत्यादींपासून कुटुंबाला संरक्षण आवश्यक असते. तसेच कुटुंबाला समाज विघातक घटक जसे चोरी करणाऱ्या किंवा त्रास देणाऱ्या व्यक्तींकडून देखील संरक्षण आवश्यक असते. घर हे असे स्थान आहे की जेथे सर्व शारीरिक गरजा जसे-विश्रांती घेणे, झोपणे, खाणे, तयार होणे, वैयक्तिक गरजांची पूर्तता करणे इत्यादी पूर्ण केल्या जातात. कुटुंबातील सदस्यांचे आरोग्य, आरामदायीपणा आणि सुरक्षितता राखण्यासाठी याची मदत होते.

**२. अनुकूल, भावनिक वातावरण पुरविणे :** घर हे असे स्थान आहे की जे भावनिकदृष्ट्या चांगले वातावरण पुरविते, जिथे कुटुंबातील सदस्य एकत्र येऊन त्यांचे दररोजचे अनुभव आणि भावना जसे आनंद, दु:ख इत्यादींची एकमेकांबरोबर चर्चा करतात.

**नेहमी लक्षात ठेवा की :**

काही मूलभूत मूल्ये जसे-सहकार्य, आधार, प्रेरणा देणे, वैयक्तिक विचारांमधील फरकांचा आदर करणे इत्यादींचा कुटुंबातील सदस्यांमध्ये विकास होतो आणि व्यक्तीच्या भावनिक (मानसिक) विकासामध्ये त्याची मदत होते.

**३. बौद्धिक विकासासाठी अनुकूल वातावरण पुरविणे :** घर हे असे स्थान आहे की जेथे व्यक्तीच्या बौद्धिक क्षमतांच्या विकासासाठी तिला प्रेरणा, आधार, प्रोत्साहन आणि मार्गदर्शन दिले जाते. उदाहरणार्थ : कुटुंबामध्ये मुलाला किंवा मुलीला शास्त्रोक्त संगीत, नृत्य शिकणे, रेखाचित्रे काढणे किंवा चित्रकला अशा क्षमतांचा विकास करण्यासाठी प्रेरणा दिली जाते.

**तुम्ही आठवू शकता का ?**
तुमच्या कौटुंबिक जीवनामधील एखादे उदाहरण द्या.

**४. सामाजिक विकासासाठी अनुकूल वातावरण पुरविणे :** मनुष्य हा समाजप्रिय प्राणी असून एकाकीपणे राहू शकत नाही. घर हे असे स्थान आहे की जेथे सामाजिक विकास सुरू होतो. इतरांशी कशा प्रकारे संवाद साधावा हे शिकविणारा पहिला समूह म्हणजे कुटुंब होय.

**आपण चर्चा करू :**
कुटुंबामध्ये सामाजिक विकास कसा घडून येतो ?

हळूहळू मूल शेजारी पाजारी, नातलग आणि घरामध्ये येणारे मित्र-मैत्रिणी यांच्या बरोबर संवाद साधण्यास शिकते. अशा संवादांमधून मुले समाजामध्ये मान्य होईल असे वर्तन शिकते आणि त्यांना समाजात वावरण्याच्या चांगल्या सवयी लागतात. आसपासच्या परिसरामधील सामाजिक उपक्रमांमध्ये आणि समुदायामधील सण साजरे करण्याच्या प्रसंगांमध्ये सहभागी होऊन व्यक्तीचा विकास घडून येतो.

**५. आर्थिक सुरक्षितता पुरविणे :** मालकी हक्काचे घर असणे ही कुटुंबाची एक उत्तम गुंतवणूक आहे. मालमत्तेचे स्थान (ती कोठे आहे) आणि तिथे पुरविल्या जाणाऱ्या सुखसोयी या घटकांवर अवलंबून कालांतराने मालमत्तेच्या किमती वाढत जातात. बँक, पोस्ट ऑफिस इत्यादींच्या स्वरूपातील गुंतवणुकीपेक्षा येथे जास्त परतावा दिला जातो. कुटुंबातील आर्थिक अडीअडचणीच्या वेळी घराचा काही भाग भाडेतत्त्वाने देऊन पैसा उभा करता येतो. तसेच कोणत्याही आर्थिक मदत देणाऱ्या कंपनीकडे घर गहाण ठेवून रक्कम उभी करता येते.

## ६.२ घरांचे प्रकार :

**घरांचे विविध प्रकार पाहिल्याचे तुम्हाला आठवते का ?**
संपूर्ण जगामध्ये घरांचे विविध प्रकार आढळून येतात. सर्वसाधारणपणे वापरल्या जाणाऱ्या संज्ञा जसे - कॉटेजेस, स्टुडिओ अपार्टमेंट फ्लॅट्स, प्लॉट्स, रो हाऊसेस, बंगले, पेंट हाऊस इत्यादींचे अर्थ वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळे असू शकतात.

धड्याच्या या घटकामध्ये आपण भारतीय परिस्थितीमध्ये त्यांचे अर्थ पाहू.

**अ. कॉटेजेस :** ही संज्ञा आपल्या देशामध्ये सामान्यपणे वापरली जाते आणि ती इंग्लंडमध्ये उदयास आली. ही संज्ञा अशी रचना दाखविते की ज्यामध्ये तळमजल्यावर वावरण्याच्या खोल्या असतील आणि वरच्या मजल्यावर एक किंवा दोन झोपण्याच्या खोल्या असतील. सर्वसाधारणपणे, हे एक छोटेसे एक मजली घर असते परंतु काही वेळा मोठ्या रचना देखील आढळून येतात आणि त्यांना देखील कॉटेजेस असे संबोधले जाते. आधुनिक काळामध्ये जुन्या पद्धतीच्या, नम्रता आणि उबदारपणा अशा भावना दर्शविणाऱ्या आणि सर्वसाधारणपणे ग्रामीण किंवा ग्रामीण भागाकडे झुकणाऱ्या गावांमध्ये आढळणाऱ्या रखना या संज्ञेमधून दर्शविल्या जातात. ऐतिहासिक दृष्ट्या, हे एक लहान घर असते. ज्याचे छप्पर गवत किंवा तत्सम वनस्पती साहित्य वापरून बनविलेले असते. तसेच यांच्या भिंती जाड असतात आणि दगड किंवा विटांनी बांधलेल्या असतात. सध्याच्या काळात, सुटीच्या काळात वापरले जाणारे छोटेसे घर या संज्ञेमधून सांगितले जाते.



कॉटेज हाऊस

**ब. स्टुडिओ अपार्टमेंट :** स्टुडिओ अपार्टमेंट किंवा स्टुडिओ फ्लॅट हा अगदी छोटा झोपण्याची वेगळी खोली नसलेला फ्लॅट असतो. सध्याच्या काळात, आपल्या कुटुंबापासून नोकरीच्या निमित्ताने लांब राहणाऱ्या तरुण पिढीमध्ये हा प्रकार लोकप्रिय होत आहे. अशा लोकांची, एका छताखाली सर्व सोयी पुरविल्या जाणाऱ्या आरामदायी घराची इच्छा असे फ्लॅटस् पूर्ण करतात. असे फ्लॅटस्, अशा नोकरी करणाऱ्या व्यक्ती भाड्याने घेतात. स्टुडिओ फ्लॅटमध्ये एकच खोली असते जी विविध भागांमध्ये विभाजित केलेली असते परंतु त्यांच्यामध्ये भिंती किंवा तत्सम प्रकारचा अडथळा नसतो. त्यामुळे व्यक्ती ही खोली विविध क्रिया पार पाडण्यासाठी वापरते. जसे – झोपणे, करमणूक करणे, स्वयंपाक करणे इत्यादींसाठी म्हणजेच तिचा उपयोग झोपण्याची खोली, बैठकीची खोली, स्वयंपाकघर म्हणून केला जातो.



**स्टुडिओ अपार्टमेंट**

**क. फ्लॅट्स (सदनिका) अपार्टमेंट :** फ्लॅट या संज्ञेचा साधा सोपा अर्थ असा सांगता येईल की, फ्लॅट म्हणजे सर्व सोयी अंतर्भूत असलेला घराचा प्रकार जो इमारतीमधील केवळ काही भाग व्यापतो. भारतामध्ये, अनेक फ्लॅट्स असलेल्या इमारतीला अपार्टमेंट असे म्हटले जाते. फ्लॅट म्हणजे इमारतीमधील जागा जी कुटुंब राहण्यासाठी वापरते. कुटुंबातील सदस्यांना अनेकविध क्रिया आरामदायकपणे पार पाडता याव्यात यासाठी ही जागा अनेक लहान लहान भागांमध्ये विभागली जाते. अशा क्रियांमध्ये पाहुण्यांची करमणूक करणे, कुटुंबाने समूह म्हणून एकत्र बसणे, वैयक्तिक गरजा पूर्ण करणे, झोपणे (विश्रांती घेणे), तयार होणे, अभ्यास करणे, स्वयंपाक करणे, खाणे इत्यादींचा समावेश असतो. या गरजा विचारात घेतल्या तर आपल्या असे लक्षात येते की, फ्लॅटमध्ये बैठकीची खोली, झोपण्याची खोली, स्वयंपाकघर, अभ्यासाची खोली, स्वच्छतागृह इत्यादी खोल्या असतात. आपले उत्पन्न, कुटुंबातील सदस्यांची संख्या, कुटुंबाचा प्रकार (विभक्त किंवा एकत्र) इत्यादी घटकांचा विचार करून कुटुंब एक बेडरूमचा, दोन बेडरूमचा किंवा तीन बेडरूमचा फ्लॅट घेण्याचा विचार करेल.



**फ्लॅट/अपार्टमेंट**


**ड. रो हाऊसेस :** रो हाऊसेस म्हणजे एकाच कुटुंबासाठी असलेले, परस्परांना एका सामायिक भिंतीने जोडलेले घरांचे प्रकार होत. सर्वसाधारणपणे ते शहरी भागांमध्ये आढळून येतात. त्यांचे स्वरूप एक मजली किंवा बहुमजली असते. ते दोनच्या जोडीमध्ये किंवा दोनापेक्षा अधिक संख्येमध्ये आढळून येतात. अशा घरांची रचना, दृश्यस्वरूप आणि संरचना तंतोतंत असू शकत नाही परंतु त्यांच्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर साम्य असते. या घरांसमोर आणि मागच्या बाजूला मोकळी जागा असते जी बगिचा करणे, पार्किंगची जागा, किंवा कुटुंबाला सोयीस्कर वाटेल अशा कोणत्याही कारणासाठी वापरली जाते.



**रो हाऊसेस**

**इ. पेंट हाऊसेस :** इमारतीच्या (अपार्टमेंट बिल्डिंगच्या) छतावर बांधलेले छोटे आणि पूर्णपणे स्वतंत्र असलेले घर दर्शविण्यासाठी पेंट हाऊस ही संज्ञा वापरली जाते. याचा सोपा अर्थ असा आहे की ते इमारतीच्या सर्वोच्च मजल्यावर असते. वास्तूस्थापत्य शास्त्रामध्ये ही संज्ञा अशी संरचना दर्शविते की जी इमारतीच्या छतावर असते आणि जी गच्चीच्या कठड्याला (पॅरापेटला) जोडलेली नसते. अशी घरे छतावरील संपूर्ण जागा व्यापत नाहीत आणि अशी न व्यापलेली जागा बसण्याची व्यवस्था करण्यासाठी, झाडांच्या कुंड्या ठेवणे इत्यादी गोष्टींसाठी वापरली जाते. सर्वसाधारणपणे या घरांचे छत उंच असते, स्वतंत्र लिफ्टद्वारे गच्चीमध्ये जाण्यासाठी सोय केलेली असते आणि आजूबाजूच्या परिसराची विस्तृत दृश्ये पाहणे शक्य होत असते.

सामान्यपणे ही घरे मोठी आणि खूप महाग असतात. या घरांसाठी सर्व सुविधा उपलब्ध असतात जसे खूप किमती उपकरणे, सुबक आणि उच्च प्रतीचे साहित्य आणि फिटिंग्ज, उच्च प्रतीच्या फरशा, गच्ची, जास्त मोठी (मोकळी) जागा, खूप मोठ्या खिडक्या इत्यादी.



पेंट हाऊस

**फ. बंगले :** सर्वसाधारणपणे बंगला हे छोटे, चौरस, एक मजली आणि सर्व-चारही बाजूंना मोकळी जागा असलेले घर असते, सामान्यपणे या रचनांना पोर्च असतो आणि वर जाण्यासाठी समोरून पायऱ्या असतात. भारतामध्ये बंगल्यांचा विकास केला गेला कारण कॉटेज पद्धतीची जाड भिंती असलेली घरे येथे अनुरूप ठरली नाहीत. बंगला ही संज्ञा भारतीय शब्द 'बांगला' यावरून तयार केली गेली आणि तिचा संबंध एकोणविसाव्या शतकामध्ये बंगालमध्ये बांधलेल्या



घरांशी जोडला गेलेला आहे. ही घरे प्रशस्त असून त्यांचा प्रवेश व्हरांड्यामधून दिलेला असतो. पूर्वीच्या काळामध्ये अशा घरांना उतरते. छप्पर असायचे आणि त्यामध्ये एखादी छोटी खिडकी (स्काय लाईट विंडो) बसविलेली असे. या शतकामध्ये देखील गावांमध्ये आणि छोट्या शहरांमध्ये उतरत्या छपरांची घरे आढळून येतात. मोठ्या शहरांमध्ये उपलब्ध असलेल्या जमिनीच्या कमतरतेमुळे दुमजली बंगले आढळून येतात. सामान्यपणे बंगल्याच्या समोरच्या बाजूला बगिचा आणि पार्किंगची सोय, मागच्या बाजूला बगिचा आणि वॉशिंग एरिया (धुणी/भांडी करण्याची जागा) आढळून येते आणि त्यासाठी स्वतंत्रपणे प्रवेश दिला जातो.



बंगला

**ग. पर्यावरण अनुकूल घरे (इको फ्रेंडली हाऊसेस) :** या शतकामध्ये पर्यावरणाबाबतची संवेदना वाढत चालली आहे आणि त्याचे पर्यवसान म्हणून पर्यावरण अनुकूल घरे किंवा ग्रीन होम्सची लोकप्रियता वाढते आहे. आपल्या देशातील लोक जाणीवपूर्वक नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान वापरून अधिकाधिक संख्येमध्ये पर्यावरण अनुकूल घरांची निर्मिती करत आहेत. पर्यावरणावरील प्रभाव कमी करण्याच्या दृष्टीने ते बांधकामामध्ये टिकाऊ तंत्रज्ञान वापरात आणत आहेत. अशा घरांमध्ये समाविष्ट असणारी काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे : पाण्याचा पुनर्वापर, खिडक्यांसाठी मोठ्या मोठ्या काचांचा उपयोग, सौर पत्रे, कचरा व्यवस्थापनाच्या प्रभावी पद्धती, पर्यावरणपूरक बांधकाम साहित्याचा उपयोग आणि अक्षय उर्जा स्रोत इत्यादी. या संरचनांच्या निर्मितीचा उद्देश म्हणजे बांधकामामध्ये अशा रचना निर्माण करणे की ज्या पर्यावरणासाठी प्रभावी आणि सुसंगत ठरण्यास मदत करतील आणि पर्यावरणावरील हानीकारक परिणाम कमी करतील.

**इंटरनेट माझा मित्र :**

१. तुमच्या परिसरातील पर्यावरण अनुकूल घर शोधा, त्याला भेट द्या, त्याच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करून अहवाल लिहा.

२. इंटरनेटवरून पर्यावरण अनुकूल घरांची माहिती मिळवून त्यावर अहवाल लिहा.

**तुमच्या बुद्धीचा वापर करा :** खाली दिलेल्या चित्रांमधील घरांचा प्रकार ओळखा आणि दिलेल्या चौकोनामध्ये त्याची वैशिष्ट्ये लिहा.



घराचे नाव :

वैशिष्ट्ये :



घराचे नाव :

वैशिष्ट्ये :



घराचे नाव :

वैशिष्ट्ये :



घराचे नाव :

वैशिष्ट्ये :



घराचे नाव :

वैशिष्ट्ये :

**तुम्हाला माहीत आहे का?**

**सरकारने सुरू केलेली गृहप्रकल्प योजना :**

प्रत्येक व्यक्ती आणि कुटुंबासाठी निवारा ही मूलभूत गरज आहे आणि म्हणूनच प्रत्येकासाठी निदान लहान घर असणे आवश्यक असते. हा उद्देश डोळ्यापुढे ठेवून सरकारने 'प्रधानमंत्री आवास योजना (शहरी भाग)' निर्माण केली ज्याचे ध्येय वाक्य 'सर्वांसाठी घर' असे आहे. या योजनेमध्ये २०२२ सालापर्यंत सर्वांना घर मिळण्याची सुविधा मिळवून देणे अशी सोय आहे. २०२२ सालापर्यंत म्हणजे जेव्हा देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण होतील तोपर्यंत सर्वांना घरकुल मिळावे असा या योजनेचा उद्देश आहे.

**आयसीटीचा उपयोग :**

शहरी भागातील आणि ग्रामीण भागातील कुटुंबासाठी उपलब्ध असलेल्या योजना इंटरनेटवरून शोधून काढा.

## ६.३ घरासाठी जमिनीची निवड :

घरकुल हा कौटुंबिक जीवनाचा महत्त्वाचा भाग जिथे कुटुंबातील सदस्य त्यांच्या आयुष्यातील खूप मोठा वेळ घालवितात. सर्व कौटुंबिक क्रियांचे घर हे केंद्र आहे. घराची खरेदी करणे किंवा ते बांधून घेणे हा कुटुंबाचा फार मोठा निर्णय असतो. ही आयुष्यभराची खूप मोठी गुंतवणूक असते म्हणूनच हा निर्णय अतिशय काळजीपूर्वक घ्यावा लागतो आणि त्यामध्ये कुटुंबातील सर्व सदस्यांना समाविष्ट करावे तसेच तज्ज्ञांकडून योग्य मार्गदर्शन देखील घ्यावे. उपलब्ध घराबाबत खूप माहिती व्यक्तीने गोळा करणे आवश्यक असते जसे – त्याची रचना, भौतिक सुविधा तसेच कुटुंबातील सदस्यांच्या गरजा पूर्ण होतील का इत्यादी. कुटुंबातील सदस्यांना आराम मिळणे तसेच त्यांच्या गरजा पूर्ण होणे हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कुटुंब, आपले घर वारंवार बदलू शकत नाही म्हणून त्याची निवड अतिशय काळजीपूर्वक आणि काही घटक विचारात घेऊन करावी.

### अ) भौतिक घटक :

घरासाठी जमिनीची निवड करताना खालील गोष्टी लक्षात ठेवा :

- प्लॉटवर सीमारेषा अचूकपणे दाखविलेल्या आणि आखलेल्या आहेत का ते तपासून पहावे जेणेकरून भविष्यातील कायदेशीर तंटे आणि बाबी टाळल्या जातील.
- प्लॉटचा आकार नियमित असावा. आयताकृती आकार नियोजनाच्या दृष्टीने चांगला समजला जातो. प्लॉटचा आकार नियमित नसल्यास काही जागा वाया जाऊ शकते.
- प्लॉटला रस्त्याकडे किंचित उतार असावा ज्यामुळे पावसाचे पाणी घराकडून रस्त्याकडे सहजतेने वाहून नेले जाईल आणि घराजवळील जमीन ओली राहून आरोग्यास हानीकारक वातावरण निर्माण होणे टाळले जाईल तसेच घरासाठी ड्रेनेज पाईपलाईन देणे सोपे होईल.
- घर थोड्या उंच जमिनीवर असावे ज्यामुळे आजूबाजूच्या परिसराचे सुंदर दृश्य पहावयास मिळते.
- नैसर्गिक सौंदर्याचा घटक जसे : टेकडी, तलाव इत्यादींचे दृश्य पाहता येईल अशा घराला पसंती द्यावी.
- भरपूर प्रमाणामध्ये हवा आणि प्रकाश येऊ शकेल अशी रचना असावी. जर घराजवळ खूप जास्त प्रमाणात घनदाट झाडी असेल तर प्रकाश आत येण्यास अडथळा निर्माण होतो.

**ब) स्थान :** घराच्या स्थानाचा अभ्यास काळजीपूर्वक करावा कुटुंब घर भाड्याने घेईल किंवा तयार फ्लॅट विकत घेईल किंवा प्लॉट (जमीन) विकत घेऊन त्यावर घर बांधून घेईल.

**नेहमी लक्षात ठेवा :**
खालील मार्गदर्शके लक्षात ठेवा :

- घर अशा ठिकाणी असावे की, जेथे मूलभूत सोयी उपलब्ध असतील. दळणवळणाच्या चांगल्या सोयी, चांगले रस्ते, बाजार, दवाखाने, शाळा इत्यादी सोयी चालत जाण्याच्या अंतरावर असाव्यात.
- मुले येथे लहानाची मोठी होणार असल्याने चांगला शेजार आणि चांगला परिसर असणे खूप महत्त्वाचे ठरते. या दृष्टिकोनातून, जर घर भाड्याने घेतले असेल आणि कुटुंबाला ते योग्य वाटत नसेल तर तेथून दुसरीकडे जाण्याचा पर्याय असतो; परंतु ते जर स्वत:चे घर असेल तर हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा ठरतो कारण कुटुंब आयुष्यभर येथे राहणार असते.
- कारखान्यांच्या क्षेत्रापासून ते लांब असावे कारण कारखान्यांमधून सोडल्या जाणाऱ्या धुरामुळे हवेचे प्रदूषण घडून येते. तसेच रेल्वे, प्रमुख रस्ते, हमरस्ते यांच्यापासून देखील घर दूर असावे अन्यथा आवाजाच्या प्रदूषणाचा त्रास होतो आणि घराच्या दिशेने कंपने आणली जातात.

**क) जमिनीचा प्रकार :** व्यक्तीने तज्ज्ञांकडून जमिनीचा प्रकार तपासून घ्यावा. यावरून पायाचा (फाऊंडेशनचा) प्रकार ठरविला जातो आणि त्याचा बांधकामाच्या खर्चावर परिणाम होतो. जमिनीच्या/प्लॉटच्या मातीचा प्रकार वेगवेगळा असू शकतो जो खालीलप्रमाणे असू शकतो.

### पूर्ण खडकाळ जमीन :

| फायदे | तोटे |
|---|---|
| • ही जमीन कठीण पाया पुरविते. | • ही जमीन दिवसा तापते आणि रात्री पर्यंत थंड होत नाही, विशेषत: उन्हाळ्यामध्ये. |
| • ही जमीन पाणी शोषून घेत नाही आणि तेथे पाणी साठून राहत नाही. | • जर जमीन खणणे किंवा सपाट करणे आवश्यक असेल तर समस्या निर्माण होतात. |

| फायदे | तोटे |
|---|---|
| | |
| | • बगिचा निर्माण करण्यामध्ये आणि झाडे वाढविण्यामध्ये समस्या निर्माण होतात. |

वर दिलेले तोटे विचारात घेता ही जमीन घराच्या बांधकामासाठी चांगली समजली जात नाही.

**सैल मातीची जमीन :** जमीन सैल मातीची नसावी तसेच ती 'तयार केलेली' किंवा भराव घातलेली नसावी. याचा अर्थ जमीन पूर्वी खड्डा असलेली होती आणि नंतर मलवा घालून तयार केलेली नसावी. अशा जमिनीचे अनेक तोटे आढळतात ते पुढीलप्रमाणे :

- या जमिनीमध्ये पाया तयार करण्यास समस्या येतात.
- जमीन पाणी शोषून घेते आणि दलदलीची होते म्हणून आरोग्यास हानिकारक ठरते.
- अशी जमीन कमी अधिक प्रमाणात खचण्याचा धोका असतो. त्यामुळे ड्रेनेजच्या वाहण्यामध्ये अडथळा निर्माण होऊ शकतो.
- अशा जमिनीवर बांधलेल्या घरांमध्ये भेगा पडणे ही समस्या सर्वसामान्यपणे आढळून येते.

यामुळे ही जमीन घराच्या बांधकामासाठी चांगली समजली जात नाही.

**काळ्या मातीची जमीन :** ही जमीन बगिचा तयार करण्यासाठी चांगली असते परंतु तिचे खालील तोटे आढळून येतात.

- पाया तयार करण्यामध्ये समस्या येतात.
- ती घराच्या बांधकामाला आधार देऊ शकत नाही म्हणून पाया तयार करण्यासाठी उच्च प्रतीचे तंत्रज्ञान 'पाईल फाऊंडेशन' वापरावे लागते जे खर्चीक ठरू शकते.

**घराच्या बांधणीसाठी चांगली जमीन :** जमिनीमध्ये २ ते ५ फूटांच्या खाली कठीण माती, मुरूम किंवा खडक असलेली माती चांगला पाया तयार करते. हा प्रकार खालील फायदे मिळवून देतो :

- ही माती ड्रेनेज पाईप्स देणे सोपे करते.
- बगिचा करण्यासाठी ती चांगली ठरते.
- पाया बांधणे अवघड किंवा खर्चीक नसते.

**ड) आरोग्यदायी वातावरण :** आरोग्यदायी वातावरण पुरविण्याच्या दृष्टिकोनातून घराच्या नियोजनामध्ये काही मुद्दे विचारात घ्यावे लागतील, ते खालीलप्रमाणे :

- घराच्या जवळपास उघडे ड्रेनेज नसावे. नगरपालिका किंवा स्थानिक प्रशासनाने पुरविलेली ड्रेनेज व्यवस्था असावी.
- पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी योग्य रचना केलेली असावी. घराच्या जवळपास पाणी साठून राहू नये.
- घराचा प्लॅन (नकाशा) असा असावा की, जेणेकरून सर्व खोल्या, बाथरूम्स् आणि टॉयलेट्स मध्ये भरपूर उजेड येईल तसेच वायुवीजनही घडून येईल. यासाठी आवश्यक त्या संख्येमध्ये खिडक्या असाव्यात.
- सर्व प्रमुख खोल्यांमध्ये 'क्रॉस' वायुवीजन घडून यावे. सर्व खोल्यांना लागू होणारा नियम म्हणजे खोलीच्या आकारमानाच्या कमीत कमी एक सप्तमांश आकारमान खिडक्यांसाठी असावे आणि बाथरूम्स् आणि टॉयलेट्स-साठी ते अर्धे असावे.

**इ) व्यावहारिक सोयी-सुविधा :** दैनंदिन जीवनामधील क्रिया सुलभतेने करता याव्यात यासाठी विविध सोयी/सेवा आवश्यक असतात ज्या शहराच्या विकसित भागामध्ये पुरविल्या जातात म्हणून नेहमी विकसित भागामधील घराची निवड करावी.

**यादी करा :**
घरासाठी आवश्यक असलेल्या सोयींची यादी करा :

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

घरासाठी खालील सुविधा महत्वाच्या समजल्या जातात :

- अतिशय महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या सुविधा म्हणजे वीजपुरवठा, पाणीपुरवठा आणि प्लंबिंग (ड्रेनेज).

या सुविधांच्या उपयोगाशिवाय आयुष्य जगण्याची कोणी कल्पनाही करू शकत नाही. सध्याच्या काळात त्यांच्यावर आपण इतके अवलंबून असतो की काही काळ जरी त्यांचा पुरवठा खंडित झाला तरी आपण अस्वस्थ होतो आणि त्रासून जातो.

- इतर काही सुविधांमध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो : शाळा, कॉलेज, दूरभाष्य आणि इंटरनेट सुविधा, पोस्ट ऑफिस, बँक, अग्निशमन यंत्रणा, हॉस्पिटल्स्, खरेदीची ठिकाणे, मनोरंजनाची केंद्रे, प्रार्थनास्थळे इत्यादी. अशा सर्व सुविधा चालत जाण्याच्या अंतरावर असाव्यात.

## तुम्ही आठवू शकाल का ?

- मानवाची निवारा ही गरज घराद्वारे पूर्ण केली जाते.
- घर हे कौटुंबिक जीवनाचे प्रमुख केंद्र असून सर्व कौटुंबिक क्रियांसाठी आधारभूत ठरते.
- आदर्श घर कुटुंबातील सदस्यांना भौतिक सुविधा, अनुकूल भावनिक वातावरण, बौद्धिक वातावरण, सामाजिक वातावरण, आर्थिक सुरक्षितता पुरविते.
- घरांचे विविध प्रकार आहेत जसे कॉटेजेस्, फ्लॅटस्, रो हाऊसेस, बंगले, पेंट हाऊसेस, स्टुडिओ फ्लॅटस्, इत्यादी.
- भारतातील नागरिक पर्यावरणाच्या समस्यांप्रती संवेदनक्षम होऊ लागले आहेत आणि म्हणूनच पर्यावरण अनुकूल घरे आपल्या देशामध्ये अधिकाधिक लोकप्रिय होत आहेत.
- कुटुंब, आपले घर वारंवार बदलू शकत नाही. घर ही आयुष्यभराची गुंतवणूक असते ज्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणावर पैसे गुंतविलेले असतात आणि म्हणूनच घराची निवड काळजीपूर्वक करावी. घराची निवड करण्यासाठी काही घटक विचारात घेतले जातात. हे घटक म्हणजे भौतिक घटक, स्थान, जमिनीचा प्रकार, आरोग्यदायी वातावरण आणि व्यावहारिक सोयी.

## स्वाध्याय

- **वस्तुनिष्ठ प्रश्न :**

**१) कंसात दिलेल्या शब्दांमधून अचूक शब्द निवडून दिलेली विधाने पूर्ण करा.**

(भाड्याने देणे, कॉटेज, रो हाऊसेस, सैल मातीची जमीन, पेंट हाऊस, इको फ्रेंडली)

१. कुटुंबासाठी घर उपलब्ध करून घेण्यासाठी घर विकत घेणे, बांधून घेणे किंवा ________घर हे मार्ग आहेत.

२. सुटीतील घर ही संज्ञा साधारणपणे ________ या रचनेसाठी वापरली जाते.

३. एकमेकांना जोडून बांधलेल्या घरांसाठी ________ ही संज्ञा वापरली जाते.

४. अशा प्रकारची माती की जी कमी अधिक प्रमाणात खचू शकते आणि इमारतीमध्ये भेगा निर्माण करू शकते तिला ________ असे म्हणतात.

५. इमारतीच्या छतावर बांधलेल्या घराला ________ असे म्हणतात.

६. पर्यावरणाचे रक्षण करण्याचे उद्दिष्ट ठेवून बांधलेले घर म्हणजे ________घर होय.

**२) खालील संज्ञांचा अर्थ एका वाक्यात लिहा.**

अ) फ्लॅट क) बंगला

ब) कॉटेज ड) रो हाऊस

- **लघुत्तरी प्रश्न :**

**१) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

अ) घर भौतिक गरजा, भावनिक गरजा आणि बौद्धिक वातावरण पुरविण्याची गरज कशाप्रकारे पूर्ण करते?

ब) व्यक्तीच्या सामाजिक विकासासाठी घर कशाप्रकारे महत्त्वपूर्ण असते आणि घर आर्थिक सुरक्षितता कशाप्रकारे देते ते स्पष्ट करा.

क) बंगला म्हणजे काय? त्यांची वैशिष्ट्ये कोणती?

ड) घराची निवड करताना जमिनीचे कोणते भौतिक घटक विचारात घेतले पाहिजेत?

इ) घराच्या निवडीमध्ये कोणते आरोग्यदायी घटक विचारात घ्यावेत?

फ) घराच्या निवडीमध्ये कोणत्या व्यावहारिक सोयी-सुविधा विचारात घ्याव्यात?

## २) फरक सांगा.

अ) बंगला आणि रो हाऊस

ब) फ्लॅट्स आणि अपार्टमेंट्स

क) बंगला आणि कॉटेजेस

## ३) टिपा लिहा.

अ) घराच्या निवडीमधील भौतिक घटक

ब) घराचे स्थान

क) घराच्या निवडीमधील व्यावहारिक बाबी

ड) कॉटेजेस आणि बंगले

इ) फ्लॅट्स, रो-हाऊसेस आणि पेंट हाऊसेस

फ) स्टुडिओ फ्लॅट्स आणि इको हाऊसेस

## ४) कारणे द्या.

अ) रस्त्याच्या बाजूला किंचित उतार असलेले घर चांगले समजले जाते.

ब) घराची निवड करताना चांगला शेजार आणि आजूबाजूचे वातावरण विचारात घ्यावे.

## • दीर्घोत्तरी प्रश्न.

अ) कौटुंबिक निवासस्थानाचे महत्त्व काय? चांगल्या निवास स्थानामधून पूर्ण होणाऱ्या विविध गरजांचे वर्णन करा.

ब) घराच्या निवडीमध्ये विचारात घेतल्या जाणाऱ्या घटकांची यादी करा आणि त्यातील कोणताही एक घटक स्पष्ट करा.

**प्रकल्प/असाईनमेंट**

अ) वर्तमानपत्रे, मासिके, जाहिराती इत्यादींमधून घरांची चित्रे मिळवा. ती कापून नीट चिकटवून स्क्रॅप बुक (वही) बनवा.

ब) तुमच्या घरासाठी उपलब्ध असलेल्या विविध सोयी सुविधांची यादी करा.

क) तुमच्या परिसरामधील एखादे 'इको हाऊस' शोधा. तिथे भेट देण्याचे नियोजन करा आणि त्याच्या विशिष्ट घटकांचा अभ्यास करून त्याबाबतचा अहवाल लिहा.

❑❑❑

# ७. घरातील फर्निचर


७.१ फर्निचरच्या निवडीतील घटक

७.२ फर्निचरकरिता वापरण्यात येणारे साहित्य

७.३ फर्निचर मांडणीतील सर्वसाधारण तत्त्वे

७.४ फर्निचरची काळजी व निगा


**तुम्हांस माहीत आहे का ?**

गृहसजावटीमध्ये फर्निचर अतिशय महत्त्वाचे आहे. बाजारात फर्निचरचे अनेक प्रकार उपलब्ध असतात त्यापैकी काही महाग, आकर्षक आणि प्रमाणबद्ध असतात तर काही प्रकारचे फर्निचर स्वस्त, कमी दर्जाचे व कमी आकर्षक असतात. लाकडी, केन, धातू, प्लास्टिक, गादी आणि काच इत्यादी साहित्य फर्निचरसाठी वापरले जाते. फर्निचरची निवड करताना त्याचे सौंदर्य, आरामदायकता, उपयोगिता आणि बहुपयोग या घटकाची काळजीपूर्वक तपासणी करून निवडावेत. घराच्या कोणत्याही खोलीच्या सजावटीत फर्निचर अविभाज्य भाग असतो. त्यामुळे घराची अंतर्गत सुंदरता वाढवते आणि त्याची उपयोगिता सिद्ध होते. फर्निचरची निगा राखण्याचे मूल्य कमी असावे व स्वच्छ करण्यास सोपे असावे.

**व्याख्या :**

शब्दकोशानुसार फर्निचरचा अर्थ असा होतो की, "**फर्निचर म्हणजे घर किंवा कार्यालय, काम करण्यासाठी किंवा राहण्यासाठी वापरले जाणारे व हालविता येऊ शकणारे सामान होय.**"

बसणे, झोपणे, आराम करणे, खाणे, तयार होणे अशा अनेक कामांसाठी फर्निचरचा उपयोग केला जातो. फर्निचर हे मूलत: काम साठवणूक सुविधा व आरामासाठी वापरले जाते.

## ७.१ फर्निचरच्या निवडीतील घटक :

फर्निचरची संख्या घराच्या विविध भागांमध्ये केल्या जाणाऱ्या क्रियांवर व कामांवर अवलंबून असते. एकदा कुटुंबाने फर्निचरसंबंधी निर्णय घेतला की, प्रत्येक फर्निचरची पूर्ण तपासणी करून निवड करणे गरजेचे असते. त्यासाठी खालील मार्गदर्शक घटक महत्त्वाचे आहेत.

**थोडं डोकं वापरा :**
फर्निचरच्या निवडीतील घटकांची यादी करा.

- **आरामदायकता :** फर्निचरमध्ये आरामदायकता हा विशेषत: इच्छित व अपेक्षित गुण असणे आवश्यक आहे. फर्निचरचे आरामदायक प्रदान घटक म्हणजे त्याचे वजन, हालविण्यास योग्य, उपयुक्तता व मजबुती होय. बहुधा फर्निचर हे सर्व साधारण व्यक्तीच्या प्रमाणाच्या मापानुसार केले जाते. वापरणाऱ्या व्यक्तीच्या मापप्रमाणानुसार डिझाईन केलेले असावे. फर्निचर विकत घेण्याआधी एखादी चाचणी घेऊन त्यांची आरामदायकता पहावी.

- **कौटुंबिक प्राधान्यता :** कुटुंबासाठी फर्निचर निवडताना कुटुंबातील सदस्यांचे प्राधान्य विचारात घ्यावे. कुटुंबाचा व्यवसाय आणि सामाजिक दर्जाचा विचार करणे आवश्यक आहे. फर्निचरची निवड त्यांच्या आवश्यकतेनुसार आणि उपयोगानुसार असावी. बदली होणाऱ्या कुटुंबासाठी वजनाला हलके, सहज नेता येणे व घडीचे फर्निचर निवडणे सोईचे असते. लहान घरात राहणाऱ्या कुटुंबांनी बहुउद्देशीय फर्निचरचा वापर करावा. जसे – सोफा कम बेड, सोफा कम बॉक्स इत्यादी.

- **आर्थिक तरतूद :** फर्निचरची किंमत ही त्यासाठी वापरलेले साहित्य, डिझाईन आणि शैली, त्याचा रंग आणि रचना यावर अवलंबून असते. प्रत्येकाने प्राधान्य क्रमानुसार फर्निचर खरेदी करणे आवश्यक असते. फर्निचरची निवड करताना, विविध शोरूम किंवा वस्तूदर्शनालयमध्ये उपलब्ध असलेल्या फर्निचरच्या किंमतीची तुलना करावी. सवलतीत सेल किंवा

लिलावात फर्निचर विकत घेताना आपण फसवले जाणार नाही याची काळजी घ्यावी. उदाहरणार्थ : केन किंवा मेटल फर्निचरपेक्षा गादीचे फर्निचर महाग असते.

- **रचना आणि डिझाईन :** फर्निचरची रचना योग्य असल्यास फर्निचरची मजबुती, आरामदायकता तसेच टिकाऊपणा वाढतो. खरेदी करण्यापूर्वी फर्निचरचे सर्व भाग तपासून घ्यावेत. खरेदीदाराने प्रत्येक फर्निचरचा भाग जसे- तळ, बाजू, मागील बाजू, आतल्या बाजू आणि समोरील बाजू तपासली पाहिजे. पाय व चौकट (फ्रेम) हे गोंद आणि डोबेल्स, स्क्रू, क्लिप, कॉर्नर धातू प्लेट्सनी जोडलेले असावेत. एखाद्या व्यक्तीला संपूर्ण फर्निचरची चाचणी घेण्यास अडचण होत असेल तर विक्रेत्याकडून माहिती मिळवू शकतो.

  फर्निचरच्या डिझाईनमध्ये त्याचा आकार, प्रमाण, वजन, समतोल प्रमाणबद्धता यांचा समावेश होतो. साध्या डिझाईनचे फर्निचर सजावटी या (डेकोरेटिव्ह) डिझाईनपेक्षा चांगले असते. फर्निचरचे डिझाईन हे वापरण्यास सोपे, आरामदायक, स्वच्छ निगा करण्यास सोपे असते. जास्तीत जास्त आराम मिळविण्यासाठी कार्यक्षम किंवा एर्गोनॉमिकल डिझाईननुसार फर्निचर असावे.

- **टिकाऊपणा :** फर्निचरचा टिकाऊपणा हा त्यात वापरल्या जाणाऱ्या साहित्य जोडणी, डिझाईन आणि शैली व कारागिरी यावर अवलंबून असते. लाकडावर योग्य प्रक्रिया करून तयार केलेले फर्निचर हलक्या दर्जाच्या लाकडापासून तयार केलेल्या फर्निचरपेक्षा टिकाऊ असते. स्वच्छ करणे, पॉलिश करणे, वेळेवर दुरुस्ती करणे, काळजीपूर्वक हाताळणे आणि योग्यरितीने वापरल्याने फर्निचरचा टिकाऊपणा वाढतो. तसेच फर्निचरचा टिकाऊपणा रचनेवर अवलंबून असतो. जसे- फर्निचरचा पृष्ठभाग हा योग्य प्रक्रिया किंवा परिसज्जा केलेला असतो.

- **हवामान :** फर्निचर खरेदी करताना हवामानाचा विचार करणे हा महत्त्वाचा घटक आहे. उदाहरणार्थ : दमट हवामानात धातूचे फर्निचर अनुरूप नसते. अशा हवामानामुळे धातूचे फर्निचर गंजते, त्यामुळे मजबुती, टिकाऊपणा व सौंदर्यावर परिणाम होतो. लाकडी फर्निचरवर हवामानाचा कोणताही परिणाम होत नाही म्हणून लाकडी फर्निचर हे सर्व प्रकारच्या हवामानासाठी योग्य असते.

- **देखभाल :** फर्निचरची निवड करताना फर्निचरची देखभाल करणे महत्त्वाचे घटक आहे. देखभालचा खर्च खरेदीपेक्षा कमी असावा, धूळ काढणे, पॉलिश करणे, वेळेवर दुरुस्ती करणे, चांगल्या स्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक असते. त्यामुळे देखभालीचा खर्च कमी होतो. सामान्यत: स्टील फर्निचरला गादीच्या व काचेच्या फर्निचरपेक्षा कमी देखभाल आवश्यक असते.

- **आधुनिकता :** गृहसजावटीत फर्निचरची निवड करताना आधुनिक व नावीन्यपूर्ण फर्निचरला प्राधान्य दिले जाते. फर्निचरमध्ये नवीनता असावी. फर्निचरच्या निवडीतून कुटुंबाची आवड प्रतिबिंबित होते म्हणून फर्निचर निवडताना कुटुंबाचा सामाजिक, आर्थिक दर्जा लक्षात घ्यावा. आजकाल घराच्या अंतर्गत सजावटीत इको-फ्रेंडली व लवचीक वापर फर्निचरला प्राधान्य देतात. तसेच उपलब्ध मर्यादित जागेचा वापर करण्यासाठी अंतर्गत फर्निचरचा उपयोग करतात.

**शोध घ्या.**

**घराच्या फर्निचरमधील नावीन्यपूर्ण प्रकार शोधा.**

- **लवचिकता :** बहुउद्देशीय फर्निचरचा उपयोग लवचिकतेचे सर्वोत्तम उदाहरण होय. अलीकडच्या काळात या प्रकारचे फर्निचर अधिक लोकप्रिय झाले आहे. हे एक ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी हालविणे सोपे जाते. तसेच हे एक पेक्षा अधिक क्रियांसाठी वापरले जाते. उदा. : सोफा कम बेड, घडीचे डायनिंग टेबल इत्यादी.

- **सौंदर्य :**

**माहिती आहे का तुम्हाला ?**

फर्निचरच्या सौंदर्यामध्ये रंग, पोत, स्वरूप, आकार आणि जागा यासारखे डिझाईनचे घटक महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. फर्निचरचे सौंदर्य हे चांगले डिझाईन, चांगल्या रचना, वापरास सोयीचे इ. गोष्टीवर अवलंबून असते. विविध आकार, डिझाईन, कच्चा माल यामुळे फर्निचरमध्ये नवनवीनता येते ज्यामुळे खोलीच्या सौंदर्यात भर पडते.

## ७.२ फर्निचरकरिता वापरण्यात येणारे साहित्य :

फर्निचर तयार करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची सामग्री वापरली जाते. प्रत्येक साहित्याची स्वत:ची गुणवत्ता आणि मर्यादा असतात. आज बाजारपेठेत फर्निचर साहित्य चांगल्या श्रेणीत उपलब्ध आहे. फर्निचर बनविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्याच्या प्रकारावर फर्निचरचा खर्च अवलंबून असतो.

सामान्यत: फर्निचर बनविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या साहित्याची यादी करा.

| जड फर्निचर | हलके फर्निचर |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |

१. **लाकूड :** लाकूड हे फर्निचरसाठी वापरले जाणारे पारंपरिक साहित्य आहे. बहुतेक वेळा पूर्ण फर्निचर किंवा फर्निचरचा काही भाग लाकडापासून बनविलेला असतो. लाकडी फर्निचर चित्तवेधक दिसते. तसेच ते टिकाऊ, नैसर्गिक सौंदर्य, वापरामध्ये लवचीकता आणि उपयोगी असते. वातावरणातील बदलाचा त्यावर सहसा काही परिणाम होत नाही.

**लाकडाचे वर्गीकरण :**

अ. नरम लाकूड आणि कठीण लाकूड

ब. नैसर्गिक लाकूड आणि कृत्रिम लाकूड

स्वयंपाकखोलीच्या फर्निचरसाठी, तावदान (पॅनेलिंगसाठी), घरे बांधण्यासाठी नरम लाकडाचा वापर केला जातो. उदाहरणार्थ : देवदार, फर, पाइन.

गृहनिर्माण इमारती, नौका बांधकाम आणि साधने किंवा उपकरणे बनविण्यासाठी कठीण लाकडाचा वापर केला जातो. उदाहरणार्थ : बीच, चेस्टनट, काळे लाकूड, टेंभुर्णे, एल्म, महागनी आणि मॅपल.

भारतात फर्निचरसाठी उपलब्ध नैसर्गिक लाकूड म्हणजे सागवान, अक्रोड, चंदन, महागनी, हलदा, साल, शिसव, देवदार, आंबा इत्यादी. प्लायवूड, हार्डबोर्ड, पार्टिकल बोर्ड, विलो, रॅटन, रीड इत्यादींचा कृत्रिम लाकडाचे फर्निचर बनविण्यासाठी उपयोग होतो.

- **सागवान लाकूड :** सागवान लाकडाचा उपयोग हा मुख्यत्वे उच्च दर्जाच्या फर्निचरमध्ये केला जातो. सागवान लाकूड हे टिकाऊ, पाणी प्रतिरोधक, किटक प्रतिरोधक असावे. इतर लाकडाच्या तुलनेत महाग आहे. परंतु त्याच्यावर असणाऱ्या अंगभूत रेषा (g ains) आणि वर्तुळे (ring ) स्पष्ट असल्याने ते दिसण्यास सुंदर व नक्षीदार दिसते. सागवानी फर्निचर किंचित वजनदार आणि टणक असते. त्याला सहजपणे पॉलिश करता येते.
- **अक्रोड, चंदन आणि महागनी :** हे देखील फर्निचरसाठी वापरले जाते. सहसा उपलब्ध होत नाही आणि महाग असते. ते लहान सजावटीच्या वस्तूसाठी आणि फर्निचरचे छोटे भाग तयार करण्याकरिता त्याचा उपयोग केला जातो. जसे- सेंटर टेबल बॉक्सेस किंवा खोके इत्यादी. चंदनाच्या फर्निचरला स्वत:चे विशिष्ट मूल्य व सौंदर्य असते. चंदनाच्या लाकूड कटाईवर सरकारने बंदी घातली असल्याने आजकाल चंदनाचे फर्निचर बनविणे अशक्य झाले आहे.
- **साल व शिसम लाकूड :** साल व शिसमचे लाकूड मजबूत व जड असते. शिसमपेक्षा सालचे लाकूड हलक्या दर्जाचे असते. शिसमचे लाकूड दिसायला चांगले व सुंदर दिसते. पण ते खूप महाग आहे. म्हणून त्यांचा उपयोग फर्निचरसाठी आणि सजावटीच्या वस्तूसाठी केला जातो.
- **हलदा, बांबू, आंबा, नीम अशा विविध प्रकारचे लाकूड :** अशा प्रकारच्या लाकडापासून कमी किमतीचे फर्निचर तयार करतात. या लाकडाचा टिकाऊपणा व अंगभूत रेषा यांची तुलना सागवानी लाकडाशी होऊ शकत नाही.
- **विलो (वाळूजी), रॅटन (एक प्रकारचे माडाचे झाड, रीड बोरू) :** यापासून तयार केलेल्या कामाला विकर असे म्हणतात. विलो हे केन प्रमाणेच विणले जाऊ शकते. रॅटनच्या केन कामाला कुठलाही रंग बसत नाही; परंतु मशालीच्या चटक्यांनी त्याला भाजका रंग (परिणाम) देता येतो. रॅटनचे बाहेरचे तंतू

काढल्यावर त्यातून निघणारे गाभा तंतू म्हणजेच एक रीड होय.



आकृती ७.१ : लाकडी फर्निचर

- **प्लायवूड :** प्लायवूड कृत्रिम लाकूड आहे. हे बाजारात विविध आकारात व जाडीमध्ये उपलब्ध आहे. याची गरजेनुसार निवड केली जाते. हे कसर, पाणी, अग्नी प्रतिरोधर प्रकारात उपलब्ध आहेत. हे फर्निचर संरचनात्मक, अंतर्गत व बहिर्गत सुशोभनाकरिता विस्तृत प्रमाणात वापरले जाते.

२. **केन :** या फर्निचरमध्ये विविध व्यासाच्या बाबूंच्या पट्ट्या वापरल्या जातात. केनच्या पातळ व लवचीक पट्ट्यांमुळे विणणे, गुंडाळणे, वेणीसारखे गुंफणे यासारख्या प्रक्रिया कारागिरांना सहजपणे करता येतात. या फर्निचरला परिसज्जा करण्यासाठी मेण, तेल रंग, पॉलिश केले जाते. हे लाकडी फर्निचरपेक्षा वजनाला हलके आणि किमतीने स्वस्त असते.

पारंपरिकरित्या लाकडावर केन गुंडाळून बाहेर मोकळ्या जागेत वापरावयाचे फर्निचर बनविले जाते. जागतिकीकरण आणि उत्तम प्रसिद्धीमुळे आजकाल केनचे फर्निचर खास व वैशिष्ट्यपूर्ण ओळख दर्शविते.



आकृती ७.२ : केन फर्निचर

अनेक घरांत व हॉटेल्समध्ये केन फर्निचरचा उपयोग केलेला स्वतंत्र विभाग असतो. झोपण्याची खोली तसेच बैठकीची खोली दिमाखदार दिसण्यासाठी केन फर्निचरचा उपयोग केला जातो. आराम खुर्ची, जेवणाच्या टेबलाच्या डौलदार खुर्च्या आणि दिमाखदार सोफा इत्यादींचा केन फर्निचरमध्ये समावेश झालेला आढळतो.

३. **धातू :** विविध प्रकारच्या धातूचा मोठ्या प्रमाणात फर्निचर निर्मितीकरिता वापर केला जातो. उदाहरणार्थ: धातू (कच्चे लोखंड व रंगविलेले लोखंड), ॲल्युमिनियम, स्टेनलेस स्टील, रंगविलेले स्टील आणि पितळ या सारख्या धातू आणि मिश्र धातूचा वापर धातूच्या फर्निचरसाठी मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. फर्निचरला गंजरोधक बनविण्याकरिता त्यावर क्रोमियमचा मुलामा देतात किंवा रंगवितात.

धातूचे फर्निचर अत्यंत उपयुक्त, कोरडी, कृत्रिम उष्णता त्यांच्यावर परिणाम करीत नाही परंतु हवामानाचा परिणाम घेऊ शकतो. हे वेगवेगळ्या आकारात सहजपणे बनवता येते. धातूचे फर्निचर बनविताना त्याचे सुटे भाग वेल्डींगने (धातूचे जोडकाम) व रेव्हेटने जोडतात.



आकृती ७.३ : धातूचे फर्निचर

बाजारपेठेत विविध प्रकारचे धातूचे फर्निचर आहेत. उदा. खुर्च्या, टेबल, रॅक, कपाट आणि कॅबिनेट इत्यादी. रेखीव व आकर्षक रंगातील धातूचे पोकळ पाईप्स अथवा हलके ॲगल्स फर्निचरकरिता उपयोगात येतात.

४. **प्लास्टिक :** प्लास्टिक फर्निचर हे विविध आकारात व प्रमाणात बनविता येते. विविध रंगामुळे ते खूप

आकर्षक दिसतात. यामध्ये युरेथेन सारखे पूर्वमिश्रित रसायन आहे. यामध्ये नरमपणाचा गुणधर्म दिसतो. त्यामुळे मोल्डेड प्लॅस्टिक फर्निचर बनवले जाते. त्यावर पोचे पडत नाहीत, ते सहजासहजी तुटत नाही, वजनाला हलके, सहज हलविता येते आणि स्वच्छ करणे सोपे जाते. प्लास्टिक केनचा उपयोग खुर्च्यांची बैठक व पाठ टेकण्याची बाजू विणण्यासाठी होतो.



**आकृती ७.४ : प्लास्टिक फर्निचर**


**५. गादीचे फर्निचर :** सामान्यत: लाकडी आणि इतर साहित्याचे फर्निचर वापरण्यास सोयीस्कर नसते म्हणून त्यांना गादीचा उपयोग करून परिसज्जा केले जाते. यालाच अफोल्स्टरिंग किंवा गादीचे फर्निचर असे म्हणतात. कायमस्वरूपी गादीच्या फर्निचरमध्ये चार भाग असतात. चौकट स्प्रिंग्स ऐवजी बेल्टस भरण्यासाठी कापूस, नारळाचे कॉथर, कपड्याचे तुकडे, विविध घनतेचे फोम्स वापरतात.



**आकृती ७.५ : गादीचे फर्निचर**

गादीच्या फर्निचरची चौकट ही लाकूड आणि धातूच्या साहित्याद्वारे बनविली जाते. योग्य आधारासाठी स्प्रिंग्स ऐवजी बेल्टचा वापर केला जातो. फर्निचरमध्ये बैठकीच्या आरामदायकतेसाठी विविध घनतेचे फोम वापरले जातात. फर्निचरच्या परिसज्जासाठी खोलीतील रंग योजनेनुसार रेक्झीन कापड किंवा लेदर कापड, विविध प्रकारचे विणलेले आणि न विणलेले कापड निवडावे. रेक्झीन कापडाच्या तुलनेत विविध प्रकारचे कापड आणि लेदर कापड अधिक टिकाऊ असतात. गादीच्या फर्निचरची मजबुती वाढविण्यासाठी उष्णता आणि पाणी प्रतिरोधक अशा खिळ्यांचा आणि फिनोल रेक्झीन गोंदचा वापर केला जातो. फर्निचरचे पाय जमिनीवर चौरस समांतर आणि स्थिर असल्यामुळे व्यवस्थित आधार मिळतो. योग्य प्रमाणात फर्निचरची बनविले असल्यास आरामदायकता आणि टिकाऊपणा वाढतो.

**६. काच :** अलिकडे फर्निचरमध्ये काचेचा वापर जास्त लोकप्रिय होत आहे. काच विविध रंगात व आकर्षक सजावटीच्या स्वरूपात उपलब्ध असतात. काचेच्या सपाट पृष्ठभागाचा वापर बहुतेक वेळा जेवणाच्या व लिखाणाच्या टेबलासाठी केला जातो. काचेचा उपयोग सामान्यत: विभाजनासाठी, बाहेरील आणि आतल्या मोठ्या तावदान आणि खिडक्यांसाठी केला जातो. काचेचे फर्निचर हे कसर, पाणी प्रतिरोधक आणि स्वच्छ करण्यास सोपे असतात.



**आकृती ७.६ : काच फर्निचर**

फायबर ग्लास तयार करण्यासाठी काचेच्या सूक्ष्म धाग्यांपासून विणून जाळी तयार करतात आणि हे मजबूत, अग्निरोधक असते. फायबर ग्लास प्लॅस्टिकबरोबर एकत्र करून अतिशय मजबूत व वजनाला हलके असे फर्निचर बनविता येऊ शकते. सामान्यत: ती विमानतळे, रेस्टॉरंट्स आणि प्रेक्षकगृह सारख्या सार्वजनिक ठिकाणी चमकदार रंगीत, साच्याच्या खुर्च्यांच्या स्वरूपात दिसून येते.

**इंटरनेटचा उपयोग करा :**
इंटरनेटवरून विविध प्रकारची फर्निचरची छायाचित्रे शोधा.

## ७.३ फर्निचर मांडणीतील सर्व साधारण तत्त्वे :

- फर्निचर खरेदी करण्याचा निर्णय घेतला जातो तेव्हा, खोलीच्या आकारानुसार फर्निचरचा आकार आणि संख्या ठरविली जाते. ज्यामुळे खोलीमध्ये अडचण निर्माण होणार नाही आणि त्यानुसारच खोलीमध्ये फर्निचरची मांडणी केली जाते.

**नेहमी लक्षात ठेवा :**
फर्निचर मांडणीतील सर्वसाधारण तत्त्वे.

- खोलीचा आकार व फर्निचरचा आकार यामध्ये प्रमाणबद्धता असावी. लहान खोलीत लहान फर्निचर तर मोठ्या खोलीत मोठे फर्निचर ठेवावे.
- फर्निचरचा आकार भिंतीच्या जागेशी त्याचा संबंध चांगल्या प्रमाणात असावा. उदाहरणार्थ : मोठे व जड फर्निचर मोठ्या भिंतीपाशी आणि लहान फर्निचर लहान भिंतीजवळ किंवा मोठ्या भिंतीच्या कोपऱ्यात लावावे, जेणेकरून खोलीच्या आकारात प्रमाणबद्धता दिसून येते. खोलीच्या अंतर्गत सजावटीनुसार फर्निचरची रचना असावी.
- खोलीत मोठ्या फर्निचरची मांडणी करावी नंतर छोट्या फर्निचरची मांडणी करावी. संतुलन राखण्यासाठी एकाच प्रकारचे फर्निचर किंवा विरुद्ध प्रकारचे फर्निचर मांडावे.



**आकृती ७.७ : फर्निचरची मांडणी**

- खोलीची जागा कमी करेल अशा अधिक फर्निचरचा समावेश करू नये, त्यामुळे खोलीचा आकार कमी असल्याचा भास निर्माण होऊ शकतो.
- घरगुती दुर्घटना टाळण्यासाठी येण्याजाण्याच्या मार्गामध्ये (ट्रॅफीक लाईन) अडथळा येणार नाही अशा पद्धतीने फर्निचरची मांडणी करावी.
- दारे, खिडक्यांपासून काही अंतरावर फर्निचरची मांडणी करावी जेणे करून खोलीत भरपूर हवा आणि सूर्यप्रकाश येईल.
- प्रत्येक खोलीत, फर्निचर मांडणीच्या पुनरावृत्तीद्वारे लय प्राप्त करणे आवश्यक आहे किंवा फर्निचरचा रंग, डिझाईन, पोत यांचा वापर सारखा असावा. जेणे करून व्यक्तीची दृष्टी एका बिंदूपासून दुसऱ्या बिंदूच्या स्थानापर्यंत जाईल.
- बांधकामातील दोष फर्निचरच्या मांडणीमुळे झाकता येतात. उदाहरणार्थ : जर खोली मोठी असेल तर खोलीच्या कोपऱ्यात मोठ्या फर्निचरची मांडणी करावी.
- फर्निचरच्या सभोवतालची मोकळी जागा असणे आवश्यक असते, जेणेकरून खोलीच्या भिंती सहज स्वच्छ करणे व देखभाल करणे सोपे होईल.
- फर्निचर मांडणीमध्ये सौंदर्याचा विचार करण्यापेक्षा मांडणीचा कार्यात्मक विचार करणे अधिक महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ : बैठक खोली सर्व समावेशक असावी व बेडरूममध्ये विश्रांती व एकांतता असावी.

## ७.४ फर्निचरची काळजी व निगा :

फर्निचर खरेदी करण्यापूर्वी कुटुंबातील सदस्यांना फर्निचरची निगा राखण्याचे व काळजी घेण्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. फर्निचरचा नवेपणा, स्वरूप आणि सौंदर्य, टिकवून ठेवण्यासाठी फर्निचरची योग्य काळजी घेणे व देखभाल करणे गरजेचे असते. फर्निचरच्या साहित्य प्रकारानुसार त्याची काळजी आणि देखभाल घेण्यासाठी पुढील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. **लाकडी फर्निचरची निगा :** फर्निचर नेहमी मऊ कापडाने पुसून धूळ झटकावी. साप्ताहिक स्वच्छता करताना कोमट पाण्यात व्हिनेगर मिसळून पुसून घ्यावे आणि कोरडे करावे. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लाकडी फर्निचर नेहमी कोरडे ठेवावे. सर्व लाकडी फर्निचरला वाळवी प्रतिबंधक उपाययोजना कराव्या. लाकडी फर्निचरच्या देखभालीसाठी पॉलिश करावे.

**चला करू या :**

| | | |
|---|---|---|
| टर्पेन्टाईन | : | २ भाग |
| मेथिलेटेड स्पिरीट | : | १ भाग |
| जवस तेल | : | २ भाग |
| व्हिनेगर | : | १ भाग |

- एका काचेच्या भांड्यात वरील साहित्य घ्यावे.
- मिश्रण एकजीव तयार करण्यासाठी चांगले ढवळावे. लाकडी फर्निचरसाठी या घरगुती पॉलिशचा वापर करावा.

२. **केनच्या फर्निचरची निगा :** दररोज केन फर्निचर मऊ, सूती कापडाने स्वच्छ करावे. साबणयुक्त पाण्याचा कधीही वापर करू नये कारण त्यामुळे फर्निचर पिवळसर पडते. काही वेळा एक लिटर पाण्यात एक मोठा चमचा मीठ घालून या मिश्रणाने फर्निचर स्वच्छ करावे आणि ते त्वरित कोरडे करावे.

३. **धातूच्या फर्निचरची निगा :** हे फर्निचर साबणाच्या कोमट पाण्याने स्वच्छ करता येते. स्वच्छ पाण्याने फर्निचर धुवावे. फर्निचर स्वच्छ केल्यानंतर कोरड्या टॉवेलने पुसावे किंवा सूर्यप्रकाशात ठेवावे. गंजण्यापासून रोखण्यासाठी धातूच्या फर्निचरला रंगविले जाते किंवा क्रोमियमचा मुलामा दिला जातो.

४. **प्लास्टिक फर्निचरची निगा :** मऊ फ्लॅनेल कपड्याने दररोज धूळ पुसावी. साबणयुक्त पाणी किंवा स्निग्धांश विरहित स्वच्छताकारक फवाऱ्याच्या साहाय्याने स्वच्छ करता येते.

५. **गादीच्या फर्निचरची निगा :** गादीच्या फर्निचरवरची धूळ नरम ब्रश किंवा व्हॅक्यूम क्लीनरचा वापर करून स्वच्छ करता येते. मऊ सूती कापडाने पेट्रोल किंवा व्हिनेगरच्या साहाय्याने लहान डाग काढून टाकावे. डाग काढण्याची क्रिया एका दिशेने करण्याची काळजी घ्यावी. डाग ओळखल्यास डाग काढण्याच्या योग्य पद्धतीने डाग काढावे. लेदर कापडाची देखरेख करणे सोपे आहे कारण व्हिनेगर किंवा लिंबाच्या रसाने ते साफ करता येते.

६. **काचेच्या फर्निचरची निगा :** काचेच्या फर्निचरवरील धूळ दररोज काढणे आवश्यक आहे. ओरखडे टाळण्यासाठी मऊ फ्लॅनेल कपड्याने काचेचे फर्निचर पुसावे. काच स्वच्छ करणाऱ्या द्रावणाचा उपयोग करावा. असे द्रावण व चमक आणणारे द्रावण बाजारात उपलब्ध आहेत. व्हाईटनिंग पावडर व ओल्या वृत्तपत्राचा वापर करून सरकत्या खिडक्यांच्या काचा स्वच्छ केल्या जातात. चिकट ग्लास फर्निचर स्वच्छ करण्यासाठी थोडे अमोनिया आणि पाण्याचा वापर करावा. काचेच्या फर्निचरवरील डाग काढून टाकण्यासाठी मेथिलेटेड स्पिरीटचा उपयोग करता येतो.

## तुम्हाला आठवते का?

- गृहसजावटीमध्ये फर्निचर हा महत्त्वपूर्ण घटक आहे आणि बाजारात अनेक प्रकारचे फर्निचर उपलब्ध आहेत.
- आंतरिक सजावटमध्ये फर्निचर हे एक आवश्यक घटक आहे.
- फर्निचरमुळे खोलीचे सौंदर्य वाढते आणि कुटुंबाचा दर्जा सुधारतो.
- फर्निचरमुळे कुटुंबातील प्रत्येक सदस्यास आराम व सोय उपलब्ध होते.
- फर्निचरचा वापर विविध कार्यासाठी केला जातो जसे बसणे, लेखन करणे, आराम करणे, जेवण करणे, झोपणे.
- लाकूड, प्लास्टिक, गादी, धातू, केन आणि काच तसेच यासारख्या साहित्याच्या एकत्रित उपयोगाने फर्निचर बनविले जाते.
- फर्निचरची निवड करताना पुढील घटकाचा विचार करावा लागतो. उदाहरणार्थ : आराम, कौटुंबिक प्राधान्य, आर्थिक तरतूद, रचना व डिझाईन, टिकाऊपणा, आर्थिक तरतूद रचना व डिझाईन, टिकाऊपणा, हवामान, देखभाल, नवीन कल, लवचीकता, सौदर्य मूल्य इत्यादी.
- वेगवेगळ्या साहित्यापासून बनविलेल्या फर्निचरची काळजी व देखभाल वेगवेगळ्या पद्धतीने घेतली जाते.

## स्वाध्याय

- **वस्तुनिष्ठ प्रश्न :**

**१) दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडा.**

१. जड फर्निचरची भिंतीच्या — रचना करावी.

अ) समोरासमोर (विरुद्ध)

ब) समोर

क) समांतर

२. धातूचे फर्निचर — वजनाचे फर्निचर बनविण्यासाठी वापरली जाते.

अ) जड

ब) हलके

क) मध्यम

३. फर्निचर बनविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या — साहित्यात लाकूड आहे.

अ) सामान्य

ब) नियमित

क) पारंपरिक

४. फर्निचरचा मूळ उद्देश — आणि विश्रांती.

अ) आरामदायकता

ब) चैन

क) फॅशन

५. बदली होणाऱ्या कुटुंबासाठी — फर्निचरला प्राधान्य असते.

अ) कमी वजनाचे

ब) जड वजनाचे

क) अरुंद

**२) जोड्या जुळवा.**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १) लाकडी फर्निचर | अ) वजनदार |
| २) धातू फर्निचर | ब) आरामदायक |
| ३) प्लास्टिक फर्निचर | क) रंगविलेले |
| ४) फर्निचर | ड) लवचीक |
| ५) काच फर्निचर | इ) साबणाचे द्रावण |

**३) खालील विधाने चूक आहेत की बरोबर ते ओळखा.**

अ) लहान घरासाठी फर्निचर हे बहुउद्देशीय असते.

ब) प्लास्टिक फर्निचर हे अधिक लवचिक असते.

क) काचेचे फर्निचर स्वच्छ करणे कठीण जाते.

ड) फर्निचरची रचना व डिझाईन हे आरामदायक घटकावर अवलंबून असते.

- **लघुत्तरी प्रश्न :**

**१) खालील कारणे द्या.**

अ) प्लास्टिक फर्निचर प्राधान्याने ऑफिससाठी वापरले जाते.

ब) फर्निचर हे गृहसजावटीचा मूलभूत भाग आहे.

क) बहुउद्देशीय फर्निचर लहान घरासाठी योग्य आहे.

**२) टिपा लिहा.**

अ) फर्निचर पॉलिश तयार करण्याची घरगुती पद्धत

ब) काचेच्या फर्निचरची स्वच्छता

क) कोणत्याही दोन फर्निचरचे प्रकार

ड) फर्निचरची काळजी

इ) नरम व कठीण लाकूड

फ) लाकडी व काचेचे फर्निचर

● **दीर्घोत्तरी प्रश्न.**

अ) फर्निचरची निवड करताना कोणते महत्त्वाचे मुद्‌दे विचारात घ्याल.

ब) फर्निचरसाठी वापरले जाणारे विविध प्रकारचे साहित्य लिहा.

क) फर्निचर मांडणीची सामान्य तत्त्वे लिहा.

ड) विविध प्रकारच्या फर्निचरची काळजी व निगा स्पष्ट करा.

● **प्रकल्प :**

अ) वर्गखोलीतील फर्निचरचे डिझाईन, साहित्य, रचना व परिसज्जा यांचे निरीक्षण करा.

ब) विविध प्रकारच्या फर्निचरची चित्रे गोळा करा. विविध खोल्या आणि साहित्याच्या आधारावर त्यांचे वर्गीकरण करून स्क्रॅपबुक तयार करा.

क) फर्निचरच्या दुकानाला (शोरूम) किंवा सुशोभित घराला भेट देऊन फर्निचरचे प्रकार, साहित्य आणि किंमत याबद्‌दल माहिती अहवाल लिहा.

❑❑❑

# ८. पुष्परचना आणि सजावट


८.१ पुष्परचना आणि सजावट यांची प्रस्तावना.

८.२ पुष्परचनेकरिता उपयोगात येणारे साहित्य.

८.३ पुष्परचनेचे प्रकार.

८.४ पुष्परचनेची तत्त्वे.

८.५ पुष्पसजावटीचे प्रकार.


**सांगा पाहू :**

- तुमच्या बागेत कोणती फुलझाडे आहेत?
- तुमच्या आजूबाजूला कोणत्या प्रकारच्या फुलांचे तुम्ही निरीक्षण करता?
- तुमच्या आजूबाजूला दिसणाऱ्या फुलांची नावे सांगा.
- फुलांचे निरनिराळे उपयोग सांगा.

पुष्परचना ही एक प्राचीन कला आहे. विविध फुलांची त्यांचे सौंदर्य वाढविण्याच्या दृष्टिकोनातून केलेली सुसंगत मांडणी करण्याची कला म्हणजे पुष्परचना होय.

**ॲना रट यांची व्याख्या :**

''फुले, पाने, इतर साहित्य यांची रूपे (forms), पोत आणि रंग यामधील सुसंगती लक्षात घेऊन केलेली कलात्मक रचना म्हणजे पुष्परचना. सभोवतालच्या वातावरणामध्ये उत्साह, जिवंतपणा आणि सौंदर्य निर्माण करणे असा या कलेचा उद्देश आहे.''

हा कलाप्रकार घरांमध्ये तसेच देवळांमध्ये, चर्चमध्ये, हॉटेल्समध्ये आणि हॉस्पिटलमध्ये देखील वापरतात. उत्सवाच्या किंवा मंगलप्रसंगी फुलांनी गृहसजावट करणे, फुलांच्या माळा, दारांना तोरण, फुलांनी खांब सजविणे, अंगणात फुलांची रांगोळी काढणे, मंच सजावट करणे. अशा प्रकारे फुलांची सजावट केली जाते.

## ८.१ पुष्परचना आणि पुष्पसजावट यांची प्रस्तावना :

**लक्षात ठेवा :**

पुष्परचना आणि पुष्पसजावट यांचे महत्त्व.

- पुष्परचना घराला सौंदर्य प्रदान करते व निसर्गाला घरात आणते.
- व्यक्तीच्या क्रियाशीलतेला वाव देणारा व वेळेचा सदुपयोग करण्याचा हा मार्ग आहे.
- पुष्परचनेमुळे घरात चैतन्य निर्माण होते आणि आपली संस्कृती टिकविते.
- जीवनातील निष्क्रियता दूर करते, मन निरोगी व प्रसन्न ठेवते.
- आपल्या कार्यक्षमतेला आणि क्रियाशीलतेला नवीन काहीतरी करण्याची संधी मिळते.
- पुष्परचना आपल्याला सुंदरतेचे महत्त्व आणि कलेचे तत्त्व शिकविते.

## ८.२ पुष्परचनेकरिता उपयोगात येणारे साहित्य :

**तुम्हाला माहिती आहे का?**

१) **वनस्पती साहित्य :** ताज्या वनस्पतीपासून उपलब्ध होणारे कोणतेही साहित्य उदाहरणार्थ – फुले, पाने, फळे, कळ्या, फांद्या, वेलीयुक्त फांद्या इत्यादींचा यात सामावेश होतो. विशिष्ट हंगामात फुलांचे अनेकविध प्रकार उपलब्ध असतात. त्यांचा उपयोग करून पुष्परचनेत विविधता आणता येते. पानांच्या उपयोगाने पुष्परचनेचे सौंदर्य वाढविले जाते. फांद्या आणि पाने यांना प्राधान्य देऊन फुलांची मांडणी खालच्या बाजूला करता येते. पुष्परचनेसाठी, नैसर्गिकरित्या चांगला आकार असलेल्या फांद्या निवडाव्या.

**नेहमी लक्षात ठेवा :**

- फुले किंवा पाने कापण्यापूर्वी झाडांना पाणी घालावे.
- झाडांची हानी होऊ नये म्हणून फांद्या, फुले कापण्याची योग्य वेळ सूर्योदयापूर्वी किंवा सूर्यास्तानंतरची आहे.

- फांद्या, फुले कापण्यासाठी धारदार कात्री वापरावी तसेच देठ तिरपे कापावेत. जेणेकरून त्यांची पाणी शोषून घेण्याची क्षमता वाढेल.
- चिमूटभर मीठ, साखर किंवा कोळसा घातलेल्या थंड पाण्यामध्ये फांद्या, फुले इत्यादी कमीत कमी तीन तास ठेवावीत यामुळे मजबुती येते.
- ज्या फुलांच्या देठामधून पांढरा चीक स्रवतो असे देठ काही वेळा वाहत्या पाण्याखाली धरावेत. ज्यामुळे चीक निघून जाऊन पाणी शोषणाची क्रिया चांगल्या प्रकारे घडून येऊ शकेल.
- बाजारामध्ये फुलांची खरेदी केली असता, फुले ओल्या वर्तमानपत्रात गुंडाळावी, नंतर ती पॉलिथीन बॅगमध्ये घालून आणावी.

२) **शुष्क साहित्य :** वनस्पतीचे शुष्क साहित्य उदाहरणार्थ : फुले आणि पाने गोळा करून किंवा विकत आणून ठेवता येतात. ताजे वनस्पती साहित्य सहजतेने उपलब्ध नसेल तेव्हा असे साहित्य उपयुक्त ठरते. त्याचबरोबर त्यांची फारशी निगा राखावी लागत नाही.

३) **पुष्पपात्रे :** बाजारामध्ये अनेक वेगवेगळ्या प्रकारची पुष्पपात्रे उपलब्ध असतात. काही उंच तर काही सपाट असतात. ती वेगवेगळ्या साहित्यापासून बनविलेली असतात. उदाहरणार्थ : तांबे, पितळ, चिनी माती, माती, बांबू, लाकूड, काच इत्यादी. यापैकी एकाची काळजीपूर्वक निवड केली पाहिजे. पुष्पपात्र अगदी साधे, सौम्य रंगाचे आणि ज्यामध्ये भरपूर पाणी मावेल असे असावे. पुष्परचना सुरू करण्यापूर्वी ते पाण्याने भरून घ्यावे. जेवणाच्या टेबलासाठी पुष्परचना करताना कमी उंचीचे, सपाट आणि पसरट पुष्पपात्र निवडावे, तर खोलीच्या कोपऱ्यात किंवा भिंतीसमोर ठेवण्यासाठी पुष्परचना करताना उंच पुष्पपात्र निवडावे.

४) **पुष्पधारके (फ्लॉवर होल्डर्स) :** बाजारामध्ये अनेक वेगवेगळ्या आकारांचे आणि प्रकारांचे फ्लॉवर होल्डर्स उपलब्ध असतात. जसे : पीन होल्डर्स, तारेचे होल्डर्स, फोमवीट (ओॲसिस) इत्यादी. प्लास्टिसिन (पाण्यात न विरघळणारी माती) वापरून होल्डर्स पुष्पपात्रामध्ये घट्ट बसवून घ्यावे. उंच प्रकारच्या पुष्पपात्रांमध्ये इंग्रजी 'Y' आणि 'X' आकारांमध्ये फांद्यांचे छोटे तुकडे पुष्पपात्राच्या तोंडाशी बसवून पानाफुलांना आधार दिला जातो.

५) **पुष्परचना टिकविण्यासाठी उपयोगी साहित्य :** पुष्परचना बरेच दिवस ताजीतवानी रहावी यासाठी मीठ, ॲस्पिरिनची गोळी, बोरॅक्स, साखर, मॉस (एक प्रकारचे शेवाळ), बर्फाचे खडे, कोळसा किंवा वाळू वापरता येते. पुष्परचना अधिकाधिक टिकावी या दृष्टीने फुलांच्या किंवा फांद्यांच्या पाण्यात बुडालेल्या टोकांना पाने नसावीत.

६) **उपसाधने :** पुष्परचनेमध्ये वापरली जाणारी उपसाधने सुंदर आणि पुष्परचनेला सुसंगत अशी असावीत. अनेक प्रकारचे साहित्य उपसाधने म्हणून वापरले जाते. उदाहरणार्थ: रंगीत दगड, काचा, शंख-शिंपले, चिनी मातीचे प्राणी-पक्षी, मानवाकृती, सॅटिन रिबिन्स, आकर्षक जाळीदार कापड इत्यादी. अशा उपसाधनांचा आकार पुष्पपात्राशी मिळताजुळता म्हणजेच प्रमाणबद्ध असावा.

७) **इतर साहित्य :** पाने, फुले कापण्यासाठी धारदार कात्री, चाकू, रबरबॅण्ड, तार, टाचण्या, चिकटपट्टी इत्यादी वापरतात.




**आकृती ८.२ पुष्परचनेसाठी लागणारे साहित्य**

## ८.३ पुष्परचनेचे प्रकार :

१) **परंपरागत पुष्परचना :** परंपरागत पुष्परचनेमध्ये परंपरागत पुष्पसामग्री आणि रचना तंत्र यावर भर देतात. या प्रकारामध्ये पुष्परचना करणाऱ्या व्यक्तीच्या कल्पना विलासाला दुय्यम स्थान दिले जाते. पुष्परचनेसाठी

विशिष्ट पुष्पपात्रांचा उपयोग करतात. साधारणपणे गोल, सुरईच्या आकाराचे, धातूचे नाजूक नक्षीकाम केलेले पुष्पपात्र वापरतात.

या प्रकारच्या पुष्परचनेमध्ये वेगवेगळ्या प्रकारची पुष्कळ फुले वापरतात. त्यांच्या तुलनेमध्ये पानांची संख्या कमी असते. समान उंचीची फुले समतोल साधला जाईल अशा पद्धतीने रचली जातात. उदाहरणार्थ : गोलाकार पंख्याचा आकार या प्रकारामध्ये उपसाधने म्हणून मेणबत्त्यांचा उपयोग अधिक प्रमाणात केला जातो.



**आकृती ८.३ (अ) परंपरागत पुष्परचना**

२) **जपानी पुष्परचना :** इकेबाना ही जपानी पुष्परचना आहे. **इकेबाना म्हणजे फुलांची रचना.** जपानमध्ये इकेबानाच्या अनेक स्कूल (संप्रदाय) आहेत. त्यांच्या माध्यमातून जपानी लोकांनी ही कला खूप चांगल्याप्रकारे आत्मसात केली आहे. जपानी माणसाच्या जीवनात फुला-पानांना अतिशय महत्त्व आहे.

जपानी पुष्परचनेत रेषा व दिशांना अधिक महत्त्व दिले जाते. या पुष्परचनांमधून जीवनाचे तत्वज्ञान मांडले जाते. सभोवतालचे अवकाश, पुष्पपात्र यांच्या प्रमाणाशी ताळमेळ साधेल, अशा पद्धतीने फुलापानांची निवड करतात. रेखाबद्ध फुलापानांची मांडणी हे इकेबानाचे मुख्य वैशिष्ट्य आहे. या रचना साध्य, अनौपचारिक आणि अर्थपूर्ण असतात. या पुष्परचनांसाठी उंच वा उथळ अशा दोन्ही प्रकारची पुष्पपात्रे वापरतात. मंद रंगातील, उदाहरणार्थ : चॉकलेटी, राखडी, फिकट निळी, हिरवट, राखडी रंगाची आणि बांबू, माती, तांबे अशा साहित्याची पुष्पपात्रे निवडतात. कमी उंचीच्या पुष्पपात्रांमध्ये धातूची पीन होल्डर्स वापरतात तर उंच पुष्पपात्रांमध्ये झाडाच्या इंग्रजी 'Y' आकारामधील किंवा काटा चमच्याच्या आकाराचा छोटा तुकडा फुला-पानांना आधार देण्यासाठी लावतात.


जपानी पुष्परचनेत सर्व प्रकार प्रामुख्याने तीन तत्वांवर आधारित असतात. ही तीन तत्त्वे म्हणजे - स्वर्ग (Heaven), मानव (Man) आणि पृथ्वी (Earth). या तीन प्रतिकात्मक रेषा दर्शविण्यासाठी तीन प्रमुख फांद्या वापरतात.

**स्वर्ग :** सर्वांत उंच रेषेला स्वर्ग असे संबोधतात आणि ती पुष्पपात्राच्या मध्यभागी बसविली जाते. तिची उंची पुष्पपात्राच्या उंचीच्या दीडपट असते.

**मानव :** स्वर्ग रेषेखालोखाल उंची असलेली, रचनेला रुंदी देणारी रेषा म्हणजे मानव रेषा. ती पुष्पपात्राच्या लांबीइतकी असते.

**पृथ्वी :** सर्वांत लहान रेषा म्हणजे पृथ्वीचे प्रतीक होय. मानव फांदीच्या विरुद्ध दिशेला तोल साधला जाईल अशा पद्धतीने ती बसविली जाते. तिची उंची मानव फांदीच्या अर्धी असते.

या तीन प्रमुख फांद्याशिवाय पुष्परचनेला पूर्णत्व प्राप्त होण्याच्या दृष्टीने काही इतर पाने-फुले (फिलर्स) वापरतात. ज्यांना **'पर्वत'** आणि **'कुरण'** असे संबोधले जाते.




**आकृती ८.३ (ब) जपानी पुष्परचनेचा आराखडा**



**आकृती ८.३ (क) जपानी पुष्परचना**

**तक्ता पूर्ण करा.**

**जपानी पुष्परचना – प्रमुख तीन फांद्या**

| | | |
|---|---|---|
| | मानव | |

**३) आधुनिक पुष्परचना :** आधुनिक पुष्परचनेत परंपरागत नियमांचे बंधन नसते. रचनाकाराला आपल्या कल्पनेप्रमाणे पुष्परचना करता येते. कदाचित त्यामुळेच ही पुष्परचना अधिक लोकप्रिय होत आहे. या रचनेमध्ये वनस्पतीच्या सर्व भागांचा समावेश करतात. उदाहरणार्थ : निसर्गात आढळणारी विविध फुले, पाने, गवत, तुरे, वेली, क्रोटन, कॅक्टस, भाज्या, फळे इत्यादी प्रत्येक वेळी ताजी फुले–पानेच वापरतात असे नाही तर क्वचित प्रसंगी वाळलेली फुले–पाने किंवा काही वेळा कृत्रिम फुले देखील वापरली जातात. वर्तमानकाळात पिसे, काचांचे तुकडे, शंख आणि धातूच्या ओबडधोबड वस्तू देखील वापरतात.

या प्रकारच्या रचनेत पुष्परचनेसाठी कोणते साहित्य वापरले आहे. त्यापेक्षा ते कशाप्रकारे वापरले आहे या गोष्टीला जास्त महत्त्व आहे. मुक्तशैलीमुळे विविध आकारात या पुष्परचना करतात येणे शक्य होते. तसेच कोणत्याही आकारामध्ये रचना करता येते. या रचनांमध्ये लयबद्ध रेषा, प्रभावी रंग, आकार, पोत या गोष्टींना प्राधान्य दिले जाते.



**आकृती ८.३ (ड) आधुनिक पुष्परचना**

**४) शुष्क पुष्परचना :** भारतामध्ये उन्हाळ्यात तर थंड प्रदेशामध्ये हिवाळ्यात या प्रकारची पुष्परचना केली जाते. जेव्हा निसर्गात ताजी फुले–पाने उपलब्ध नसतात तेव्हा वाळलेली फुले, पाने, तुरे, फांद्या, फळे इत्यादींचा आकर्षकरित्या उपयोग केला जातो. रंगविलेले, वाळविलेले गवत या पुष्परचनेमध्ये प्रभावीपणे वापरले जाते. तसेच वाळलेल्या वनस्पती, गव्हाच्या ओंब्या, ज्वारी–बाजरीची कणसे, कपाशीचे बोंड, वुडरोजची फुले, झाडांची पाने, बुंधे अशा प्रकारचे साहित्य देखील वापरले जाते. बऱ्याचदा उथळ पुष्पपात्र वापरले जाते. सिरॅमिक, लाकडी, पारदर्शक नसलेले काचेचे पुष्पपात्र या प्रकारासाठी योग्य ठरते.



**आकृती ८.३ (ई) शुष्क पुष्परचना**

**५) अल्पाकृती पुष्परचना :** ही पुष्परचना नावाप्रमाणे आकाराने अगदी छोटी असते. साधारणपणे ही रचना पाच इंचापेक्षा जास्त उंच नसते. या रचना दिवाण खोलीतील टेबलवर, अभ्यासाच्या टेबलवर किंवा काहीवेळा जेवणाच्या टेबलवर देखील वापरतात.

छोट्या पुष्पपात्रांबरोबरच छोट्या बाटल्या, चहाचे कप यांचा देखील उपयोग पुष्पपात्र म्हणून केला जातो. अशा छोट्या पुष्पपात्रांबरोबर सुसंगत दिसतील अशी लहान आणि नाजूक फुले, पाने निवडतात. नेहमीच्या पुष्परचनेच्या तुलनेत फुलांची संख्या कमी असते. फुलांची संख्या कमी असली, आकार लहान असला तरी या रचना तितक्याच आकर्षक आणि सुबक असतात.



आकृती ८.३ (फ) अल्पाकृती पुष्परचना

### ८.४ पुष्परचनेची तत्त्वे :

**तुम्हांला हे माहीत आहे का?**

१) **आराखडा :** यावरून पुष्परचनेचा आकृतिबंध निश्चित केला जातो. आराखडा स्थळ, प्रसंग व उपलब्ध असलेले साहित्य यावरून आराखडा निश्चित केला जातो.

२) **तोल :** पुष्परचनेत वापरण्यात येणाऱ्या साहित्यावर हा भर देतो. त्यामुळे पुष्परचनेला स्थिरता प्राप्त होते. पुष्परचनेतील तोलाचे महत्त्वाचे दोन घटक म्हणजे प्रकार आणि रंग. तोल हा दोन प्रकारचा असतो.

अ) **समतोल :** पुष्परचनेच्या दोन्ही बाजूला सारख्याच प्रमाणात साहित्याची मांडणी केली जाते.

ब) **विषमतोल :** पुष्परचनेच्या दोन्ही बाजू सारख्या नसतात परंतु दृष्टिक्षेपात दोन्ही बाजू समान असल्याचा भास निर्माण करतात. येथे रंग महत्त्वाची भूमिका बजावतात. गडद रंग दृश्यपरिणाम साधतात म्हणून त्यांचा उपयोग रचनेत खालच्या भागात करतात. फिकट रंग पुष्परचनेच्या वरच्या भागासाठी व अन्य भागांसाठी जास्त योग्य असतात.

३) **मोजमाप :** याचा संबंध पुष्परचनेत असलेल्या विविध घटकांच्या प्रमाणाशी असतो. पुष्परचनेत पुष्पपात्राचा आकार व त्याकरिता वापरण्यात येणाऱ्या साहित्यावर भर दिला जातो.

४) **लय :** पुष्परचनेचा मुख्य भाग बघणाऱ्या दर्शकाच्या दृष्टीला दिशा देण्यावर हा भर देतो. जेणेकरून रचनेचा संपूर्ण आकार योग्यपणे बघितला जातो व समजून घेतला जातो.

५) **प्राधान्य (केंद्रबिंदू) :** पुष्परचनेचा मध्यवर्ती भाग ज्यामधून फुले व पाने बाहेर येतात त्याला पुष्परचनेचा केंद्रबिंदू म्हणतात. म्हणूनच मोठी व गडद रंगाची फुले बहुधा पुष्परचनेचा केंद्रबिंदू म्हणून वापरली जातात.

६) **साहित्य :** वाळलेले व ताजी फुले, पाने एकाच पुष्परचनेमध्ये वापरू नये.

७) **सुसंगती व एकता :** हे तत्त्व 'प्रसंगानुसार योग्य फुलांचा वापर करणे' याची काळजी घेते. पुष्परचनेमध्ये वापरण्यात येणाऱ्या फुलांचे रंग व पात्राचा रंग यांच्या मिश्रणाची हे तत्त्व काळजी घेते. ज्यामुळे दोन्हीमध्ये आवश्यक तेवढा विरोधाभास साधला जातो.

**बघा किती विलक्षण आहे.**

**बोनसाय (Bn sà)**

बोनसाय ही जपानी कलाकारांनी विकसित केलेली कलात्मक मूल्य असलेली रचना होय. जपानी भाषेत 'बोन' म्हणजे 'तबक' आणि 'साय' म्हणजे 'झाड' 'बोनसाय' म्हणजे 'तबकातले झाड' असा अर्थ आहे किंवा त्याला ट्रे प्लान्ट्स देखील म्हणतात.

**इंटरनेट माझा मित्र :**
इंटरनेटवरून बोनसायची अधिक माहिती शोधा आणि चित्रे गोळा करा.

### ८.५ पुष्पसजावटीचे प्रकार :


**तुम्हाला हे मनोरंजक वाटेल?**

शाळा आणि महाविद्यालयातील सांस्कृतिक संमेलने, साहित्य परिषदा, सभा, लग्न समारंभ परिसंवाद यासाठी करण्यात येणाऱ्या पुष्परचनांच्या व्यतिरिक्त झाडांचे साहित्य इतर अन्य प्रकारांसाठी सुद्धा वापरली जातात. ती खालीलप्रमाणे :

- **फुलांचे गुलदस्ते :** प्रेमाचा संदेश, फुलांच्या वस्तूंच्या रूपात वापर केला जातो. विविध कार्यक्रमांच्या वेळी फुलांचे गुलदस्ते भेट म्हणून दिले जातात.
- **फुलांच्या माळा :** फुलांच्या माळा विविध प्रसंगी वापरण्याच्या हेतूने तयार केल्या जातात. जसे की,

कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुण्यांना सन्मानित करणे, पूजेसाठी, लग्नात नवरदेव-नवरीकरिता, मंच सजावट इत्यादी.

- **पुष्पवर्षाव** : विविध कार्यक्रम प्रसंगी पाहुण्यांवर फुलांचा वर्षाव केला जातो.
- **फुलांची रांगोळी** : बाजारात सहजपणे उपलब्ध असलेल्या झेंडू, शेवंती, गुलाब यासारख्या फुलांचा, व पाकळ्यांचा फुलांच्या रांगोळीकरिता उपयोग केला जातो.
- **केसांमध्ये माळणे** : केसांमध्ये फुले माळण्याची फॅशन १८ व्या शतकापासून प्रचलित आहे. काळानुसार व फॅशननुसार शैली बदलत असते.
- **फुलांचे तुरे** : मृत व्यक्तीला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी लांब दांड्या असलेले फुलांचे तुरे सोबत नेले जातात. तसेच थडग्यांवर, शवपेटीवर ठेवले जातात.



आकृती ८.५ पुष्पसजावटीचे प्रकार

**इंटरनेट माझा मित्र :**
व्हिडीओ द्वारे पुष्परचनेच्या विविध प्रकारांचा शोध घ्या आणि नवीन माहिती इंटरनेटच्या माध्यमातून गोळा करा व चर्चा करा.

## हे आठवून पहा.

- फुलांची पद्धतशीर मांडणी करणे म्हणजे पुष्परचना होय.
- पुष्परचना व्यक्तीची क्रियाशीलता वाढवते.
- फुले, पाने, फळे, कळ्या, फांद्या इ. साहित्याचा वापर केला जातो.
- झाडांच्या वाळलेल्या फांद्या सुद्धा वापरतात.
- जपानी पुष्परचना ही स्वर्ग, मानव व पृथ्वी या तत्त्वांवर आधारित असते.
- पुष्परचना दिर्घकाळ टिकण्यासाठी मीठ, ॲस्प्रीन, बोरॅक्स, शेवाळ, बर्फाचे तुकडे, कोळसा, वाळू या वस्तूंचा वापर केला जातो.
- भेटवस्तूंच्या रूपातील फुले, गुलदस्ते, फुलांच्या माळा, पुष्पवर्षाव, फुलांची रांगोळी, मंच सजावट असे पुष्पसजावटीचे विविध प्रकार आहेत.
- फुलांच्या माध्यमातून संदेश दिले जातात. फुलांच्या माळा गृहसजावटीसाठी वापरतात आणि फुलांच्या रांगोळीने पाहुण्यांचे स्वागत केले जाते.
- आनंद व धार्मिक श्रद्धा व्यक्त करण्याकरिता पुष्पवर्षाव केला जातो.
- फुलांची मंच सजावट अलिकडे फार प्रचलित व लोकप्रिय झाली आहे.

## स्वाध्याय

- **वस्तुनिष्ठ प्रश्न :**

**१) दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडा.**

१. इकेबाना हा — पुष्परचनेचा प्रकार आहे.

अ) शुष्क

ब) जपानी

क) परंपरागत

२. या पुष्परचनेमध्ये नियमांचे बंधन नसते — .

अ) अल्पाकृती

ब) जपानी

क) आधुनिक

३. परंपरागत पुष्परचनेमध्ये — यावरती भर देतात.

अ) फुले

ब) पाने

क) साधनसामग्री

**२) खालील विधाने चूक आहेत की बरोबर ते ओळखा.**

अ) आधुनिक पुष्परचनेत नियमांचे बंधन नसते.

ब) 'इकेबाना' मध्ये रेषा आणि त्यांच्या दिशा यांना प्राधान्य दिलेले असते.

क) जेवणाच्या टेबलसाठी कमी उंचीचे पुष्पपात्र योग्य असते.

ड) परंपरागत पुषरचनेमध्ये वेगवेगळ्या प्रकारची पुष्कळ पाने वापरतात. त्यांच्या तुलनेत फुलांची संख्या कमी असते.

इ) पुष्परचना गृहसजावटीमध्ये सौंदर्याची निर्मिती करते.

- **लघुत्तरी प्रश्न :**

**१) फरक स्पष्ट करा.**

अ) परंपरागत आणि आधुनिक पुष्परचना.

ब) शुष्क आणि अल्पाकृती पुष्परचना.

**२) टिपा लिहा.**

अ) पुष्परचनेचे महत्त्व.

ब) शुष्क पुष्परचना

क) अल्पाकृती पुष्परचना

ड) पुष्पसजावटीचे प्रकार

- **दीर्घोत्तरी प्रश्न :**

अ) पुष्परचनेची व्याख्या सांगा. पुष्परचनेसाठी आवश्यक असलेल्या साहित्याची यादी स्पष्ट करा.

ब) पुष्परचनेची व्याख्या सांगून पुष्परचनांच्या प्रकारांचे वर्णन स्पष्ट करा.

- **प्रकल्प :**

अ) विविध प्रकारच्या पुष्परचना तयार करा.

ब) विविध प्रकारच्या पुष्परचनांचे चित्र/फोटो गोळा करून वही (Scrap Book) तयार करा.

क) पुष्परचनेकरिता/लागणाऱ्या/साहित्याचे चित्र गोळा करून वही (Scrap Book) तयार करा.

# ९. लँडस्केपींगची ओळख

९.१ व्याख्या संकल्पना आणि महत्त्व
९.२ जागेच्या सुशोभिकरणात उपयोगात येणारी झाडे
९.३ किचन गार्डन (परसबाग)

**तुम्हाला माहीत आहे का? :** जागेचे सुशोभिकरण आणि किचन गार्डन (परसबाग) म्हणजे काय?

**प्रस्तावना :** प्रत्येक मनुष्य हा निसर्ग प्रेमी असतो. जेव्हा आपल्या अवतीभवती हिरवळ, सुंदर झाडे, फुले असतात. तेव्हा आपल्याला वेगळ्या आनंदाचा अनुभव येतो. रम्य निसर्ग अनुभवण्यासाठी वर्षातून एकदा तरी लोक थंड हवेच्या ठिकाणी सहलीला जातात. आपले घर किंवा कामाच्या जागेच्या अवतीभवतीचा परिसर निसर्गरम्य व सौंदर्यात्मक करण्यात, बाग व लँडस्केपिंग यांचा महत्त्वाचा वाटा आहे. निसर्गाचा आनंद याने अनुभवता येतो.

## ९.१ व्याख्या, संकल्पना आणि महत्त्व :

**चर्चा करू या :**

लँडस्केपींगमुळे तुमच्या घरामध्ये खूप चांगला बदल घडतो. त्यामुळे जगाला तुमच्या कुटुंबाबद्दल बरेच काही कळते. जी झाडे आणि त्यांची संरचना आपल्या घराभोवती असते त्यातून लोकांना आपली आवड कळते. 'लँडस्केप' या शब्दाचा वापर सर्वप्रथम एका डच कलाकाराने १६ व्या शतकात केला. तेव्हा त्याने एक निसर्गचित्र रंगवले. एक लँडस्केपर हा कुठल्याही प्रकाराच्या बागेचा आराखडा सौंदर्य व वातावरण निर्मिती करतो.

घराच्या समोर किंवा मागे असलेली सुशोभित बाग सुद्धा घराला ताजेपणा किंवा जिवंतपणा आणते. ही जागा कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला आणि पाहुण्यांना देखील आवडते. याच जागी कुटुंबातील मंडळी सकाळी किंवा संध्याकाळी चांगला वेळ घालवू शकतात.

**व्याख्या :**

१. लँडस्केपींगमध्ये सौंदर्यानुभवाच्या दृष्टीने घराबाहेरील आराखडा तयार केला जातो. यात गवत, झाडे, फुलझाडे, पाण्याची रचना (सौंदर्यपूर्ण) दगड, कुंपण, फुलांचे वाफे याचा वापर केलेला असतो.

२. लँडस्केपींग ही अशी जागा असते जेथे झाडे, गवत आणि झुडुपे लावली जातात. पाऊलवाटा, फुलांचे फवारे, पाण्याच्या विशिष्ट रचना आणि कुंपण याच्या रचनेलाही लँडस्केप म्हणतात.

**लँडस्केपींगचे महत्त्व :**

लँडस्केपींग बऱ्याच प्रकारे महत्त्वाचे आहे. यामुळे घराभोवती आणि इमारतींभोवती आनंददायी वातावरण निर्मिती होते. घराभोवतीची छोटीशी बाग घराचे दृश्य, मूल्य आणि विक्रीची किंमत वाढविते. पर्यावरणभिमुख लँडस्केपिंग पर्यावरणाला बऱ्याच प्रकारे फायद्याचे ठरते.

**तुम्हाला माहीत आहे का?**

आरोग्याच्या दृष्टीने बागकाम किती महत्त्वाचे आहे.

अ) बागकाम केल्याने उष्मांक कमी करण्यास मदत होते. व्यक्तीची तब्येत उत्तम राहते.

ब) कुटुंबातील सदस्यांचे निसर्गाशी नाते निर्माण करण्यास मदत होते.

क) काही वेळ बाहेर बागकाम केल्याने मन:स्थिती सुधारते आणि व्यक्ती आनंदी होते.

ड) बागकाम केल्याने शारीरिक पुनर्वसन होऊन स्नायूंना बळकटी आणि शक्ती आल्याने हालचालीत सुसंगती येते.

इ) निसर्गाशी जोडले गेल्याने मनावरील ताण कमी होण्यास मदत होते.


**तुम्हाला माहीत आहे का?**

हे पर्यावरणाच्या दृष्टीने सुद्धा महत्त्वाचे आहे.

अ) एक पंचवीस फुट उंच झाड १० टक्क्याने वातावरणातील तापमान कमी करू शकते.

ब) स्वयंपाकघरातील कचऱ्यातून खत तयार होऊ शकते.

क) स्वयंपाकघरातील पाणी परिणामकारकरित्या बागेत वापरले जाऊ शकते.



आकृती ९.१ : लँडस्केपींगकरता वापरण्यात येणाऱ्या वस्तू व इतर घटक

लँडस्केपींगमध्ये खालील प्रकारच्या वस्तू वापरल्या जातात :

अ) गवत, झाडे, फुले, पाणी, दगड, कुंपण इत्यादी.

ब) जुनी सायकल, लाकडी बेंच, लाकडी ड्रम.

क) जुन्या केटल्यांमध्ये फुले येणारी किंवा सजावटीची झाडे लावता येतात.

## ९.२ लॅन्डस्केपींगमध्ये वापरली जाणारी झाडे :

**चर्चा करू या :**

सर्वसाधारणपणे लँडस्केपींगमध्ये वापरलेल्या झाडांचे इनडोअर आणि आऊटडोअर प्लांट्स असे वर्गीकरण होते.

मुख्यत्वे इनडोअर आणि आऊटडोअर झाडे असा फरक हा ही झाडे बाहेरील हवामान किती प्रमाणात सहन करू शकतात यावरून केला जातो.

- घरातील झाडांना सूर्यप्रकाश अतिशय कमी लागतो किंवा अजिबात नसला तरी चालतो. त्यांची वाढ घरातही होऊ शकते.
- घराबाहेरील झाडांना सूर्यप्रकाशाची गरज असते. कुठलेही हवामान ही झाडे सहन करू शकतात.

### आऊटडोअर प्लांट्स :

सर्वसाधारणपणे भारतात आढळणाऱ्या लँडस्केपींगमध्ये वापरण्यात येणारी बाहेरील झाडे :

गुलाब, बोगन वेल, सर्व प्रकारच्या लीली, झेंडू, जास्वंद, रबराचे झाड (रबर ट्री), सक्युलंट्सचे प्रकार, गुलमोहर, ख्रिसमस ट्री, चाफा, कमळ, छोट्या टाक्यांसाठी कमळ, लॉनसाठी गवताचे प्रकार इत्यादी.

झाडांचे बरेच प्रकार आहेत जे वाढवून लॅन्डस्केपींग मध्ये वापरले जाऊ शकतात. किती जागा उपलब्ध आहे, तेथील माती कोणत्या प्रकारची आहे आणि तेथील हवामान यावर कोणते झाड लावणे शक्य आहे हे ठरते.

### इनडोअर प्लांट्स :

या झाडांना वाढीसाठी कमी किंवा मध्यम प्रमाणात सूर्यप्रकाशाची गरज असते. ही झाडे अधून मधून खिडकीत ठेवली जाऊ शकतात. जेथे त्यांना दिवसभर काही प्रमाणात सूर्यप्रकाश मिळतो.



आकृती ९.२ : लँडस्केप चित्र

**स्पायडर प्लांट :** या झाडाला हे आगळेवेगळे नाव त्याच्या पानांच्या आकारामुळे पडले जे जाळ्यावर लटकणाऱ्या कोळ्याप्रमाणे दिसतात. हे झाड चामडी, रबर आणि प्रिंटिंग इंडस्ट्री किंवा वस्तूंमधील रासायनिक वायू जसे - बेनझीन कार्बन मोनॉक्साईड झायलेन याच्याशी प्रतिकार करण्यास सक्षम असतात. घातक द्रव्ये शोषून घेतात.

**लेडी स्लीपर ऑरकीड :** कुठल्याही घराला हे झाड सौंदर्य प्रदान करून चांगली वातावरण निर्मिती करते. या झाडाला लागणारे ऑरकीड्स 'स्लीपर' च्या आकाराचे असून दोन पानांच्या मधून उगवतात. गडद हिरव्या रंगांची पाने या झाडाचे सौंदर्य द्विगुणीत करतात. या झाडाला पाणी घालताना काळजी घ्यावी लागते. पाण्यात जर रासायनिक द्रव्ये असतील तर ते

पाणी चार दिवस भांड्यात काढून ठेवावे नंतर या झाडाला टाकावे. आठवड्यातून एकदा या झाडाला पाणी लागते. सरळ ऊन पडणार नाही, अशा सावलीत झाडाला ठेवावे.

**तुळस :** हे झाड सहज वाढवता येते. याची फारशी निगा राखावी लागत नाही. हे औषधी गुणांनी परिपूर्ण असे झाड आहे. हवा शुद्ध करण्यास आणि हवेची प्रत चांगली करण्यास या झाडाची मदत होते. कोणत्याही साध्या कुंडीत हे लागू शकते. याला धार्मिक आणि पारंपरिक महत्त्व आहे.

**कोरफड :** हे अत्यंत उपयोगी झाड आहे. याने हवा शुद्ध होते आणि सर्दी खोकलाही बरा होतो. केसांच्या वाढीसाठी हे चांगले असते. याने रंगकांती चांगली होण्यास मदत होते. कुंडीतील माती वाळल्यावरच या झाडाला पाणी घालावे. ऊन येणाऱ्या खिडकीत हे झाड ठेवावे. हे सावलीत ठेवल्यांस त्याची वाढ होणार नाही. हे झाड कुंडीत लावल्यावर त्याची मुळे दोन दिवस स्थिरावल्यावर त्याला पाणी घालावे.

**ड्रॅकीना :** या झाडाला थेट सूर्यप्रकाशाची गरज नसते. याची वाढ १२ फुटांपर्यंत होते. जेथे भरपूर जागा असेल तेथे हे झाड लावावे. अधून मधून कापल्यास याच्या वाढीवर नियंत्रण ठेवता येते. जेथे कापले तेथे काही आठवड्यात पालवी फुटते. याला साधारण ओल्या मातीची गरज असते. जर झाडाची पाने पिवळी पडली तर याचा अर्थ त्याला जास्त पाणी दिले गेले आहे किंवा त्यातील पाणी नीट वाहून जाण्यात अडथळा आहे. हे झाड खिडकीजवळ ठेवावे.

**विपींग फीग :** हे झाड फायकस बेनजामिन प्रजातीतील आहे. ही फुले लागणारी प्रजात आहे. या झाडाने पडदे, गालीचे आणि फर्निचर मधून निघणाऱ्या वायूंचे प्रमाण कमी करण्यास मदत होते.

**स्नेक प्लांट :** स्नानगृहातील हवा शुद्ध करण्यास याची मदत होते. यामुळे साबण, शाम्पू आणि इतर प्रसाधनातील फॉरमल्डीहाइड दूर करण्यास मदत होते. नासाने (NASA) हवेचे शुद्धीकरण करणारे झाड म्हणून याची ओळख दिली आहे. जास्त काळजी न घेता या झाडाची वाढ केली जाऊ शकते.

**पाम ट्री :** पाम ट्री चे काही प्रकार इनडोअर प्लांट म्हणूनही वापरता येतात. उदाहरणार्थ : चायनीज फॅन पाम, अरीका पाम, पार्लर पाम, पोनीटेल इत्यादी. हे झाड उन्हात कोठेही ठेवता येते. याने घरात दाट हिरवळ आणता येते.

**इनडोअर प्लांट्स :**

| अ.क्र. | आकृती फोटो | झाड |
|---|---|---|
| १. |  | स्पायडर प्लांट |
| २. |  | लेडी स्लीपर ऑरकीड |
| ३. |  | तुळस |
| ४. |  | कोरफड |
| ५. |  | ड्रॅकीना |
| ६. |  | विपींग फीग |
| ७. |  | स्नेक प्लांट |
| ८. |  | पाम ट्री |

## ९.३ किचन गार्डन (परसबाग) :

आजकाल बहुतेक कुटुंब पोषक आणि सकस घटकांनी युक्त असा आहार घेण्यावर भर देतात. किचन गार्डन ज्याला 'भाज्यांचा बगिचा' असेही म्हटले जाते. याने आपण सहज चांगल्या प्रतीचे जेवण तयार करू शकतो.

**व्याख्या :**

कीचन गार्डनची व्याख्या या प्रमाणे : ''अशी जागा जेथे स्वयंपाकघरात वापरण्यात येणाऱ्या भाज्या, फळे आणि सेवन करण्यास उपयोगी वनस्पती (Herb ) याची लागवड केली जाते.''

### संकल्पना आणि मार्गदर्शक सूचना :

व्यक्तीला स्वत: लावलेल्या ताज्या भाज्यांचा आणि ते बागेतून घेण्याचा आनंद अनुभवता येतो. अशा सेंद्रिय भाज्यांमुळे कुटुंबाचे आरोग्य सुधारते. कीचन गार्डनचे महत्त्व बऱ्याच प्रमाणात आहे. यामुळे कमी किमतीत ताज्या भाज्या नेहमी मिळतात. जी पोषणाची मुख्य बाब आहे. हिरव्या भाजीपाल्यांमध्ये जीवनसत्त्वे आणि खनिजे असल्याने ते रोगप्रतिकार शक्ती वाढवतात. कीचन गार्डनमुळे अन्नाच्या तुटवड्याचा प्रश्नही सुटतो.

**विचार करा :**

परसबागेचे महत्त्व.

- हे उत्तम प्रतीचे पोषक अन्न पुरविते.
- तुमच्या किचन गार्डनमधील भाज्या आणि फळांची लागवड आणि वाढ तुम्ही सहज करू शकता.
- स्वयंपाक घरातील सेंद्रिय कचऱ्यातून खत निर्माण केल्याने प्रदूषण कमी होऊन पर्यावरणाशी मित्रत्व साधता येते.
- येथे घरातील अबाल वृद्धांना एकत्र वेळ घालविता येतो.
- घरातील लहान मुलांचे भाज्या खाण्याचे प्रमाण वाढते.
- जमिनीवर काम करण्याची संधी मिळते तसेच क्षेत्रीय हवामानाबद्दल शिकता येते.
- किचन गार्डनमध्ये काम केल्याने कुटुंबातील सदस्यांमध्ये निसर्गप्रेम निर्माण होते. निसर्ग संवर्धन करणे आणि जीवनावर प्रेम करणे याचाही अनुभव येतो.
- किचन गार्डन पैसा वाचवण्यास मदत करते. कमी खर्चात तुमच्या आवडीची फळे, भाज्या, वनस्पती (Herb ) तुम्हाला लावता येतात. ज्या बाजारात महाग मिळतात.
- हवा शुद्ध ठेवण्यास मदत करतात. हवेतील कार्बन डायऑक्साइड घेऊन उपयुक्त प्राणवायू देतात.
- किचन गार्डनमुळे हवामान थंड राहून घरात थंड वारा येतो.
- घरात चैतन्यमय वातावरण निर्मिती होते कारण सुंदर बाग आणि त्यातील फुलझाडे घरातील सर्वांनाच प्रफुल्लित/आनंदी करतात.
- भाज्या आणि फळांची साले खत निर्मितीच्या कामात येतात.
- किचन गार्डनमधील फळे व भाज्या जास्त चविष्ट असतात.

**नेहमी लक्षात ठेवा :**

किचन गार्डनसाठी मार्गदर्शक सूचना :

- बीजारोपण किंवा झाडांची लागवड करण्यासाठी मोठी मोकळी जागा जेथे उत्तम सूर्यप्रकाश जास्त वेळ असतो अशा जागेची निवड करावी. उंच झाडांमुळे सूर्यप्रकाश अडतो.
- जास्तीत जास्त सूर्यप्रकाशासाठी उत्तर ते दक्षिण रांगा मध्ये लागवड करावी.
- पाण्याच्या गरजा लक्षात घ्याव्या. पाण्याचा पुरवठा जवळपास असावा. पावसाचे पाणी साठविण्याचा प्रयत्न करावा.
- बगिचा लावण्यासाठी झाडांऐवजी बियाणांचा वापर करावा.
- कुटुंबाच्या गरजा पुरवण्याच्या दृष्टीने झाडांची निवड करण्यासाठी बाजाराचे सर्वेक्षण करावे.
- औषधी वनस्पती (herb ) जास्त प्रमाणात वाढवल्यास त्या वाळवून नंतर त्याचा उपयोग करता येतो.

### किचन गार्डनमध्ये सर्वसाधारणपणे वाढवण्यात येणारी झाडे :

टोमॅटो, बटाटा, मुळा, मटार, गाजर, पालक, मेथी, मिरच्या, लिंबू, आले, पत्ताकोबी, फुलकोबी, पपई इत्यादी.



९.३ (अ) : परसबागेत वाढवण्यात येणाऱ्या भाज्या

**नेहमी लक्षात ठेवा :** परसबागेसाठी सूचना.



भरपूर सूर्यप्रकाश



खतांचा वापर



बाग कुंड्यामध्ये/जमिनीवर करणे



पेरणी केव्हा करायची.



ऋतूतील फुले

आकृती ९.३ (ब) परसबागेसाठी सूचना




आकृती ९.३ (क) बागेत वापरली जाणारी अवजारे

**इंटरनेट माझा मित्र आहे.**
**बागेत वापरल्या जाणाऱ्या अवजारांचे उपयोग इंटरनेटच्या मदतीने शोधून काढा.**

## आठवू शकता का?

- लँडस्केप आणि बगिच्याने घराभोवतीचा परिसर सुंदर बनतो.
- लँडस्केप आणि बगिच्यात पूर्ण कुटुंबाचा एकत्र वेळ चांगला जातो.
- बागकाम केल्याने शरीर निरोगी आाणि सशक्त राहते.
- लँडस्केप गार्डन आणि परसबागेमुळे घराभोवतालची हवा शुद्ध राहण्यास मदत होते.
- इनडोअर आणि आऊटडोअर प्लांट्स यातील फरक मुख्यत्वे तापमान सहनशक्तीवर ठरतो.
- किचन गार्डनमुळे उत्तम प्रतीच्या भाज्या व फळे मिळतात आणि पैशाची बचत होते.

## स्वाध्याय

- **वस्तुनिष्ठ प्रश्न :**

**१) दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्याय निवडा.**

१. गुलमोहर हे – झाड आहे.
अ) आऊटडोअर
ब) इनडोअर
क) झुडूप

२. खनित्र हे – आहे.
अ) झाड
ब) अवजार
क) मातीचा प्रकार

३. – यात औषधी गुण आहेत.
अ) पाम ट्री
ब) ऑर्चीड
क) तुळस

४. उंच झाड हवामानाचे तापमान – – टक्क्याने कमी करते.
अ) १००%
ब) ७०%
क) १०%

- **लघुत्तरी प्रश्न :**

**१) टिपा लिहा.**

अ. लँडस्केप

ब. किचन गार्डन (परसबाग)

क. किचन गार्डनमध्ये काम केल्याने आरोग्यास होणारे फायदे

**२) थोडक्यात उत्तरे लिहा.**

अ. बागकामातील अवजारांची यादी करा.

ब. कोरफड का महत्त्वाची आहे? ती घरात का ठेवावी हे स्पष्ट करा.

**३) व्याख्या लिहा.**

अ. लँडस्केपिंग ब. किचन गार्डन (परसबाग)

क. इनडोअर प्लांट्स ड. आऊटडोअर प्लांट्स

- **दीर्घोत्तरी प्रश्न :**

अ. किचन गार्डनसाठी मार्गदर्शक सूचना लिहा.

ब. इनडोअर आणि आऊटडोअर झाडे उदाहरणासह स्पष्ट करा.

क. परसबागेत कोणत्या फळांची आणि भाज्यांची लागवड होऊ शकते? त्याची मदत कशी होते?

**इंटरनेट माझा मित्र आहे.**

**प्रकल्प - अ) सुंदर लँडस्केप आणि किचन गार्डन याचे स्क्रॅपबुक (कात्रणांची वही) तयार करा.**

**लँडस्केप आणि परसबागेची छायाचित्रे शोधून त्याचे छापील प्रत काढा.**

अ) शाळा/महाविद्यालयात समूह प्रकल्पात किचन गार्डन तयार करा.

ब) जवळील झाडांच्या नर्सरीला किंवा किचन गार्डनला भेट द्या. तेथील इनडोअर, आऊटडोअर झाडांचे निरीक्षण करून अहवाल लिहा.

# १०. गृहस्वच्छता

१०.१ अर्थ, महत्त्व व गृहस्वच्छतेचे प्रकार.

१०.२ गृहस्वच्छतेसाठी उपयोगात येणारी उपकरणे.

१०.३ स्वच्छताकारक रासायनिक घटक

**चला चर्चा करू या :** घर हे आपल्या कौटुंबिक जीवनाचा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. कोणत्याही प्रकारच्या घराला विशिष्ट प्रकारची काळजी आणि सुव्यवस्थेची आवश्यकता असते. गृहस्वच्छता ही घराच्या काळजीसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. गृहस्वच्छता ही एक महत्त्वाची प्रक्रिया आहे. ज्याला बराच वेळ व प्रयत्न लागतो.

## १०.१ व्याख्या आणि अर्थ :

**जे. पी. शेरी यांच्या मते गृहस्वच्छतेची व्याख्या :**
**'सौंदर्य आणि आरोग्य प्राप्त करण्यासाठी गृहस्वच्छता हा अतिशय सोपा मार्ग आहे.'**

घरातील अनावश्यक गोष्टी उदा. धूळ, घाण यांचा नाश करण्यासाठी स्वच्छता ही एक प्रक्रिया आहे. वेगवेगळ्या स्वच्छतेच्या प्रक्रियांचा आणि तंत्रांचा उपयोग करून सौंदर्य आणि स्वास्थ्य साध्य करता येते.


शेरीच्या मतानुसार गृहस्वच्छता हा सर्वांत सोपा मार्ग आहे. सौंदर्य आणि स्वास्थ्य प्राप्त करण्यासाठी खालील चर्चेवरून गृहस्वच्छतेचे महत्व विशद होईल.

**नेहमी लक्षात ठेवा :**

- स्वच्छता आणि आरोग्य यांचा घनिष्ठ संबंध आहे. आजार हे जिथे धूळ व घाण असते तिथे लवकर पसरतात. रोगांचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी प्रत्येक खोलीची स्वच्छता होणे महत्त्वाचे आहे.
- स्वच्छता ही घराचे सौंदर्यात्मक मूल्य वाढविते. प्रत्येक वेळेस महागड्या वस्तूच घराच्या सौंदर्याचे महत्त्व वाढवत नसतात, तर दुसऱ्या बाजूने कमी किमतीच्या पण स्वच्छ वस्तू यांची योग्य मांडणी केल्यास सौंदर्यात भर पडते.
- वारंवार केलेल्या स्वच्छतेमुळे घर व्यवस्थित राहण्यास मदत होते. चांगल्या व्यवस्थापनामुळे घराचे आयुष्य वाढते. तसेच घरात राहण्यास घर उपयुक्त होते.
- स्वच्छतेमुळे घरातील वस्तू सुव्यवस्थितरित्या ठेवण्यास मदत होते.
- स्वच्छतेचे परिणाम हे दृष्टीस पडतात. स्वच्छ घर हे पाहण्याऱ्या व्यक्तीच्या मनावर प्रभाव पाडते. ज्यामुळे सामाजिक स्तर उंचावण्यास मदत होते.
- स्वत:चे घर स्वच्छ अणि सुंदर ठेवल्यामुळे घरातील सदस्याला समाधान आणि आनंद प्राप्त होतो.

**तुम्हाला माहीत आहे काय?**

गृहस्वच्छतेचे प्रकार.



**१) दैनिक स्वच्छता :** दैनंदिन स्वच्छतेत घर झाडणे, फरशी पुसणे, धूळ साफ करणे, खोलीमधील वस्तूंची मांडणी करणे, गालिच्यांची ब्रशच्या सहायाने स्वच्छता, पडदे झटकणे, बिछाने व्यवस्थित करणे इ. गोष्टींचा समावेश होतो. स्वयंपाक खोलीतील स्वयंपाक करण्याचा ओटा (पृष्ठभाग), सिंक दररोज स्वच्छ करणे आवश्यक आहे. जर घर हे मुख्य रस्ता किंवा धूळीच्या जागी असल्यास घर दिवसातून किमान दोनदा झाडायला हवे तसेच फर्निचर झटकायला हवे.

**२) विशिष्ट कालांतराने केलेली स्वच्छता :** यामध्ये खालील पद्धतीचा समावेश होतो :

अ) साप्ताहिक ब) पाक्षिक क) मासिक

ड) वार्षिक इ) प्रासंगिक स्वच्छता

**अ) साप्ताहिक स्वच्छता :** आठवड्यातून एकदा केलेल्या स्वच्छतेला साप्ताहिक स्वच्छता म्हणतात. रविवार किंवा कोणत्याही सुट्टीच्या दिवशी अशी स्वच्छता करणे सोईस्कर असते. ही स्वच्छता दैनिक स्वच्छतेपेक्षा अधिक व्यापक स्वरूपाची आहे. उदा. खिडक्यांची स्वच्छता दरवाज्यांचा पल्यांची स्वच्छता, अंगण, स्वयंपाक घर, शीतकपाट, वऱ्हांडा, गॅरेज इ. स्वच्छता साप्ताहिक स्वच्छतेत मोडली जाते.

**ब) पंधरवाडी/पाक्षिक स्वच्छता :** पंधरा दिवसातून एकदा केलेल्या स्वच्छतेला पाक्षिक/पंधरवाडी स्वच्छता म्हणतात. पाक्षिक स्वच्छता ही घर निटनेटके ठेवण्यासाठी खूप गरजेची आहे. यामध्ये अलमाऱ्या हलविणे, फर्निचरला धूळमुक्त करणे, जाळे काढणे, भिंतींना व फरशीला साफ, स्वच्छ करणे इ. क्रियांचा समावेश होतो.

**क) मासिक स्वच्छता :** जी स्वच्छता आठवड्याने केली जाऊ शकत नाही ती स्वच्छता महिन्यातून एकदा केली जाते. उदा. पंख्याची स्वच्छता, ट्युबलाईटची साफसफाई, जाळे काढणे, शितकपाटांची स्वच्छता करणे, अलमाऱ्यांची पुर्नव्यवस्था करणे, पडद्यांची धुलाई करणे किंवा पडदे बदलणे इ. प्रकारची स्वच्छता महिन्यातून एकदा केली जाते.

**ड) वार्षिक स्वच्छता :** वार्षिक स्वच्छतेचा उद्देश घराला नवीन रूप प्राप्त करून देण्याचा असतो. यामध्ये घरातील रंगरंगोटी व सर्व खोल्यांचा स्वच्छतेचा समावेश होतो. हे कार्य घरातील फर्निचरची हलवाहलव करून व त्यांची पुन्हा व्यवस्थित मांडणी करून केली जाते. आवश्यकता भासल्यास जंतूनाशकांची फवारणी सुद्धा केली जाते.

साधारणत: वार्षिक स्वच्छतेला पूर्ण एक आठवडा लागतो. जर कुटुंबातील सदस्यांमध्ये कामाची विभागणी केली तर ते कार्य सहज व सोपे होते. साधारणत: हे कार्य दिवाळीच्या वेळेस केले जाते.

**इ) प्रासंगिक स्वच्छता :** प्रासंगिक स्वच्छता काही कुटुंबाकडून वाढदिवसानिमित्त किंवा लग्नाच्या वेळेस केली जाते.

**थोडे डोके चालवा :**

तुमच्या घरात उपयोगात येणाऱ्या पद्धतीचे निरिक्षण करून त्याचे वर्गीकरण करा.

| क्रिया | स्वच्छतेचे प्रकार |
|---|---|
| | दैनिक स्वच्छता |
| | |
| | |
| | |
| | प्रासंगिक स्वच्छता |
| | |
| | |

## १०.२ स्वच्छतेसाठी उपयोगात येणारी उपकरणे :

स्वच्छतेसाठी अनेक साधनांचा उपयोग केला जातो. यांची दोन प्रकारात विभागणी केली जाते.

दिलेल्या तालिकेनुसार साधनांची विभागणी करा.

| विजेवर चालणारी | विजेवर न चालणारी |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |




आकृती १०.२ : स्वच्छतेसाठी उपकरणे

**विजेवर न चालणारी उपकरणे/विद्युतरहित उपकरणे :**

**१) झाडू (Brooms) :** सर्व साधारणत: हे स्वच्छतेसाठी उपयोगात येणारे महत्त्वाचे साधन आहे. बाजारात विविध आकाराचे, विविध लांबीचे व विविध साहित्यापासून बनविलेले झाडू उपलब्ध आहेत. ते मुख्यत: वाळलेल्या फांद्यांपासून, प्लास्टिक वायरपासून किंवा काड्यांपासून व ताडाच्या पानांपासून बनलेले असतात. त्यांचा उपयोग अंगण, फरशा आणि जिन्याच्या पायऱ्यांवरील धूळ साफ करण्यासाठी होतो. काड्यांचा झाडूचा उपयोग बाथरूम धुण्यासाठी व स्वच्छ करण्यासाठी होतो. झाडूंना लहान किंवा लांब मुठ असते. लांब मुठीचा झाडू हा उपयोग करण्यास अधिक सोयीस्कर आणि चांगला असतो.

**२) ब्रश (Brushes) :** हे विविध लांबीचे, आकाराचे, वेगवेगळ्या साहित्यापासून बनलेले असतात. ब्रश हे धातू, प्लास्टिक, नायलॉन, नारळाचे तंतू किंवा प्राण्यांच्या केसांपासून बनलेले असतात. त्यांचा उपयोग ओला किंवा कोरडा कचरा साफ करण्यासाठी केला जातो. कपडे, फरशी आणि टाईल्स स्वच्छ करण्यासाठी लांब मुठीचे व विविध आकाराचे ब्रश उपलब्ध आहेत. स्वच्छता केल्यानंतर कोरड्या ब्रशला झटकून ठेवायला हवे व ओल्या ब्रशला धुऊन ठेवायला हवे. ब्रश ठेवण्यासाठी योग्य व्यवस्था असायला हवी.

**३) डस्टर (Duster) :** डस्टर हा मजबूत कापसाच्या तंतूपासून बनलेला असतो आणि त्यांचा उपयोग वेगवेगळे पृष्ठभाग झाडण्यासाठी व साफ करण्यास होतो. प्रत्येक क्रियेसाठी वेगवेगळे डस्टर असणे आवश्यक आहे. उदा. : फर्निचर साफ करण्यासाठी, डायनिंग टेबल साफ करण्यासाठी, स्वयंपाक ओटा साफ करण्यासाठी, गॅस बर्नर स्वच्छ करण्यासाठी, भांडे, आरसे स्वच्छ करण्यासाठी व काचेचे भांडे साफ करण्यासाठी इत्यादी. प्रत्येक प्रकारच्या कामासाठी वेगवेगळ्या डस्टरचा उपयोग करायला हवा.

आयते (तयार) डस्टर हे प्रत्येक प्रकारच्या आकारात व लांबीत उपलब्ध आहेत. प्रत्येक प्रकारच्या डस्टरला स्वच्छ करणे आवश्यक असते. ते स्वच्छ नसल्यास कुठलाही पृष्ठभाग साफ करून शकणार नाही.

**४) पुसणे (Mopper) :** पुसण्याचे कापड हे एक प्रकारचे स्वच्छतेचे साधन आहे. जे विशिष्ट प्रकारच्या फरशा स्वच्छ करण्यासाठी उपयोगात आणले जाते. हे कापड जाडसर पण सैल विण असलेले आणि पाणी शोषून घेणाऱ्या तंतूपासून बनलेले असते. खोली पुसण्यासाठी स्वच्छ पाण्याचा उपयोग करावा. प्रत्येक खोली पुसल्यानंतर पाणी बदलावे. तसेच बाजारपेठेत उपलब्ध स्वच्छता द्रव्यांचा वापर करावा.

आज (आयते) तयार पुसणे हे वेगवेगळ्या साहित्यामध्ये आणि वेगवेगळ्या आकाराच्या मुठी असलेले उपलब्ध आहेत. हे जास्त जागा व्यापून घेतात. जे अधिक परिणामकारक, उपयोग करण्यास सोपे आणि अधिक काळ टिकणारे असतात.

**५) सुपली :** सुपली ही विविध पदार्थांपासून बनलेली असते. उदा. प्लास्टिक, स्टील, लोखंड इ. परडीचा उपयोग खोली स्वच्छ केल्यानंतर कचरा जमा करण्यासाठी

होतो. सुपलीचा समोरचा भाग हा जमिनीला स्पर्श करायला हवा. ज्यामुळे त्यात धूळ सहज जमा करता येईल. सुपलीच्या कडा खूप तीक्ष्ण नसाव्यात.

६) **कचरापेटी (Dustbin) :** याचा उपयोग संपूर्ण घरातील धूळ आणि कचरा गोळा करण्यासाठी होतो. एखादी जुनी बकेट किंवा पेटी यांचाही उपयोग हा उद्देश साध्य करण्यासाठी होतो. परंतु आज विविध आकाराचे व वेगवेगळ्या रंगाच्या (डस्टबीन) कचरापेटी बाजारात उपलब्ध आहेत.

कचरापेटी ही घरात विविध जागी ठेवली जाऊ शकते. घरात दोन कचरापेटी असणे अतिशय उपयुक्त आहे. ओला व कोरडा कचरा ठेवण्यासाठी याचा उपयोग केला जातो. याचा उपयोग झाल्यावर याला स्वच्छ करून ठेवायला हवे.

### निर्वात स्वच्छतक (व्हॅक्यूम क्लिनर) :

**तुम्हाला माहीत आहे?**
**याचे कार्य कशाप्रकारे आहे :**

हे यंत्र निर्वात पोकळी निर्माण करण्याच्या तत्त्वावर कार्य करते. पोकळी म्हणजे पूर्णपणे रिकामी जागा ज्यामध्ये हवेला सुद्धा जागा नसते. हवेची पोकळी निर्माण करावी लागते. हवा निर्वात (रिकाम्या) जागेकडे नेहमीच आकर्षिली जाते. कारण निसर्ग एकही रिकामी जागा सोडत नाही. हे यंत्र पूर्ण पोकळी निर्माण करण्याच्या तत्त्वावर आधारित आहे.

- **सिद्धांत :** निर्वात स्वच्छतक हे यंत्र कृत्रिमरित्या पूर्ण पोकळी निर्माण करण्याच्या सिद्धांतावर कार्य करते. हे यंत्र ज्या पृष्ठभागाची स्वच्छता करावयाची आहे. तिथुन पूर्ण हवा शोषून घेते. ही प्रक्रिया अतिशय वेगाने हवा शोषून घेते. धूळ आणि लहान ओले कण या यंत्रातील एका बाजूला जमा होते.
- **निर्वात स्वच्छतकाचे भाग :** वेगवेगळ्या प्रकारच्या निर्वात स्वच्छतकामध्ये काही मुख्य भाग हे एकसारखे पहायला मिळतात.
- **मुख्य भाग :** हा मशीनचा असा भाग आहे ज्यामध्ये यंत्राला आवश्यक असणारे सर्व भाग विशिष्ट ठिकाणी लावलेले असतात. हे क्रोमीअम धातूपासून बनलेले असते आणि वरील आवरण रबराचे असते. मुख्यत: खालच्या बाजूला चाके असतात. ज्यामुळे यंत्राला एका जागेवरून दुसऱ्या जागेवर हलवण्यास मदत होते.
- **मूठ :** हा भाग यंत्राला उचलण्यास व हलविण्यास मदत करतो. हा धातू किंवा रबराचा बनलेला असतो.
- **बटण :** निर्वात स्वच्छकाद्वारे स्वच्छता करताना व्यक्तीचा हात मूठ किंवा नळाचे तोंड (नोझल बार)ला पकडून असतो. यामुळे मशीनमध्ये बटणे अशा ठिकाणी लावली जातात की जी पायाद्वारे सहजरित्या चालू-बंद होऊ शकतात.
- **विद्युत मोटर व पंखा :** यंत्रातील पंखा सुरू करण्यासाठी एका विद्युत मोटारीची आवश्यकता असते. हा पंखा मोटारीच्या मागच्या बाजूला बसवलेला असतो. हा पंखा हवा शोषून घेण्याचे कार्य करते आणि अतिशय वेगाने हवा शोषून पोकळी निर्माण करण्याचे कार्य करते.
- **पिशवी :** जी हवा व धूळ पंख्याद्वारे शोषली जाते ती एका पिशवीत जमा होते. ही पिशवी सछिद्र कापडाची बनलेली असते. ही पिशवी धूळ साठवून ठेवते पण शोषलेली हवा बाहेर फेकते. या पिशवीला वेळोवेळी रिकामी आणि स्वच्छ करावी लागते. या पिशवीमध्ये खूप कचरा जमा झाल्यास ती बदलावी लागते.
- **नळीची तोटी :** हा मशीनचा अधिक अमलात (उपयोगात) येणारा भाग आहे. वेगवेगळे पृष्ठभाग स्वच्छ करण्यासाठी व हवा शोषुन घेण्यासाठी यंत्रात वेगवेगळ्या प्रकारच्या व आकाराच्या नळीच्या तोट्या (नोझल्स्) बसवतात. या नळीच्या तोंडाचा संबंध प्रत्यक्षात स्वच्छ करण्यात येणाऱ्या पृष्ठभागाशी येतो.
- **पाईप :** हा एक जाड व पोकळ पाईप असतो. त्याचे एक टोक मशीनला तर दुसरे टोक तोटीला (नोझलला) जोडलेले असते. शोषून घेतलेली हवा व धूळ याच पाईपद्वारे पिशवीत जमा होते. जास्तीत जास्त मशीनमध्ये एकापेक्षा अधिक नळ्या असतात. त्यांची लांबी व आकार वेगवगळे असतात. हे सर्व जवळचा किंवा दूरवर पोहोचू न शकणारा पृष्ठभाग स्वच्छ करण्यास सोयीस्कर व्हावे म्हणून लावले जाते.
- **वायर :** विद्युत रोधक योग्य लांबीची वायर मशीनला जोडलेली असते. त्याच एक टोक मशीनला व दुसरे टोक प्लगमधून विद्युत पुरवठ्याला जोडलेले असते.

## निर्वात स्वच्छतक उपयोगात आणण्याच्या पद्धती :

**हे लक्षात ठेवा :**

- स्वच्छतेचे कार्य सुरू करण्यापूर्वी योग्य नळीच्या तोटी (नोझल्स) ची निवड करावी.
- यानंतर निर्वात स्वच्छतकाला विद्युत पुरवठ्याशी जोडावे.
- स्वच्छतेच्या प्रकारानुसार मशीनच्या गतीवर, मशीनला दिलेल्या बटणाद्वारे नियंत्रित केले जाते.
- हे यंत्र नळीच्या तोटीद्वारे (नोझल) धूळ व घाण शोषून घेते.
- वेगवेगळ्या प्रकारच्या स्वच्छतक मशीनमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या नोझलची व्यवस्था केली जाते. ज्यामुळे (मशीन) नळीच्या तोंटीतून वाहणारी हवा वेगवेगळ्या पृष्ठभागाला चांगल्या पद्धतीने स्वच्छ करते.
- सध्या बाजारात ओला आणि सुका (कोरडा) कचरा स्वच्छ करणारे निर्वात स्वच्छतक उपलब्ध आहेत.
- ओले निर्वात स्वच्छतक फरशी, टॅन्क, पाण्याच्या टाक्या, स्वच्छ करतात.
- पृष्ठभाग स्वच्छ केल्यानंतर मशीन बंद करावे.
- सर्वच पृष्ठभाग योग्य नळीच्या तोटीने व नळ्यांचा उपयोग करून सारख्याच पद्धतीने स्वच्छ केला जातो.
- स्वच्छता केल्यानंतर विद्युत पुरवठा बंद केल्या जातो.
- नळीच्या तोटीने व नळीला मशीनपासून वेगळे केले जाते.
- आतील पिशवी रिकामी करून स्वच्छ केली जाते.
- मशीनचे सर्व भाग वेगवेगळे केल्यानंतर ते योग्य ठिकाणी झाकून ठेवले जातात.

## निर्वात स्वच्छतकाची काळजी :

**निरीक्षण आणि चर्चा करा :**

- निर्वात स्वच्छतकाचा उपयोग करण्यापूर्वी सर्व सूचना निट वाचून आणि समजून घ्याव्या. मशीनचा उपयोग करताना तोटी (नोझलला) शरीरापासून, केसांपासून व कापडापासून दूर ठेवायला हवे.
- व्यक्तीने ओल्या हाताने मशीनला स्पर्श करू नये.
- जर वायर कापली गेलेली किंवा तुटलेली असेल तर त्वरित बदलावी.
- स्वच्छता पूर्ण झाल्यावर विद्युत पुरवठा बंद करायला हवा आणि यंत्राला विद्युत पुरवठ्यापासून दूर ठेवायला हवे.
- पिशवी धुळीने भरली असल्यास तिला स्वच्छ करायला हवे.
- मशीनद्वारे नखे, पीन किंवा एखादी टोकदार वस्तू शोषून घेतल्यास पिशवी फाटू शकते म्हणून तिची काळजी घेणे गरजेचे असते.
- मशीनला लहान मुलांपासून दूर ठेवायला हवे.

## १०.३ स्वच्छता करणारे रासायनिक घटक :

**समजून घ्या :**

स्वच्छता करणारे साधन (घटक) हे द्रवरूपात, पावडर किंवा फवाऱ्याच्या स्वरूपात उपलब्ध असतात. त्याचा उपयोग पृष्ठभागावरिल घाण स्वच्छ करण्यासाठी, धूळ आणि रंग साफ करण्यासाठी होतो.

याचा मुख्य उद्देश स्वास्थ्य व सुंदरता टिकविण्यासाठी होतो. याचा उपयोग घातक उग्र वास नष्ट करण्यासाठी आणि धूळ व कचऱ्याच्या प्रदूषणावर प्रतिबंध करण्यासाठी होतो. ज्या उग्र वासामुळे धूळ व घाणीमुळे सभोवतालचे वातावरण बिघडते.

वेगवेगळ्या साधनांच्या व्यतिरिक्त वेगवेगळ्या प्रकारच्या स्वच्छताकारकांची स्वच्छतेसाठी आवश्यकता असते. महत्त्वाचे काही स्वच्छताकारक घटक खालील प्रकारे आहेत.

**तुम्ही सांगू शकता ?**
**खालील दिलेल्या स्वच्छता द्रव्यांव्यतिरिक्त :**

महत्त्वाची द्रव्ये/पदार्थ :

- **पाणी :**
  १. नैसर्गिकरित्या पाणी दोन प्रकारे उपलब्ध असते. मृदु पाणी आणि कठीण पाणी.
  २. सामन्यत: पाणी स्वच्छतेसाठी उपयोगात येणारा महत्त्वाचा मुख्य घटक आहे.
  ३. ओली स्वच्छता ही पाण्याशिवाय होऊ शकत नाही.

४. पाणी हे सार्वत्रिक उपलब्ध द्रव्य आहे. त्यात सर्व धूळ व घाण विरघळू शकते.

- **साबण :** साबणाचा उपयोग घरगुती भांडी स्वच्छ करण्यासाठी होतो. याचे प्रमुख दोन प्रकार आहेत. **द्रवरूप आणि वडीच्या रूपात.** आजकाल त्याच्यामध्ये काही सुवासिक द्रव्य मिळसले जातात. साबणाचा उपयोग कपडे धुण्यासाठी सुद्धा होतो.
- **डिटर्जंट (Detergent) :** हे मुख्यत: भुकटीच्या स्वरूपात तसेच द्रव्यरूपातही उपलब्ध असते. त्यांचा उपयोग मुख्यत: कपडे धुण्यासाठी होतो. याच्यामध्ये काही प्रमाणात तंतूंना शुभ्र करण्याचे रसायन, पांढऱ्या कपड्यांना अधिक शुभ्र करण्यासाठी वापरले जाते. डिटर्जंटमध्येसुद्धा काही सुवासिक द्रव्ये मिसळली जातात. डिटर्जंटचा उपयोग सर्व प्रकारची घाण स्वच्छ करण्यासाठी होतो. उदा. तेल, अन्न, गोड पदार्थ, रक्त किंवा कोणताही डाग इ.

वेगवेगळ्या प्रकारच्या स्वच्छतेसाठी बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे डिटर्जंट उपलब्ध आहेत. यामध्ये विशिष्ट प्रकारचे रसायन मिसळले जाते. उदा. ब्लिचींग पावडर (शुभ्रताकारक घटक) फोम स्थिरावणारा घटक, यांचा उपयोग करताना दिलेल्या सूचनांना काळजीपूर्वक वाचायला पाहिजे आणि त्यानुसार त्यांचा उपयोग काटेकारपणे करायला हवा.

- **जंतुरोधक द्रव्य :** घरातील प्रत्येक सदस्यांना रोगमुक्त ठेवणे हा घर मालकाचा मुख्य उद्देश असतो. सर्व जंतुनाशके आणि फिनोलिक पदार्थ सर्व जंतूंना आणि सूक्ष्म जीवांना नष्ट करतात. बाथरुम तसेच किचन मधील पृष्ठ भागावरील जंतू नष्ट करतात. म्हणून स्वास्थ्याच्या दृष्टिकोनातून सर्व जंतूनाशके महत्त्वाची आहेत.

## सामान्य साहित्याला स्वच्छ करण्याची पद्धती व स्वच्छताकारक घटक/द्रव्य :

**नेहमी लक्षात ठेवा :**

| अ. क्र. | पदार्थ / वस्तू | पद्धती व घटक/द्रव्य | |
|---|---|---|---|
| | | हे करा | हे करू नका |
| १. | स्टेनलेस स्टील | पाणी व साबण | खरखरीत/तारेच्या घासणीचा उपयोग |
| २. | पितळं | चिंच आणि मीठ, लिंबू किंवा व्हिनेगर, पितळं चमकविण्यासाठी द्रव्य पावडर | फक्त पाणी आणि साबण |
| ३. | लोखंड | चिंच किंवा लिंबू सोबत घासणीने घासणे | ओले राहील असे न ठेवणे |
| ४. | तांबे | चिंच व लिंबू सोबत मीठ, पावडर | फक्त साबण आणि पाणी |
| ५. | अल्युमिनियम | गरम पाणी आणि साबण, लिंबू किंवा व्हिनेगर, जर गंजले असेल तर | फक्त साबण आणि पाणी |
| ६. | मातीचे भांडे | साधे पाणी | स्टीलच्या घासणीचा वापर |
| ७. | चांदी | रीठा, दंतमंजन, चांदीला (पॉलीश) चमकविण्यासाठी | राख आणि विटांचा चुरा |
| ८. | चिनी मातीची भांडी | गरम पाणी आणि साबण | राख आणि विटेचा चुरा |
| ९. | प्लास्टिक वस्तू | साबण आणि पाणी, जर चिकट किंवा ओले असल्यास मीठ, रॉकेल, तेलाचा उपयोग करणे आणि हवेशीर ठेवणे | स्टीलच्या घासणीचा वापर करू नये. |
| १०. | काचेचे भांडे, ओव्हनचे भांडे व महाग भांडे | साबण डिटर्जंट डाग न पडू देणारे स्वच्छताकारक घटक | अमोनिया आणि सोडा वापरू नये. |

## तुम्ही पुन्हा आठवू शकता ?

- गृहस्वच्छता ही वातावरणाला स्वच्छ व निरोगी ठेवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा भाग आहे.
- स्वच्छता धूळ नष्ट करण्यासाठी अणि आरोग्य टिकविण्यासाठी मदत करते.
- स्वच्छतेमुळे घराला सुव्यवस्था आणि सुंदर स्वरूप प्राप्त होते यामुळे घरातील सदस्यांचे स्वास्थ्य सुदृढ राहण्यास मदत होते.
- स्वच्छतेचे दोन भागात वर्गीकरण केले आहे.
  अ) दैनिक स्वच्छता ब) कालांतराने केलेली स्वच्छता
- स्वच्छतेची उपकरणे दोन भागात विभागली जातात.
  अ) विजेवर चालणारी ब) विजेवर न चालणारी (विद्युतरहित)
- स्वच्छताकारक घटक जसे पाणी, साबण, पावडर (deterg nt) जंतूरोधक द्रव्य इ. हे घटक गृहस्वच्छतेसाठी अतिशय उपयुक्त आहे.

## स्वाध्याय

- **वस्तुनिष्ठ प्रश्न :**

**१) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. दर पंधरा दिवसांनी करण्यात येणाऱ्या स्वच्छतेला – म्हणतात.

अ) दैनिक

ब) मासिक

क) पाक्षिक/पंधरवाडी

२. लग्नसोहळा अशा प्रसंगी जी स्वच्छता केली जाते तिला – – म्हणतात.

अ) कालांतराने केलेली

ब) मासिक

क) प्रासंगिक

३. कापड अधिक परिणामकारकरित्या स्वच्छ करण्यासाठी – – याचा उपयोग करतात.

अ) साबण

ब) डिटर्जंट

क) बील्ट सोप.

**२) खालील विधाने चूक/बरोबर ते लिहा.**

१. स्वच्छता आणि आरोग्य यांचा घनिष्ठ संबंध आहे.

२. स्वच्छतेची विद्युत उपकरणे महाग असतात.

३. साप्ताहिक स्वच्छता ही दैनंदिन स्वच्छतेपेक्षा अधिक व्यापक असते.

४. स्वयंपाक खोली व जेवणाचे टेबल पुसण्याची पुसणी वेगळी असावी.

५. लांब मूठ असलेला झाडू हा लहान मूठ असलेल्या झाडूपेक्षा वापरण्यास अधिक उपयुक्त आहे.

६. चांगल्या स्वच्छतेसाठी प्रत्येक खोली पुसल्यानंतर पाणी बदलणे आवश्यक आहे.

- **लघुत्तरी प्रश्न :**

**१) खालील नमूद केलेल्यांची कारणे द्या.**

१. स्वच्छता ही घराचे सौंदर्यात्मक मूल्य वाढविते.

२. स्वच्छता आणि स्वास्थ्य यांचा घनिष्ठ संबंध आहे.

३. वार्षिक स्वच्छतेचा मुख्य उद्देश घराला नवीनता प्रदान करण्याचा असतो.

४. घरी कमीत-कमी दोन कचरापेटी असणे आवश्यक आहे.

**२) फरक स्पष्ट करा.**

१. साबण - पावडर.

२. पुसणे - डस्टर

- **दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. गृह स्वच्छतेचा अर्थ सांगून, दैनंदिन स्वच्छतेचे आपल्या जीवनातील महत्त्व विशद करा.

२. गृहस्वच्छतेची व्याख्या लिहून, त्याचे प्रकार सविस्तर लिहा.

**संबंधित कृती, अतिशय सोप्या पद्धतीने स्वच्छताकारक घटक बनविणे :**

१) हात धुवायचे द्रव्यसाबण २) लादी पुसण्याचे स्वच्छताकारक ३) द्रव्य डिटर्जंट

१. तुमच्या घरातील स्वच्छतेची योजना तयार करा. त्याप्रमाणे दैनंदिन स्वच्छतेला लागणारा वेळ मोजा.

२. ग्रामीण व शहरी भागात स्वच्छता करण्यात येण्यासाठी उपयोगात येणाऱ्या उपकरणांची यादी करा.

३. वेगवेगळ्या प्रकारची स्वच्छता करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्वच्छतेच्या घटकांची यादी करा.

४. घरी स्वच्छताकारक घटक तयार करून त्यात वापरण्यात आलेले घटक आणि तयार करण्याची पद्धती लिहा.

❑❑❑

## संबंधित कृती

### प्रकरण २ : व्यवस्थापनाचे प्रेरक घटक

१) अ) स्व-मूल्यांकनाच्या पद्धतीचा उपयोग करून तुमच्या मूल्यांचे निरीक्षण करा व ओळखा.

ब) व्यक्तिगत स्वरूपामध्ये तुमच्यातील (तुमच्यामधील) विविध मूल्यांची सूची तयार करा.

क) आंतरिक व बाह्य मूल्यांचे निरीक्षण करून नोंद करा.

ड) कारणे देऊन हे तुमचे मूल्ये का आहे? या कृतींचे निकष लिहा.

२) अ) तुमच्या ध्येयांचे निरीक्षण करा व ओळखा.

ब) तुमच्यामधील व्यक्तिगत स्वरूपाची आणि विविध ध्येयांची सूची तयार करा.

क) व्यक्तिगतध्येय,सामूहिकध्येयआणिसवयीनुसार घेतलेल्या ध्येयांचे वर्गीकरण करा व ओळखा.

ड) व्यक्तिगत ध्येय, सामूहिक ध्येय आणि सवयीनुसार घेतलेले ध्येय असे ओळखण्याची कारणे देऊन कृतीचे निकष लिहा.

३) अ) कौटुंबिक स्तराचे निरीक्षण करा व ओळखा.

ब) विविध प्रकारच्या स्तरांची सूची तयार करा.

क) पारंपरिक, परिवर्तनशील व व्यक्तिगत स्तराचे वर्गीकरणाचे निरीक्षण करा व ओळखा.

ड) पारंपरिक, परिवर्तनशील व व्यक्तिगत स्तराचे वर्गीकरणाच्या कृतीचे कारण देऊन निकष लिहा.

४) अ)समाजात दिसणाऱ्या पारंपरिक/परिवर्तनशील/ व्यक्तिगत स्तर ओळखा.

ब) विविध प्रकारच्या स्तरांमध्ये त्यांचे वर्गीकरण करा.

क) समाजामध्ये या स्तराचे अनुकरण का बरे केले जाते याचे कारण ओळखा.

ड) कौटुंबिक स्तरामध्ये परिवर्तनाचे कारण लिहा.

### प्रकरण ३ : व्यवस्थापन प्रक्रिया

१) तुमच्या मित्र/मैत्रिणीचा वाढदिवस साजरा करण्यासाठी व्यवस्थापन प्रक्रियेचा उपयोग :

**अ) नियोजन :**

i) पार्टीसाठी तारीख, वेळ आणि जागा ठरवा

ii) कोणते मित्र/मैत्रिणी बोलवायचे याचा निर्णय घ्या.

iii) समूहातर्फे कोणती भेटवस्तू द्यायची याचा निर्णय घ्या.

**ब) नियंत्रण :**

i) ठरविलेली तारीख, वेळ आणि जागा सर्वांना सोयीची आहे का ते तपासून पहा.

ii) जर सोयीची नसेल तर इतर सदस्यांच्या बरोबर चर्चा करून बदल करा.

iii) तारीख, वेळ आणि जागा या बाबतीत सर्वांना सोयीस्कर असा नवा निर्णय घ्या.

**क) मूल्यांकन :**

i) पार्टीच्या यशस्वीतेचा आढावा घ्या.

ii) तारीख, वेळ आणि जागा या बाबतीत घेतलेला नवा निर्णय सर्वांसाठी चांगला ठरला का?

iii) भविष्यामध्ये यासारखा दुसरा समारंभ ठरवायचा असेल तर कोणत्या गोष्टी तुम्ही लक्षात ठेवाल?

### प्रकरण ४ : निर्णय घेणे

१) अ) कुटुंबामध्ये घेतलेले सवयीनुसार व बौद्धिक निर्णय निरीक्षण करून लिहा.

ब) कुटुंबामध्ये घेतलेल्या विविध निर्णयांचे निरीक्षण करून निर्णयाचे वर्गीकरण करा.

क) निर्णयाचे वर्गीकरण देऊन या निर्णयामध्ये बदलाव का झाला याचा निकष लिहा.

२) अ) समवयस्क मित्र/मैत्रिणींचे व्यक्तिगत वा सामूहिक निर्णयाचे निरीक्षण करून लिहा.

ब) जी सहजरित्या घेऊ शकतो त्यांची सूची तयार करा.

क) कोणत्या प्रकारचे निर्णय हे सहज घेता येतात त्याचे कारण व निकष लिहा.

## पाठ ५ : कौटुंबिक संसाधने

१) तुमच्या कुटुंबाजवळ उपलब्ध असलेल्या मानवीय आणि अमानवीय संसाधनांची यादी करा.

अ) कुटुंबाजवळ उपलब्ध संसाधनांचे निरीक्षण करा.

ब) निरीक्षण केलेल्या संसाधनांची यादी करा.

क) यादीतील संसाधनांचे वर्गीकरण करा.

ड) संसाधनांची उपयुक्तता आणि अंतर्गत संबंध ओळखा.

२) तुमच्या शहरात उपलब्ध असलेल्या सामुदायिक सेवांचे निरीक्षण करून त्यांचा लोकांना होणाऱ्या उपयोगाचे पृथक्करण करा.

अ) तुम्हाला आणि तुमच्या कुटुंबाला उपलब्ध असलेल्या सामुदायिक सेवांचे निरीक्षण करा.

ब) निरीक्षण केलेल्या सामुदायिक सेवांची यादी करा.

क) उपलब्ध सेवांचा उपयोग व एकमेकांशी (अंतर्गत) नाते ओळखा.

ड) निष्कर्ष काढा.

## प्रकरण ६ : कुटुंबाचे निवासस्थान

१) तुमच्या घराजवळच्या भागामधील विविध घरांचे निरीक्षण करा आणि त्यांच्यामधील साम्य आणि फरक लिहा.

| घर नंबर | प्रकार | इतर घरांबरोबरचे साम्य | फरकाचे मुद्दे |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| ५. | | | |
| ६. | | | |

२) इको फ्रेंडली घरांची चित्रे इंटरनेटवर शोधा. त्यामधील कमीत कमी पाच चित्रांच्या प्रिंट्स काढा आणि वहीमध्ये चिकटवा. खालीलप्रमाणे रकाने करून त्यामध्ये त्यांची निरीक्षण केलेली वैशिष्ट्ये लिहा.

| अ.क्र. | घटक | वर्णन |
|---|---|---|
| १. | बांधकामासाठी वापरलेले साहित्य | |
| २. | बगिचा | |
| ३. | प्रकाश योजनेची पद्धत | |
| ४. | पाणी पुरवठा योजना | |
| ५. | ड्रेनेज व्यवस्था | |
| ६. | घनकचरा विल्हेवाट व्यवस्था | |
| ७. | इतर | |

## पाठ ७ : घरातील फर्निचर

१) आधुनिक फर्निचरची चित्र गोळा करा.

अ) सर्व चित्रे फाईलमध्ये खोल्यांनुसार चिकटवा.

ब) चित्रांना नावे द्या.

क) प्रत्येक फर्निचरचा उपयोग आणि काळजी यासंबंधी लिहा.

२) विविध खोल्यांमध्ये फर्निचरची रचना दर्शविणारी चित्रे गोळा करा. चित्रात दिसून आलेल्या फर्निचर मांडणीच्या सर्वसाधारण तत्त्वांबद्दल थोडक्यात लिहा.

३) घरगुती पद्धतीने द्रव आणि घन लाकडी पॉलिश तयार करणे.

४) दुसऱ्या प्रकारचे घरगुती लाकडाचे पॉलिश तयार करा.


## पाठ ८ : पुष्परचना आणि सजावट


१) विविध प्रकारच्या पुष्परचना तयार करणे.

**साहित्य :** विविध प्रकारची फुले-पाने, पुष्पपात्र, घट्ट स्पंज (ओॲसिस), कात्री, रबर, टाचण्या, चिकटपट्टी.

**कृती :**


- आवश्यक असलेली फुले (जर्बेरा, गुलाब, निशिगंध, ग्लॅडिओलिया, ऑर्किड इत्यादी). ताजी, टवटवीत, अर्धवट उमललेली फुले निवडा.
- विविध प्रकारची, विविध आकाराची पाने निवडा.
- पानांना पुष्परचनेला साजेसा असा आकार द्या.
- पुष्पपात्रामध्ये घट्ट स्पंज (ओॲसिस) ठेवून तो पूर्ण भिजेल एवढे पाणी घाला.
- मोठी व गडद रंगाची फुले निवडून ती पुष्परचनेच्या केंद्रबिंदूस्थानी वापरा.
- पुष्परचना तयार करताना विषम संख्येत फुलांचा वापर करा.
- फुलांच्या मागे, आजूबाजूला पाने लावा.
- पाना फुलांच्या दांड्या सरळ नसतील, वाकलेल्या असतील तर त्यांना दुसऱ्या दांड्यांचा आधार देऊन चिकटपट्टीने सरळ करून घ्या.
- छोटी पाने, गवत यांचा वापर ओॲसिसला झाकण्याकरिता करा.
- पुष्परचना बरेच दिवस ताजीतवानी राहावी याकरिता मीठ, साखर, बोरॅक्स, तारीख उलटून गेलेल्या औषधी गोळ्या, बर्फाचे तुकडे, कोळसा यांपैकी कोणत्याही एकाचा वापर करा.
- पुष्परचना तयार झाल्यानंतर पुष्पपात्राखाली छोटी चटई (मॅट) ठेवा. पुष्परचनेच्या बाजूला दिवा, मेणबत्ती, रंगीत दगड, शंख, शिंपले, मोती यांचा वापर करता येतो.
- पुष्परचनेला अनुरूप नाव द्या.









२) विविध प्रकारच्या फुलांची, पानांची चित्रे गोळा करून वहीत चिकटवून (स्क्रॅपबुक) त्यांना नावे द्या.

३) पुष्परचना तयार करून त्यांचे फोटो काढून चौकोनात चिकटवा.

परंपरागत पुष्परचना

जपानी पुष्परचना

आधुनिक पुष्परचना

शुष्क पुष्परचना

अल्पाकृती पुष्परचना

४) शुष्क पुष्परचनेकरिता लागणारे साहित्य गोळा करा.

- **वाळलेली फुले :** उपलब्ध असलेली फुले वाळवा. त्याला स्वच्छ करा. आवडीनुसार रंगवा किंवा तशीच ठेवा.
- **पाने :** सायकस, पाम इत्यादी पानांना स्वच्छ करा. पानांना आवडीनुसार आकार देऊन वाळवा. पानांना रंग द्या किंवा ती तशीच ठेवा गोल्डन. सिल्व्हर व इतर रंगांचा वापर करू शकता.
- **इतर वाळलेली वनस्पती :** गव्हाच्या ओंब्या, ज्वारी-बाजरीची कणसे, कपाशीचे बोंड, झाडांचे बुंधे, गवत इत्यादी. यांना साफ करून वाळवून रंगवा.
- **इतर साहित्य :** विविध आकाराचे दगड, शिंपले, शंख, कागदी फुले, कापडी फुले, प्लास्टिकची फुले इत्यादी.

## प्रकरण ९ : लॅन्डस्केपींगची ओळख

अ) लॅन्डस्केपींग, परसबागेची कात्रण वही तयार करा.

१. लॅन्डस्केपिंग आणि परबागेची चित्रे गोळा करा.

२. योग्य तऱ्हेने ओळखण्यासाठी त्यांना नाव द्या.

३. प्रत्येक चित्रातील वेगळेपणा आणि वैशिष्ट्य स्पष्ट करा.

ब) शाळेत/महाविद्यालयात छोट्या परसबागेचा सामूहिक प्रकल्प करा.

१. छोट्या कुंड्यांमध्ये कोथिंबीर (धने) पेरू शकता.

२. कांदे, बटाटे, आले छोट्या कुंड्यांमध्ये सहजरित्या लावू शकता. त्यांची निगा राखणेही सोपे आहे. बिया पेरण्यासाठी आणि बटाटे लावण्यासाठी प्लास्टिक ट्रेचा वापर करू शकता. ज्याची लांबी रूंदी १८''x १२'' आहे आणि खोली ६ इंच आहे. हे वाहून न्यायला आणि प्रदर्शनाला चांगले असतात.

३. समूह प्रकल्पात वापरलेल्या बियाण्यांचा तक्ता तयार करा. पारदर्शक पाकिटात बिया टाकून तक्त्यावर लावा. प्रत्येकाखाली त्यांचे नाव लिहा.

क) जवळील झाडांच्या नर्सरीला भेट द्या, तेथील इनडोअर आणि आऊट डोअर झाडांच्या प्रकारांचे निरीक्षण करा.

१. इनडोअर (आतील) आणि आऊटडोअर (बाहेरील) झाडांची यादी तयार करा.

२. या झाडांची निगा कशी राखायची हे थोडक्यात लिहा.

# पाठ १० : गृहस्वच्छता

## १) द्रव्य स्वच्छतक तयार करणे :

प्रति ५ लिटर प्रमाणे

| क्र. | साहित्य | प्रमाण |
|---|---|---|
| १. | पाणी | ५ लीटर |
| २. | युरिया | १०० ग्रॅम |
| ३. | कॉस्टिक सोडा | १०० ग्रॅम |
| ४. | टी. एस. पी. Trisodium Phosphate | ८० ग्रॅम |
| ५. | ॲसिड स्लरी | ५०० ग्रॅम |
| ६. | परफ्यूम, रंग | आवड व आवश्यकतेनुसार |

**सूचना :**

- सर्व मिश्रण लाकडी चमच्याने ढवळावे.
- प्रत्यक्ष हाताचा उपयोग करू नये.

**कृती :**

१) ३ लीटर पाणी एका मोठ्या बाऊलमध्ये घेऊन यामध्ये ॲसिड स्लरी टाकावी व लाकडी चमच्याने ढवळावे.

२) आता २ लिटर पाण्यामध्ये कॉस्टिक सोडा मिसळावा.

३) कॉस्टिक सोड्यामुळे मिश्रण गरम होते त्यामुळे हे मिश्रण थोडे थंड होऊ द्यावे.

४) आता वरील दोन्ही मिश्रण एकत्रित करून या मिश्रणाला हळूवारपणे ढवळावे.

५) हे मिश्रण पुन्हा घट्ट हवे असल्यास यात ग्लेबर्स सॉल्ट टाकावे.

६) जेव्हा हे मिश्रण पादर्शी होईल तेव्हा यात रंग आणि सुगंधके (परफ्यूम) टाकावे.

७) हे मिश्रण योग्य प्रकारच्या बाटल्यांमध्ये भरून काळजीपूर्वक साठवावे.

## २) भांडी धुण्याचे द्रव्य :

| क्र. | साहित्य | प्रमाण |
|---|---|---|
| १. | अल्फा फोम | ५० ग्रॅम |
| २. | स्क्रबिंग पावडर | २ ग्रॅम |
| ३. | पाणी | २०० मिली. |

| क्र. | साहित्य | प्रमाण |
|---|---|---|
| ४. | कलर | आवश्यकतेनुसार |
| ५. | थिकनर | २ ते ३ ग्रॅम |
| ६. | सुगंधके | आवडीनुसार कोणतीही |

**कृती :**

१) एका बाऊलमध्ये ५० ग्रॅम अल्फा फोम घ्यावे.

२) या द्रावणात २ ग्रॅम स्क्रबिंग पावडर टाकावे.

३) यामध्येच काही थेंब ऑरेंज परफ्यूम टाकावे.

४) या सर्व मिश्रणात पाणी टाकावे.

५) वरील सर्व मिश्रण एकजीव होईपर्यंत ढवळावे.

६) हे मिश्रण पारदर्शी होईपर्यंत ढवळत रहावे.

७) या मिश्रणात आपल्या आवडीनुसार रंग टाकावा.

८) हे मिश्रण पुन्हा घट्ट हवे असेल तर (Thickner) थिकनर टाकावे.

९) आपले भांडी धुण्याचे द्रव्य (Dish wash jel) तयार झाले.

### ३) लादी स्वच्छतक द्रव्य :

| क्र. | साहित्य | प्रमाण |
|---|---|---|
| १. | गॅलेक्सिकल पेस्ट | १०० ग्रॅम |
| २. | पाणी | ११०० मिली. |
| ३. | सुगंधके | आवश्यकतेनुसार |
| ४. | रंग | आवश्यकतेनुसार |

**कृती :**

१) एका बाऊलमध्ये वरील प्रमाणात पाणी घेऊन या पाण्यामध्ये गॅलेक्सिकल पेस्ट टाकावी.

२) यानंतर हे मिश्रण हळूहळू ढवळावे.

३) तयार झालेल्या मिश्रणात रंग आणि सुगंधके मिसळावी.

४) या स्वच्छतकामध्ये लिंबूयुक्त सुगंधकाचा उपयोग करावा. ज्यामुळे टाईल्स व बाथरूममधील जंतू नष्ट होतात.

५) तयार झालेले मिश्रण एका रुंद तोंडाच्या बॉटलमध्ये भरावे.

❑❑❑

## कठीण शब्दांर्थ संग्रह

- **अपार्टमेंट :** अनेक फ्लॅट्स असलेल्या इमारतीला अपार्टमेंट असे म्हटले जाते.
- **बंगले :** सर्वसाधारणपणे बंगला हे छोटे, चौरस, एक मजली आणि सर्व चारही बाजूंना मोकळी जागा असलेले घर असते.
- **नियंत्रण :** नियंत्रण म्हणजे नियोजन कार्यरत करणे आणि जेव्हा आणि जिथे आवश्यक असेल तिथे त्याचे समायोजन करणे.
- **कॉटेजेस :** ऐतिहासिकदृष्ट्या हे एक लहान घर असते. ज्याचे छप्पर गवत किंवा तत्सम वनस्पती साहित्य वापरून बनविलेले असते.
- **निर्णय घेणे :** एखादी समस्या सोडविण्यासाठी किंवा एखादी परिस्थिती हाताळण्यासाठी उपलब्ध असलेल्या अनेक पर्यायांमधून पर्यायाची निवड करणे म्हणजे निर्णय घेणे.
- **गृहव्यवस्थापन :** गृहव्यवस्थापन म्हणजे नियोजन, संघटन, नियंत्रण आणि मूल्यांकन करून कुटुंबाजवळ उपलब्ध असलेल्या संसाधनांच्या उपयोगाने कुटुंबाची ध्येये साध्य करणे होय.
- **गृहस्वच्छता :** जे. पी. शेरीच्या मतानुसार ''सौंदर्य आणि आरोग्य प्राप्त करण्यासाठी गृहस्वच्छता हा अतिशय सोपा मार्ग आहे.''
- **मानवी संसाधने :** व्यक्तिगत वैशिष्ट्ये व गुण विशेषांचा समावेश असलेल्या आणि मानवामध्ये आंतरिकरित्या निर्माण झालेल्या संसाधनांना मानवी संसाधने असे म्हणतात.
- **पर्यावरण अनुकूल घरे (इको फ्रेंडली हाऊसेस) :** पर्यावरणाची हानी होणार नाही याचा विचार करून आधुनिक तंत्रज्ञानाने बांधलेली घरे.
- **प्रेरणा देणे :** ही नियंत्रणामधील पहिली अवस्था आहे याचा अर्थ कार्य चालू करणे आणि कार्यरत राहणे असा आहे.
- **मूल्यांकन :** मूल्यांकन म्हणजे पूर्ण झालेल्या क्रियेचा आढावा घेणे आणि भविष्यातील नियोजनासाठी मार्गदर्शन मिळविणे.
- **फ्लॅट :** इमारतीमधील केवळ काही भाग व्यापणारा परंतु सर्व सोयी अंतर्भूत असलेला घराचा प्रकार.
- **पुष्परचना :** फुले, पाने, इतर साहित्य यांची रूपे (forms) पोत आणि रंग यामधील सुसंगती लक्षात घेऊन केलेली कलात्मक रचना म्हणजे पुष्परचना.
- **फर्निचर :** फर्निचर म्हणजे घर किंवा कार्यालय, काम करण्यासाठी किंवा राहण्यासाठी वापरले जाणारे व हलविता येऊ शकणारे सामान होय.
- **सर्वसाधारण मूल्यांकन :** अत्यंत प्रासंगिक आणि व्यक्तीपूरक असलेले मूल्यांकन.
- **ध्येय :** ध्येय हा असा शेवटचा बिंदू असतो, की त्यास प्राप्त करण्यासाठी व्यक्ती किंवा कुटुंब कार्य करते.
- **परसबाग :** अशी जागा जेथे स्वयंपाकघरात वापरण्यात येणाऱ्या भाज्या, फळे आणि सेवन करण्यास उपयोगी वनस्पती (Herb ) याची लागवड केली जाते.
- **लँडस्केपींग :** लँडस्केपींगमध्ये सौंदर्यानुभवाच्या दृष्टीने घराबाहेरील आराखडा तयार केला जातो. यात गवत, झाडे, फुलझाडे, पाण्याची रचना (सौंदर्यपूर्ण) दगड, कुंपण, फुलांचे वाफारे याचा वापर केलेला असतो.

- **व्यवस्थापन :** तुमच्याजवळ जे आहे ते वापरून तुम्हाला जे हवे आहे ते साध्य करणे.
- **नियोजन :** नियोजन म्हणजे उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी योजना आखणे.
- **पेंट हाऊसेस :** इमारतीच्या (अपार्टमेंट बिल्डिंगच्या) छतावर बांधलेले छोटे आणि पूर्णपणे स्वतंत्र असलेले घर याला पेंट हाऊस असे म्हणतात.
- **रो हाऊसेस :** रो हाऊसेस म्हणजे एकाच कुटुंबासाठी असलेले, परस्परांना एक सामाईक भिंतीने जोडलेले घरांचे प्रकार होत.
- **संसाधने :** वेगवेगळ्या मागण्यांच्या पूर्ततेकरिता आवश्यक ती सुप्तशक्ती असणारे महत्त्वपूर्ण घटक म्हणजे संसाधने.
- **विशिष्ट मूल्यांकन :** सविस्तरपणे केले जाणारे मूल्यांकन.
- **स्तर :** स्तराला मूल्यांकनाचा पाया समजला जातो.
- **स्टुडिओ अपार्टमेंट :** स्टुडिओ अपार्टमेंट किंवा स्टुडिओ प्लॉट हा अगदी छोटा, झोपण्याची वेगळी खोली नसलेला फ्लॅट असतो.
- **गादीचे फर्निचर :** सामान्यत: लाकडी आणि साहित्याचे फर्निचर वापरण्यास सोयीस्कर नसते म्हणून त्यांना गादीचा उपयोग करून परिसज्जा केले जाते. यालाच गादीचे फर्निचर असे म्हणतात.
- **मूल्य :** मूल्य म्हणजे जीवनातील आवश्यक गोष्टी ज्यांना आपण योग्य, इच्छित व इष्ट समजतो.

❑❑❑

# Bibliography


- Anna Hong Rutt. ([illegible]). *Home Furnishing.* Second Edition, Wiley Eastern Private Limited, New Delhi.
- Barbara Pearce. ([illegible]). *Step by Step Guide to Flower Arranging.* Hamlyn London, New York.
- Deshpande R. S. ([illegible]). *Modern Ideal Homes for India,* United Book Corporation, Pune
- Deshpande R. S. ([illegible]). *Build your Own Home,* United Book Corporation, Pune.
- Gross Irma and Crandall Elizabeth. ([illegible]). *Management for Modern Families,* Appleton Century Crafts, New York.
- John March and Penney. ([illegible]). *Japanees Flower Arrangement Ikebana,* Hamlyn, London, New York.
- Khadse Indira. ([illegible]). *Gruha Sajawat.* Himalaya Publishing House.
- Khadse Indira. ([illegible]). *Home management.* Himalaya Publishing House.
- Khadse Indira. ([illegible]). *Gruha Vyavasthapan.* Himalaya Publishing House.
- Keith Davitt, ([illegible]). *Beyond the lawn Unique: Outdoor spaces for modern living.* Quarry Books publishing
- Kukade S, Ratnaparkhi, M. Sundaresh. G. ([illegible]). *Home Management,* Sheth Publishers Pvt. Ltd, Mumbai.
- Limaye and Munshi ([illegible]). *Home Management and Family Housing.* Standard Publication, Nagpur.
- Limaye Kshama. ([illegible]). *Gruha Vyavasthapanachi Mulatatve.* Sheth Publication.
- Limaye Kshama. ([illegible]). *Home Management and Family Housing.* Sheth Publisher Pvt. Ltd. Mumbai.
- *Landscaping and Garden Remodelling (Sunset), (1978)*: Lane Publishing Co. Menlo Park, California.
- Maharashtra State Board Secondary and Higher Secondary Education, Pune, ([illegible]). *Home Management. Std XI.*
- Marshall Cavendish, ([illegible]). *Designing your garden.* Marshall Cavendish Books Limited.

- Meredith. ([illegible]). *Landscape Planning Better Homes and Gardens.* Meredith publishing Company.
- Mullick Premlata ([illegible]). *Elements of Home Science.* Kalyani Publishers. New Delhi.
- Munshi Bhagyalaxmi and Limaye Kshama. ([illegible]). *Home Management and Family Housing.* Standard Publication, Nagpur.
- Munshi Jathar. ([illegible]). *Griha Vyavasthapan.* Pimlapapure and Co. Mahal, Nagpur.
- Nickell and Dorsey. ([illegible]). *Management in Family Living.* Wiley Earsten Ltd. New Delhi.
- Nickell Paulena and Dorsey Jean M([illegible]). *Management in Family Living,* Wiley Eastern Ltd, New Delhi.
- Pandit M. R. and Seethal laxmi. *Home Management.* Nirali Publication.
- Ratnaparkhi M. S. ([illegible]). *Elements of Planning*-Reference Material.
- Savirayan Sarojini ([illegible]). *Home Management,* Neel Kantha Publishers, Bombay.
- Stelli Soundararaj ([illegible]). *A Textbook of Household Art.* Orient Longman Limited, Madras.
- Sulbha Gonge and Triveni Farphade. ([illegible]). *Kautumbik Sansadhanache Vyavasthapan Ani Griha Sajawat,* Pimplapure and Co. Nagpur.
- Sundaresh Gita. *Residential Space Planning and Furnishing* - Reference Material
- Swanson betty([illegible]). *Introduction to Home Management,* Macmillan Co, New York.
- Varghese M. A, Ogale N. N., and Srinivasan. ([illegible]). *Home Management.* New Age International (P), Limited, New Delhi.
- Vinayak J. S. *Home Management and Interior Decoration.* Sanjeev Publisher, Merath.
- Vyawhare L, PushparekhaA. ([illegible]). Shri. Mangesh Prakashan, 2 New Ramdaspeth, Nagpur.


❑❑❑

# Websites

- http://www.allindiaflorist.com/flowerarrangemnt.html.
- wwwt he b terindiac om/List A plants.
- www.floralcraftsource.com http://gosmartbricks.com/types-of-houses-in-india/
- https://wwwhom estratosph erec om/tpye s-of-houses/
- wwwm oney crashersc om how to sacv money with a home g rden
- https://wwwqor ac om/What-are-the-different-tpye s-of-houses-in-India
- wwws odgodc om/g rdening b sics
- https://stly esatlifec om/articles/tpye s-of-houses-in-india/
- https://www.theflowerexpert.com/content/flowerart/flower-arrangements
- http://vikaspedia.in/social-welfare/urban-poverty-alleviation-1/schemes-urban-poverty allei ation/pradhan-mantri-awas-yoj ana-housing for-all-urb n
- http://en.wikipedia.org/wiki/floristny.

❑❑❑




















महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
पुणे–४११००४.

गृहव्यवस्थापन इयत्ता ११ वी

₹६०.००